सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक १२ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भ्रष्टाचाराची समस्या आज सर्वत्र विद्यमान आहे. सामान्य नागरिकापासून ते उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वदूर भ्रष्टाचार आहे. या समस्येवर आपण काय चिंतन केले? भ्रष्टाचाराचे मूळ व्यक्तीच्या चारित्र्याच्या ऱ्हासात आहे. म्हणून चारित्र्यसंपन्न व्यक्तीच भ्रष्टाचाराचे उच्चाटन करू शकते.

**- सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## विनम्र अभिवादन



साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात अमूल्य योगदान देणारे दैनिक तरुण भारतचे संस्थापक संपादक ग. त्र्यं. माडखोलकर यांची आज पुण्यतिथी.

# भारताला राष्ट्रकुल खेळांचे यजमानपद




◆ **ग्लासगो, २६ नोव्हेंबर**

भारताला २०३० च्या कॉमनवेल्थ गेम्सचे यजमानपद मिळाले आहे. बुधवारी स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे राष्ट्रकुल क्रीडा कार्यकारी मंडळाच्या बैठकीनंतर अहमदाबादला यजमान शहर म्हणून घोषित करण्यात आले, अशी माहिती केंद्रीय मंत्री मनसुख मंडाविया दिली.

२०३० मध्ये राष्ट्रकुल खेळांना १०० वर्षे पूर्ण होतील आणि या ऐतिहासिक प्रसंगी भारतात खेळांचे आयोजन करणे ही एक सन्मानाची बाब ठरणार आहे.

भारत २० वर्षांनंतर कॉमनवेल्थ गेम्सचे यजमानपद भूषवत आहे. यापूर्वी २०१० मध्ये नवी दिल्लीत या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी भारतीय खेळाडूंनी ३८ सुवर्ण पदकांसह एकूण १०१ पदके जिंकली होती.

गेल्या महिन्यात राष्ट्रकुल खेळांच्या कार्यकारी मंडळाने अहमदाबादमध्ये खेळांचे आयोजन करण्याची शिफारस केली होती. ग्लासगो येथील महासभेच्या बैठकीत आता अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. अहमदाबादसह नायजेरियातील अबुजा देखील या स्पर्धेत सहभागी होता, परंतु भारताने बाजी मारली.



केंद्रीय मंत्री मनसुख मंडावीया माहिती देताना

राष्ट्रकुल खेळ २०३४ च्या आयोजनासाठी आफ्रिकन शहराचा विचार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### ७४ सदस्य देशांच्या प्रतिनिधींची भारताला मान्यता

राष्ट्रकुल क्रीडा महासभेतील ७४ सदस्य देश आणि प्रदेशांच्या प्रतिनिधींनी भारताच्या २०३० साठीच्या बोलीला मान्यता दिली. बैठकीत भारताचे प्रतिनिधीत्व संयुक्त क्रीडा सचिवांसह भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा आणि गुजरातचे क्रीडा मंत्री हर्ष संघवी यांच्यासह इतरांनी केले. यावेळी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे अध्यक्ष डॉ. डोनाल्ड रुकारे म्हणाले, भारत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत युवाशक्ती, महत्त्वाकांक्षा, समृद्ध संस्कृती आणि प्रासंगिकता आणतो. यामुळे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी एका नवीन सुवर्णयुगाची सुरुवात झाली. २०३४ आणि त्यानंतरच्या खेळांचे आयोजन करण्यासाठी अनेक देश उत्सुक आहेत, हे सांगताना मला आनंद होत आहे. आम्ही आमच्या राष्ट्रकुल खेळांच्या पुढील शतकाची सुरुवात सकारात्मक जोमाने करत आहोत. *(वृत्तसंस्था)*

**यंदा १५ ते १७ खेळांचा समावेश**

२०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धेत १५ ते १७ खेळांचा समावेश केला जाईल. त्यात ॲथलेटिक्स आणि पॅरा-ॲथलेटिक्स, पोहणे, पॅरास्विमिंग, टेबल टेनिस आणि पॅरा टेबल टेनिस, बाउल्स आणि पॅरा बाउल्स, वेटलिफ्टिंग आणि पॅरा वेटलिफ्टिंग, कलात्मक जिम्नॅस्टिक्स, नेटबॉल आणि बॉक्सिंग आदींचा अंतर्भाव राहील.

# भारत झुगारणार चीनचा दबाव

## दुर्मिळ खनिज चुंबक उत्पादनासाठी ७,२८० कोटी मंजूर

### केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय



◆ **नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी एकूण १९,९८१ कोटी रुपयांच्या चार मोठ्या योजनांना केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बुधवारी झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यात संरक्षण क्षेत्र आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या खनिज चुंबक धातू उत्पादन योजनेसाठी ७,२८० कोटी रुपयांचा समावेश आहे. चीनच्या दबावाला झुगारण्यासाठी भारताने निर्णायक पावले उचलण्यास प्रारंभ केला आहे.

या व्यतिरिक्त पुणे मेट्रोच्या विस्तारासाठी ९,८५८ कोटी रुपये, देवभूमी द्वारका (ओखा)-कनालस रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणासाठी १,४५७ कोटी रुपये आणि बदलापूर-कर्जतन तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेसाठी १,३२४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

खनिज चुंबक धातू उत्पादनाला भारत गंभीरतेने घेत आहे. योजनेसाठी मंजूर केलेली रक्कम यापूर्वीच्या निधीपेक्षा तिप्पट आहे. चीनने दुर्मिळ धातूंच्या निर्यातीवर नियंत्रण आणले असताना केंद्र सरकारने हे पाऊल उचलले आहे. जगातील एकूण दुर्मिळ धातूंपैकी ६० ते ७० टक्के हिस्सा चीनचा आहे आणि त्यावरील प्रक्रियेचा विचार केला असता, हा हिस्सा ९० टक्क्यांचा आहे.

योजनेनुसार दुर्मिळ धातू चुंबकाच्या उत्पादनासाठी एकीकृत उत्पादन सुविधा विकसित करण्याचा उद्देश यामागे आहे. यात मातीतील ऑक्साईड धातूत, धातू मिश्रधातूमध्ये आणि शेवटी मिश्रधातू चुंबकांमध्ये बदल करण्याच्या प्रक्रियेचा समावेश आहे. या अंतर्गत दरवर्षी हजार मेट्रिक टन क्षमता निर्माण केली जाईल आणि दरवर्षी १२०० मेट्रिक टन क्षमतेचे प्रकल्प स्थापन केले जातील. *(वृत्तसंस्था)*

**संरक्षण उत्पादनात महत्त्वपूर्ण भूमिका**

इलेक्ट्रिक वाहने, नूतनीकरणीय ऊर्जा आणि संरक्षण उत्पादनांमध्ये या दुर्मिळ धातूंचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. देशात सद्यपरिस्थितीत या क्षेत्रात मर्यादित गुंतवणूक, तांत्रिक कौशल्याचा अभाव आणि प्रकल्पांसाठी दीर्घ कालावधीसारख्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. सरकारी मदतीशिवाय सध्या व्यावसायिक उत्पादन शक्य नाही. भारतात वापर होणाऱ्या दुर्मिळ स्थायी धातू चुंबकाच्या निर्यातीसाठी चीनने परवाने देणे सुरू केले असले, तरी भारतीय कंपन्यांना अद्याप ते मिळालेले नाहीत. भारतात दरवर्षी जवळपास दोन हजार टन ऑक्साईडची मागणी असते.

# सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलचे आज उद्घाटन

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

वृत्तपत्राच्या क्षेत्रात गेली चार दशकं कार्यरत असणाऱ्या दैनिक तरुण भारतच्या सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलचा उद्घाटन सोहळा गुरुवार, २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता होटगी रोडवरील तरुण भारतच्या कार्यालयात होईल. ज्येष्ठ पत्रकार तथा महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया संघाचे अध्यक्ष राजा माने, दैनिक तरुण भारत आणि सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज चैनलचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवास बिनगुंदगी, सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलच्या चॅनेल हेड अश्विनी तडवळकर आदींच्या उपस्थितीत होईल.

सोलापूर तरुण भारत — Solapur Tarun Bharat — Digital — बातमी नव्हे विचार — NEWS

## महत्त्वाचे

### बाजाराची विक्रमी तेजीला गवसणी

**मुंबई :** मागील तीन सत्रात घसरणीने तोट्यात असणारा देशांतर्गत बाजार अचानक बुधवारी उसळला आणि निर्देशांक, निफ्टीत विक्रमी तेजी नोंदविण्यात आली. विविध क्षेत्रांमध्ये झालेल्या व्यापक खरेदीमुळे गुंतवणूकदारांना मोठा नफा झाला. दिवसभरातील व्यवहारात निर्देशांकाने तब्बल १०२३ अंकांची उसळी घेतली तर निफ्टीही ३२० अंकांनी वधारला. निर्देशांकात दिवसअखेर १.२१ टक्क्यांची वाढ झाली आणि तो ८५,६१० वर स्थिरावला. निफ्टी २६,२०५ वर बंद झाला. निर्देशांकात बजाज, रिलायन्स इंडस्ट्रीज, सन फार्मा आणि टाटा मोटर्स आदी शेअर्स चमकदार कामगिरी करणारे ठरले.

### ब्राझीलच्या माजी राष्ट्राध्यक्षांना २७ वर्षांची शिक्षा

**ब्राझिलिया :** ब्राझीलचे माजी राष्ट्राध्यक्ष ७० वर्षीय जायर बोल्सोनारो यांना सर्वोच्च न्यायालयाने सत्तांतराचा कट रचल्याप्रकरणी २७ वर्षांची शिक्षा सुनावली. मंगळवारी हा निर्णय देण्यात आला. त्यांनी २०२२ च्या राष्ट्रपती निवडणुकीत पराभव होऊनही सत्तेत राहण्यासाठी सध्याचे राष्ट्राध्यक्ष लुला डी सिल्वा यांचे सरकार पाडण्याचा कट रचला होता.

# अपक्षांना चिन्हांचे वाटप; प्रचारासाठी अवघे चारच दिवस

## जिल्ह्यातील ११ नगरपालिकांच्या प्रचाराचा धुरळा सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील अनगर नगरपंचायतीची निवडणूक बिनविरोध झाली. तर उर्वरित ११ नगरपालिकेची निवडणूक लागली आहे. एकूण ११ नगराध्यक्षपदासाठी ६६ तर २७२ नगरसेवक पदाच्या निवडीसाठी ९५१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रामुख्याने महायुतीत राजकीय संघर्ष असून, महाविकास आघाडीने मात्र अनेक ठिकाणी एकीची मूठ बांधली आहे. राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्षाची चिन्हे आहेत, त्यांनी अर्ज छाननी होताच प्रचारास शुभारंभ केला. मात्र अपक्ष उमेदवारांना अधिकृत निवडणूक चिन्हांचे वाटप बुधवारी झाल्याने प्रचारासाठी त्यांच्या हातात अवघे चारच दिवस राहिले आहेत.



अपक्ष उमेदवारांना मतदारांपर्यंत आपले चिन्ह पोचवण्यासाठी आता केवळ चार दिवस मिळणार आहेत. याउलट, राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्षांचे उमेदवार २१ नोव्हेंबरपासूनच चिन्हासह जोमात प्रचार करत आहेत. त्यामुळे पक्षीय उमेदवारांना मिळालेल्या आघाडीच्या तुलनेत अपक्षांना मोठी कसरत करावी लागणार आहे. जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांचे २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. तर निकाल ३ डिसेंबरला आहे.

अपक्षांमुळे निवडणुकीत अधिक चुरस निर्माण आहे. काही ठिकाणी स्थानिक आघाड्या निर्माण झाल्या आहेत. बार्शी नगराध्यक्षपदासाठी सहा तर नगरसेवक पदासाठी १२० उमेदवार, पंढरपूर नगराध्यक्षपदासाठी पाच तर नगरसेवक पदासाठी १३३ उमेदवार, अक्कलकोट नगराध्यक्षपदासाठी सहा तर नगरसेवक पदासाठी ७६ उमेदवार, अकलूज नगराध्यक्ष पदासाठी पाच तर नगरसेवक पदासाठी ९१ उमेदवार, सांगोला नगराध्यक्षपदासाठी ११ तर नगरसेवक पदासाठी १०३ उमेदवार, करमाळा नगराध्यक्षपदासाठी पाच तर नगरसेवक पदासाठी ७१ उमेदवार, कुर्डुवाडी नगराध्यक्षपदासाठी सहा तर नगरसेवकपदासाठी १०३ उमेदवार, मंगळवेढा नगराध्यक्षपदासाठी तीन तर नगरसेवक पदासाठी ५८ उमेदवार, मोहोळ नगराध्यक्षपदासाठी ११ तर नगरसेवक पदासाठी ७९ उमेदवार, दुधनी नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ५३ उमेदवार, मैंदर्गी नगराध्यक्षपदासाठी २ तर नगरसेवक पदासाठी ४७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.




# संविधान हा राष्ट्रीय अस्मिता आणि आदर्शांचा ग्रंथ : राष्ट्रपती मुर्मू



◆ **नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

भारतीय संविधान हे राष्ट्रीय अस्मिता आणि आमच्या आदर्शांचा ग्रंथ आहे, गेल्या अनेक दशकात संसदेने संविधानातील मूल्यांनुसार वाटचाल करत जनतेच्या आकांक्षांची अभिव्यक्ती करणारे अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्म यांनी आज येथे केले.

संविधान दिनानिमित्त संविधान सभेत म्हणजे जुन्या संसद भवनातील केंद्रीय कक्षात आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती मुर्मू बोलत होत्या. यावेळी उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन , पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, राज्यसभेतील सत्तापक्षनेते जेपी. नड्डा, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. संविधान सभेने सांसदीय प्रणाली स्वीकारण्याबाबत जे अनेक तर्क दिले, ते आजही प्रासंगिक आहे, याकडे लक्ष वेधत मुर्मू म्हणाल्या की, जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या देशातील संसद लोकभावनेची अभिव्यक्ती करण्यात जगातील अनेक देशांसाठी आदर्श आहे.

संविधानाच्या माध्यमातून सामूहिक आणि व्यक्तिगत स्वाभिमानाचे जतन झाले पाहिजे, अशी आमच्या संविधान निर्मात्याची इच्छा होती, असे स्पष्ट करत मुर्मू म्हणाल्या की, याची पूर्तता आपल्या संसदेच्या माध्यमातून झाली आहे, संसदेने लोकांच्या आकांक्षाची वेळावेळी पूर्तता केली, याबद्दल सर्व संसद सदस्यांचे मी अभिनंदन करते. *(तभा वृत्तसेवा)*

# राष्ट्रीय कर्तव्याला प्राधान्य द्या

## देशवासीयांना लिहिलेल्या पत्रात मोदींचे आवाहन

◆ **नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

आपल्या देशाची विकसित भारताच्या दिशेने वाटचाल सुरु झाली आहे, त्यामुळे देशातील नागरिकांनी आपल्या राष्ट्रीय कर्तव्याला प्राधान्य देण्याची गरज असल्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केले.



संविधान दिनानिमित्त देशवासीयांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात मोदी यांनी म्हटले आहे की, १९४९ मध्ये आपल्या देशाने ऐतिहासिक असे जे संविधान स्वीकारले, त्या संविधानाचे देशाच्या स्थायी प्रगतीत मोठे योगदान आहे. २०१५ मध्ये मोदी यांनी या पवित्र संविधानाचा सन्मान म्हणून दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार आज हा कार्यक्रम झाला.

सर्वसामान्य परिस्थितीतील नागरिकांना संविधानाने देशाची सर्वोच्च पातळीवरील सेवा करण्यासाठी सशक्त केले, याकडे लक्ष वेधत मोदी यांनी या पत्रात म्हटले की, संविधानाने देशातील नागरिकांना स्वप्न पाहण्याची तसेच ते साकार करण्याची शक्ती दिली आहे.

संविधानाच्या अंतर्गत सरकारने आतापर्यंत हे निर्णय घेतले वा धोरण बनवली त्यामुळे येणाऱ्या पिढ्यांच्या जीवनाला आकार मिळणार आहे, यामुळे देशाची प्रगतिपथावर वाटचाल होणार आहे, असे पंतप्रधान म्हणाले. *(तभा वृत्तसेवा)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दहशतवादी हल्ले सहन करणार नाही

## अमित शाह यांचे प्रतिपादन, २६/११ च्या हल्ल्यातील मृतकांना श्रद्धांजली


◆ **नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

वर्ष २००८ मध्ये २६/११ रोजी दहशतवाद्यांनी मुंबईवर केलेला भ्याड हल्ला घृणास्पद आणि अमानवीय कृत्य होते. दहशतवादी हल्ल्यांना धैर्याने तोंड देताना ज्या शूर सैनिकांनी आपले प्राण अर्पण केले त्यांना मी सलाम करतो आणि यावेळी मृत झालेल्या नागरिकांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. दहशतवादाविरोधात भारताचे शून्य सहनशीलतचे धोरण असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले आहे.

शाह यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, दहशतवाद हा कोणत्याही एका देशासाठी नव्हे, तर संपूर्ण मानवतेसाठी शाप आहे. सरकारचे दहशतवादाविरुद्ध शून्य




मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या हुतात्म्यांच्या शहीद स्मारकाला अभिवादन करताना पोलिस अधिकारी



सहनशीलतेचे धोरण स्पष्ट आहे आणि संपूर्ण जग त्याचे कौतुक करत आहे. भारताच्या दहशतवादविरोधी कारवायांना जगाचा व्यापक पाठिंबा मिळत आहे. कोणत्याही परिस्थितीत सीमापार दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही. ऑपरेशन सिंदूर याचे उदाहरण आहे, आणि यापुढे दहशतवाद्यांनी चूक केल्यास, त्यांना किंमत चुकवावी लागेल. (वृत्तसंस्था)

> २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यावेळी देशातील लोकांचे रक्षण करण्यासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या शूर सैनिकांना मी विनम्र श्रद्धांजली अर्पण करते. भारत सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी वचनबद्ध आहे.
>
> **- द्रौपदी मुर्मू,** राष्ट्रपती

> २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या सर्व निष्पाप नागरिकांना मी विनम्र श्रद्धांजली वाहतो. दहशतवाद्यांच्या भ्याड कृत्यांमुळे आपण अनेक प्रियजन गमावले, परंतु आपल्या शूर पुत्रांनी शौर्याने दहशतवाद्यांना उत्तर दिले.
>
> **- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

> मुंबईत २६/११ रोजी झालेला दहशतवाद्यांचा भ्याड हल्ला मानवतेविरोधात होता. पोलिस, सुरक्षा दल आणि शूर वीरांनी जीवाची तमा न बाळगता निकराने लढा दिला. या हल्ल्यात प्राण गमावलेल्या नागरिकांना मी श्रद्धांजली अर्पण करतो.
>
> **- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

> मुंबईवर झालेला हल्ला हा मुंबईच्या इतिहासातील काळा दिवस होता. मी शहिदांना अभिवादन करतो आणि ज्या निरपराध लोकांचा बळी गेला आहे त्यांना आदरांजली अर्पित करतो.
>
> **- एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

# जगातील ८० टक्के लोकसंख्या आता शहरवासी

### संयुक्त राष्ट्राच्या अहवालातील निष्कर्ष

◆ **न्यूयॉर्क, २६ नोव्हेंबर**

जगातील ८० टक्के लोकसंख्या आता शहरात राहते. प्रत्येकाला गावांची आठवण येते आणि ते त्यांच्या जुन्या जीवनशैलीची आकांक्षा बाळगतात, परंतु शहरीकरणाचे आकर्षणदेखील आश्चर्यकारक आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, जगातील ८० टक्के लोकसंख्या आता शहरी भागात राहते. याचे कारण असे की, मोठ्या प्रमाणात स्थलांतरामुळे लोक शहरांकडे वळले आहेत. शिवाय, विकासाच्या शर्यतीत अशी अनेक गावे आहेत जी आता शहरांमध्ये रूपांतरित झाली आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, वर्ल्ड अर्बनायझेशन प्रॉस्पेक्ट्स २०२५, जगातील जवळपास ८१ टक्के लोकसंख्या आता शहरात राहते. विशेष म्हणजे, २०१८ मध्ये हा आकडा फक्त ५५ टक्के होता. अहवालानुसार, ४५ टक्के लोक शहरांमध्ये राहतात, तर ३६ टक्के लोक शहरांमध्ये राहतात. हा अहवाल पॅट्रिक गेरलँड यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आला होता. शिवाय, असा अंदाज आहे की, २०५० पर्यंत जगातील ८३ टक्के लोकसंख्या शहरात राहील. हा अहवाल तयार करताना, वेगवेगळ्या देशांचे मापदंड विचारात घेण्यात आले. उदाहरणार्थ, जपानमध्ये ५० हजार लोकसंख्येला शहर मानले जाते. तथापि, डेन्मार्कमध्ये ही संख्या फक्त २०० लोकांची आहे.

**अहवालातील निकष**

या अहवालासाठी निकष ५० हजार लोकसंख्या आणि प्रति चौरस किलोमीटर किमान १५०० लोक होते. शिवाय, शहरांसाठी ही संख्या ५००० आणि प्रति चौरस किलोमीटर ३०० लोकांची लोकसंख्या होती. अशाप्रकारे जगातील लोकसंख्येच्या फक्त १९ टक्के लोक आता खेड्यांमध्ये राहतात. अहवालानुसार, जगातील सर्व भागात शहरीकरण वाढत आहे.

भारतासारख्या दक्षिण आशियाई देशांबद्दल अहवालात असे म्हटले आहे की, लोक प्रामुख्याने शिक्षण आणि रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतरित होत आहेत. अहवालात असेही म्हटले आहे की, अनियोजित शहरीकरणामुळे काही समस्या निर्माण होत आहेत. उदाहरणार्थ, जर पुरेशा सार्वजनिक वाहतुकीशिवाय शहरे वाढली तर जगणे कठीण होते. खाजगी वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्यामुळे प्रदूषण वाढत आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### एचपी कंपनीत मोठी कर्मचारी कपात

**न्यूयॉर्क** : अमेरिकन टेक कंपनी एचपी इंकने जागतिक स्तरावर ४,००० ते ६,००० कर्मचाऱ्यांची कपात करण्याची योजना आखली आहे. कंपनीची ही योजना २८ म्हणजेच आर्थिक वर्ष २०२८ च्या अखेरपर्यंत पूर्ण होईल. कंपनीचे म्हणणे आहे की, मेमरी चिपच्या किमती वाढल्यामुळे खर्च वाढत आहे, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. तसेच, एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) वर लक्ष केंद्रित करण्यासाठी ऑपरेशन्स सुव्यवस्थित केली जात आहेत. यामुळे कंपनीला तीन वर्षांत १ अब्ज डॉलर म्हणजेच ८,९२७ कोटी रुपयांची एकूण बचत होईल. कंपनीकडे सध्या सुमारे ५८,००० कर्मचारी आहेत. या वर्षाच्या सुरुवातीलाही कंपनीने १,००० ते २,००० कर्मचाऱ्यांची कपात केली होती.

### यूपीएससीच्या तयारीसाठी घरातून पळून गेली मुलगी

**भोपाळ** : मध्यप्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे भोपाळमधील एका मुलीचे आयएएस बनण्याचे स्वप्न साकार होणार आहे. न्यायालयाने बिहारमधील एका महिला आयएएस अधिकाऱ्याला तिचे मेंटॉर आणि मार्गदर्शक बनवले आहे, जेणेकरून ती नागरी सेवा परीक्षेची तयारी करू शकेल. तिच्या वडिलांनी जबरदस्तीने लग्नासाठी दबाव टाकल्यामुळे ती मुलगी घरातून पळून गेली होती. तिला शिक्षण सुरू ठेवायचे होते आणि नागरी सेवा परीक्षा द्यायची होती, तर वडील तिच्यावर लग्नासाठी दबाव टाकत होते. एका खाजगी कंपनीत काम करून ती आपला खर्च भागवत असे आणि त्यातच शिकवणीही करत असे. वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तिला शोधून काढले. मात्र, तिला घरी परतण्यापेक्षा शिक्षण महत्त्वाचे वाटले. या प्रकरणी उच्च न्यायालयात तिला हजर केले असता संपूर्ण प्रकार ऐकून मुख्य न्यायमूर्ती संजीव सचदेवा आणि न्यायमूर्ती विनय सराफ यांच्या खंडपीठाने तिला एक हुशार मुलगी मानले आहे.

### विद्यार्थिनींना अश्लील संदेश पाठवणारा शिक्षक निलंबित

**दिंडोरी** : मध्यप्रदेशातील दिंडोरी येथे एका शिक्षकाला १२वीच्या विद्यार्थिनींशी आक्षेपार्ह वर्तन केल्याच्या आरोपावरून निलंबित करण्यात आले. तो मुलींना आक्षेपार्ह संदेश पाठवत असे. तो म्हणायचा की, मला एकट्यात भेट नाहीतर नापास करेन. ही घटना दिंडोरी जिल्ह्यातील अमरपूर येथील सांदिपनी शाळेतील आहे. तेथील शिक्षक प्रशांत साहू यांच्यावर आक्षेपार्ह वर्तन केल्याचा आरोप आहे. आरोपी शिक्षक प्रशांत साहू यांची नियुक्ती २०२३ साली दिंडोरी जिल्ह्यात झाली होती. शाळेतील विद्यार्थिनी उपसरपंच आणि एका महिला शिक्षिकेसह एसपी वाहिनी सिंह यांच्या कार्यालयात पोहोचल्या.

### बहुपत्नीत्वावर बंदीसाठी आसाम सरकारचे विधेयक

**गुवाहाटी** : आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी बहुपत्नीत्वावर बंदी घालण्यासाठी विधानसभेत एक विधेयक मांडले. सभापती विश्वजित दैमारी यांच्या परवानगीने, सरमा यांनी आसाम बहुपत्नीत्व प्रतिबंधक विधेयक, २०२५ सादर केले. विरोधी पक्ष काँग्रेस, सीपीआय(एम) आणि रायजोर दलाच्या आमदारांच्या अनुपस्थितीत हे विधेयक मांडण्यात आले. त्यांनी गायिका झुबीन गर्ग यांच्या मृत्यूवरील चर्चेनंतर सभात्याग केला. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी हे विधेयक मांडण्यात आले आणि नंतर ते चर्चेसाठी आणि मंजूरीसाठी घेतले जाईल.

# टीजेएसबी आणि श्रीराम लाईफ इन्शुरन्समध्ये भागीदारी करार

◆ **ठाणे, २६ नोव्हेंबर**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड आणि श्रीराम लाइफ इन्शुरन्स कंपनी यांच्यात व्यावसायिक करार झाला आहे. व्यावसायिक भागीदार म्हणून टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड आणि श्रीराम लाइफ इन्शुरन्स कंपनी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक आणि गोवा या राज्यांतील ग्राहकांना विमा सेवा उपलब्ध करून देणार आहेत.



या करारान्वये, आयआरडीएआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कॉर्पोरेट एजंट म्हणून टीजेएसबी सहकारी बँक श्रीराम लाइफच्या विमा उत्पादनाचे वितरण आपल्या एकशे बासष्ट शाखांच्या माध्यमातून करणार आहे. पहिल्यांदाच विमा घेणारे ग्राहक, अल्प आर्थिक उत्पन्नातील कुटुंबे यांना परवडणारी आणि सुलभ विमा उत्पादने उपलब्ध करून देणे हा या कराराचा उद्देश आहे. टीजेएसबीचा पाच राज्यात विस्तारलेला व्यवसाय, ग्राहकांसोबत असेलला आपुलकीचा व्यवहार आणि श्रीराम लाइफ इन्शुरन्स कंपनीची ग्राहकांना संरक्षण देणारी परवडणाऱ्या उत्पादनांवर आधारित रचना यांचा समन्वय निमशहरी आणि ग्रामीण भागात विमा प्रसार करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

या कराराविषयी बोलताना टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर म्हणाले, टीजेएसबी बँकेचे उद्दिष्ट आमच्या ग्राहकांचे आर्थिक सक्षमीकरण हे आहे. श्रीराम लाइफ इन्शुरन्ससोबतच्या या कॉर्पोरेट एजन्सी भागीदारीद्वारे विशेषतः मध्यम व अल्प आर्थिक उत्पन्न गटातील कुटुंबांना विश्वासार्ह आणि परवडणारे संरक्षण उपाय उपलब्ध करून त्यांच्या दीर्घकालीन सुरक्षिततेला बळकटी देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

श्रीराम लाइफ इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी कॅस्पारस जे.एच. क्रॉमहोउट म्हणाले, या सहकार्याद्वारे आम्ही तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विमा सेवेचा अधिक विस्तार करू. '२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा' या भारत सरकारच्या उद्दिष्टपूर्तीत योगदान देऊ. आम्ही प्रत्येक घरपर्यंत सोपा, सुलभ आणि उपयुक्त विमा पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहोत, ज्यामुळे प्रत्येक कुटुंब निर्धास्तपणे आपले भविष्य सुरक्षित करू शकेल. वा

# तीन लाखांत विकणार होते 'टीईटी' ची प्रश्नपत्रिका

### मुख्य आरोपींच्या पोलिस कोठडीत चार दिवसांनी वाढ

### १६ जणांची कळंब कारागृहात रवानगी

### विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा, एकूण १८ जणांना

◆ **कोल्हापूर, २६ नोव्हेंबर**

शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राला बदनाम करणाऱ्या घटना वारंवार घडत आहेत. कोल्हापूर येथे पैसे देऊन शिक्षक पात्रता चाचणीची प्रश्नपत्रिका फोडल्याचे प्रकरण उघडकीस आले असून याप्रकरणी आतापर्यंत १८ जणांना अटक करण्यात आली आहे. मुख्य आरोपी महेश गायकवाड आणि राहुल पाटील यांच्या पोलिस कोठडीत चार दिवसांची वाढ केली असून अन्य १६ जणांना न्यायालयीन कोठडी मिळाल्याने त्यांची कळंब येथील कारागृहात रवानगी केली आहे.

प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक भरतीसाठी शिक्षक पात्रता चाचणी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. राज्यात २३ नोव्हेंबरला टीईटी परीक्षा झाली. परीक्षेच्या तोंडावरच पैसे घेऊन पेपर विकल्याचे प्रकरण उघडकीस आले. काही जण प्रश्नपत्रिका एकमेकांना वितरीत करीत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई सुरू केली. तब्बल तीन लाखाला प्रश्नपत्रिका विकल्या गेली. महेश गायकवाड हा प्रश्नपत्रिका विकणाऱ्या टोळीचा म्होरक्या असून त्याच्यासह आतापर्यंत १८ आरोपींना अटक केल्याचे पोलिसांनी सांगितले.

पेपरच्या एक दिवस अगोदर म्हणजे २२ नोव्हेंबरलाच प्रश्नपत्रिका बाहेर आली. पेपर फुटीची माहिती मिळताच मुरगूड पोलिस स्ठेशनचे पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कागल तालुक्यातील सोनगे गावातील एका फर्निचरच्या दुकानात धाड टाकली. यावेळी तेथे पाच 'गुरूजी' उपस्थित होते. ते सर्व प्रश्नपत्रिकेची वाट पाहत होते. पोलिसांनी चौकशी केली असता कुणी तरी राहुल पाटील नावाचा व्यक्ती प्रश्नपत्रिका घेऊन येणार असल्याचे या गुरूजींनी सांगितले. पोलिसांनी लगोलग राहुल पाटीलला अटक केली असता त्याने महेश गायकवाडचे नाव सांगितले. प्रश्नपत्रिका भेटताच राहुल तीन लाख रुपये महेश गायकवाडला देणार होता. यानंतर सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड येथून महेशलाही अटक करण्यात आली. (वृत्तसंस्था)

#### आणखी काही जणांच्या अटकेची शक्यता

प्रश्नपत्रिका फोडणारे ही टोळी मोठी असण्याची शक्यता आहे. आतापर्यंत १८ जणांना अटक करण्यात आली असता या प्रकरणाची चौकशी अद्यापही सुरूच आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आरोपींची संख्या वाढू शकते. प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देणारे आणि लाभधारक यांची चौकशी सुरू असून आर्थिक व्यवहाराचीही सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. राहुल पाटील आणि महेश गायकवाड यांची अॅकॅडमी असून त्यांनी यापूर्वीही असेच प्रकार केल्याची शक्यता आहे.

#### आरोपी कळंब येथील कारागृहात

या प्रकरणातील रणधीर तुकाराम शेवाळे, संदीप भगवान गायकवाड, अमोल पांडुरंग जरग, स्वप्निल शंकर पोवार, गुरूनाथ गणपती चव्हाण, तेजस दीपक मुळीक, प्रणय नवनाथ सुतार,श्रीकांत नथुराम चव्हाण, संदीप शिवाजी चव्हाण, दयानंद भैरू साळवी, किरण सातापा बरकाळे, दत्तात्रय आनंदा चव्हाण, नागेश दिलीप शेंडगे, अक्षय नामदेव कुंभार, रोहित पांडुरंग सावंत, अभिजित विष्णू पाटील यांना न्यायालयीन कोठडी मिळाली असून त्यांची कळंब येथील कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

# प्रॉपर्टी एक्स्पोमध्ये बँक ऑफ बडोदाची उल्लेखनीय उपस्थिती

### घर बांधणी क्षेत्रात दमदार कामगिरी

◆ **नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील आघाडीची बँक असणाऱ्या बँक ऑफ बडोदाने यशोभूमी येथे आयोजित प्रॉपर्टी एक्स्पो दिल्ली आवृत्तीत आपली उल्लेखनीय उपस्थिती नोंदवली. बँकेच्या नेतृत्वात विशेष रूपात आयोजित आणि संचालित या प्रदर्शनात घर खरेदी करण्यास इच्छुकांसाठी विविध पर्याय उपलब्ध करून देण्यात आले. एवढेच नाही तर घर खरेदीसाठी आर्थिक सहाय्य मिळवून देण्याकरिता एक अद्वितीय व्यासपीठही प्रदान केले.




या दोन दिवसीय आयोजनात दिल्ली, गुडगाव, नोएडा, ग्रेटर नोएडा, गाझियाबाद आणि फरीदाबाद येथील जवळपास २० प्रमुख विकासक एकत्र आले होते. त्यांच्या वतीने उच्च गुणवत्तेच्या निवासी प्रकल्पांची एक विस्तृत शृंखला सादर करण्यात आली. प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी घर खरेदी करणाऱ्यांची प्रचंड गर्दी झाली होती.

योग्य आर्थिक भागीदार मिळणे ही घर खरेदी प्रक्रियेतील एक महत्त्वाची बाब असते आणि बँक ऑफ बडोदाने व्यक्तिगत कर्जविषय सल्ला,ऑन द स्पॉट सैद्धांतिक अनुमोदन आणि महिला कर्जदारांसाठी विशेष सवलतीच्या व्याजदरांसह येणाऱ्यांना योग्य मार्गदर्शन केले.

प्रदर्शनाच्या ठिकाणी गृहकर्ज घेणाऱ्यांना व्याजदरात सूटही देण्यात आली. विशेष म्हणजे, या दोन दिवसात मंजूर झालेल्या सर्व कर्जांसाठी कोणतेही प्रक्रिया शुल्क घेण्यात आले नाही. वा

# एसयूव्ही-ट्रकच्या धडकेत पाच जण ठार

◆ **जंजगीर, २६ नोव्हेंबर**

छत्तीसगडच्या जांजगीर-चंपा जिल्ह्यात एका एसयूव्ही आणि ट्रकमध्ये झालेल्या धडकेत पाच जणांचा मृत्यू झाला तर तीन जण जखमी झाले.

बुधवारी मध्यरात्री जांजगीर हद्दीतील सुकली गावाजवळ हा अपघात झाला. मृतांमध्ये सर्वजण नवागडमधील एका परिसरातील रहिवासी होते. लग्न समारंभाला उपस्थित राहून परत येत असताना ही घटना घडली. एसयूव्ही कारमधील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला तर तीन जण जखमी आहेत. जखमी झालेल्या तिघांनाही जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर आहे. मृतांची ओळख विश्वनाथ देवांगन, राजेंद्र कश्यप, पोमेश्वर जलतारे, भूपेंद्र साहू आणि कमलनयन साहू अशी झाली आहे, (वृत्तसंस्था)

# भारत, जपान तयार करीत आहेत 'थर्टी मीटर टेलिस्कोप'

### पृथ्वीच्या पलीकडे जीवनाची चिन्हे शोधणार

### कृष्णविवर, आकाशगंगांचा करता येणार अभ्यास

◆ **बंगळुरू, २६ नोव्हेंबर**

भारत आणि जपान जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी खगोलशास्त्रीय उपकरणांपैकी एक असलेला थर्टी मीटर टेलिस्कोप तयार करण्यासाठी एकत्र येत आहेत. ही अत्याधुनिक ऑप्टिकल-इन्फ्रारेड दूर्बिण आहे. यामध्ये एक भव्य ३० मीटर प्रायमरी मिरर आहे.


थर्टी मीटर टेलिस्कोप हा भारत, जपान आणि अमेरिकेतील दोन आघाडीच्या विद्यापीठांचा समावेश असलेला एक आंतरराष्ट्रीय भागीदारीचा प्रकल्प आहे. विश्वात पूर्वीपेक्षा जास्त खोलवर डोकावणे, कृष्णविवरे, दूरच्या आकाशगंगांचा अभ्यास करणे आणि सर्वात मनोरंजक म्हणजे पृथ्वीच्या पलीकडे जीवनाची चिन्हे शोधणे हे या प्रकल्पाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. खगोलशास्त्रज्ञांना दूरच्या विश्वातून अधिक प्रकाश गोळा करण्यासाठी मोठा आरसा आवश्यक आहे, असे जपानच्या टोकियो येथील कॅबिनेट ऑफिसमधील राष्ट्रीय अंतराळ धोरण समितीचे उपाध्यक्ष डॉ. साकू त्सुनेता यांनी स्पष्ट केले. आरसा जितका मोठा असेल तितके जास्त दूरच्या वस्तूंबद्दल अधिक चांगला शोध लावणे शक्य होते, असे ते म्हणाले.

सध्या जगात असलेल्या सर्व दूर्बिणींपेक्षा या थर्टी मीटर टेलिस्कोपचा आरसा सर्वात लहान आहे. यामुळे निरीक्षणांमध्ये अभूतपूर्व स्पष्टता आणि बारकावे दिसतील. एकाच मोठ्या आरशासह पारंपारिक दुर्बिणींपेक्षा वेगळे, थर्टी मीटर टेलिस्कोपसाठी महाकाय प्रायमरी मिरर तयार करण्यासाठी ५०० लहान आरशांचा वापर केला आहे. या जटिल अभियांत्रिकी कामगिरीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे.

या गोष्टींसाठीच भारताची भूमिका महत्त्वाची आहे. हा टेलिस्कोप थर्टी मीटर टेलिस्कोप हा २०३० च्या मध्यापर्यंत कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

## शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८५,६०९.५१ (+१,०२२.५०) |
| निफ्टी | २६,२०५.३० (+३२०.५०) |



## सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२५,३०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,५७,७०० |

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.६ | १८.0 |
| अमरावती | ३१.४ | १६.३ |
| भंडारा | ३०.० | १२.० |
| बुलडाणा | ३१.० | १८.५ |
| चंद्रपूर | ३०.२ | १८.२ |
| गडचिरोली | ३०.२ | १६.२ |
| गोंदिया | २९.२ | १६.२ |
| नागपूर | ३०.० | १७.६ |
| वर्धा | ३०.० | १८.० |
| वाशीम | ३३.६ | १४.० |
| यवतमाळ | ३२.० | १९.६ |

# 'दृश्य-अदृश्य'ची 'इफ्फी'मध्ये जादू

### वरोड्याचे अनिल वरखडे निर्मित मराठी चित्रपट

◆ **वरोडा, २६ नोव्हेंबर**

५६ व्या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव म्हणजेच 'इफ्फी' सध्या गोव्यात मोठ्या दिमाखात सुरू आहे. भारतीय सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकार-तंत्रज्ञांच्या उपस्थितीमुळे 'इफ्फी'ने सर्वांचे लक्ष वेधले आहे. देश-विदेशांतील विविध भाषांमधील चित्रपटांसोबत महाराष्ट्राच्या लाल मातीतील मराठी चित्रपटही जगभरातील सिनेप्रेमी आणि समीक्षकांवर मोहिनी घालत आहेत. यामध्ये वरोडा येथील अनिल वरखडे निर्मित 'दृश्य-अदृश्य' या आगळ्या विषयावर आधारलेल्या मराठी चित्रपटाने प्रेक्षकांवर जादू केली आहे.

नुकतेच 'इफ्फी'मध्ये झालेल्या 'दृश्य-अदृश्य' चित्रपटाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कौतुक केले. आरएसटी कॅनव्हास निर्मित आणि मिलिंद लेले दिग्दर्शित 'दृश्य-अदृश्य' या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटाची निवड प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी झाल्यापासून या चित्रपटाची चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे. प्रद्योत पेंढारकर, वरोड्याचे अनिल वरखडे, दत्ताजी थोरात, धनंजय थोरात,




पृथ्वीराज खेडकर, युवराज खेडकर आणि अश्विनी खेडकर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

मिलिंद लेले यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. 'इफ्फी'मध्ये 'दृश्य-अदृश्य'ची निवड होण्याचा क्षण मराठी सिनेसृष्टी, कलाकार आणि तंत्रज्ञांसाठी अभिमानाचा ठरला आहे. मराठीपासून हिंदीपर्यंत अभिनयाचा यशस्वी प्रवास करणारी अभिनेत्री पूजा सावंतने या चित्रपटात मुख्य भूमिका साकारली आहे. पूजाने साकारलेल्या व्यक्तिरेखेचे इफ्फीमध्ये खूप कौतुक झाले. चित्रपटाचा शो संपल्यानंतर प्रेक्षकांनी उभे राहून चित्रपटाच्या संपूर्ण टिमचे अभिनंदन केले आणि चित्रपट आवडल्याची पोचपावती दिली.

इफ्फीमधील इंडियन पॅनोरमा या विभागात हा चित्रपट दाखविण्यात आला. इफ्फीमध्ये 'दृश्य-अदृश्य' चित्रपटाचे चार वेळा स्क्रिनिंग करण्यात आले आणि प्रत्येक वेळी रसिकांनी भरभरून दाद दिली. आशयघन पटकथा, प्रसंगानुरूप सादरीकरण, अर्थपूर्ण संवाद, कथानकाला पोषक वातावरणनिर्मिती, कलाकारांचा सहजसुंदर अभिनय आणि मिलिंद लेले यांचे संवेदनशील दिग्दर्शन प्रेक्षकांना शेवटच्या क्षणापर्यंत खुर्चीला खिळवून ठेवणारे ठरले. 'दृश्य-अदृश्य' हा मानवी मनाच्या गूढ गाभ्यापर्यंत नेणारा एक रहस्य आणि भावनांच्या संगमातून जन्मलेला चित्रपट आहे.

आपल्या डोळ्यांना दिसणारे आणि सत्य यांच्या संभ्रमात गुरफटवून ठेवणारी पटकथा क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारी आहे. वास्तव आणि भ्रम याच्यातील सीमारेषा धूसर होत गेल्या की, सत्याचे 'दृश्य' किती 'अदृश्य' होते, हे या चित्रपटात प्रभावीपणे दाखविण्यात आले आहे. पूजा सावंतच्या जोडीला या चित्रपटात अशोक समर्थ, हार्दिक जोशी आणि अक्षया गुरव आदी लोकप्रिय कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. (तभा वृत्तसेवा)

# पान मसाला व्यापाऱ्याच्या सुनेची आत्महत्या

### डायरीमध्ये सापडला भांडणाचा उल्लेख

◆ **नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

देशातील प्रसिद्ध पान मसाला कंपनी 'कमला पसंद' आणि 'राजश्री'चे मालक कमल किशोर चौरसिया यांची सून दीप्ती चौरसिया (४०) यांनी दिल्लीतील वसंत विहार येथील त्यांच्या घरी मंगळवारी संध्याकाळी आत्महत्या केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीप्तीचा मृतदेह पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळला.

पोलिसांना एक डायरी मिळाली आहे, ज्यात दीप्तीने तिचा पती हरप्रीत चौरसियासोबतच्या वादाचा उल्लेख केला आहे. डायरीत लिहिले आहे की, जर एखाद्या नात्यात प्रेम आणि विश्वास नसेल, तर त्या नात्यात राहण्याचे आणि जगण्याचे कारण काय?

दीप्तीचे २०१० मध्ये कमल किशोर यांचा मुलगा हरप्रीत चौरसियासोबत लग्न झाले होते. त्यांना १४ वर्षांचा एक मुलगा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हरप्रीतने दोन विवाह केले आहेत. दुसरी पत्नी दक्षिण भारतीय चित्रपटांमधील अभिनेत्री आहे. (वृत्तसंस्था)



संसदेच्या मध्यवर्ती दालनात बुधवारी संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी घटनेच्या प्रास्ताविकेचे वाचन करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय मंत्री जेपी नड्डा, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायणसिंह

# राजकीय पक्ष भीती निर्माण करताहेत



## एसआयआयवर सुप्रीम कोर्टात सुनावणी

◆ **नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

बिहार, केरळ, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये मतदार याद्यांच्या सुरू असलेल्या विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) बाबत राजकीय पक्ष अनावश्यक भीती आणि गोंधळ पसरवण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे निवडणूक आयोगाने बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सांगितले.

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या न्यायासनासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. या याचिकांमध्ये एसआयआरच्या वैधतेला आव्हान देण्यात आले आहे आणि काही पक्षांनी ते स्थगित करण्याची मागणी केली आहे. केरळ सरकारने दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे की, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसोबत एसआयआर केल्याने प्रशासनावर जास्त भार पडेल आणि निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोगाला १ डिसेंबरपर्यंत त्यांचे उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २ डिसेंबर रोजी होईल.

केरळ सरकारव्यतिरिक्त सीपीआय(एम), सीपीआय आणि आययूएमएल नेते पी. के. कुन्हालिकुट्टी यांनीही एसआयआरच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या स्वतंत्र याचिका दाखल केल्या आहेत. न्यायालयाने २१ नोव्हेंबर रोजी यावर नोटीस बजावली.

सर्वोच्च न्यायालयाने इतर राज्यांमध्ये एसआयआरला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणीसाठी तारखा निश्चित केल्या आहेत. तामिळनाडूसंदर्भातील सुनावणी ४ डिसेंबर रोजी तर पश्चिम बंगालची सुनावणी ९ डिसेंबर रोजी होणार आहे.

निवडणूक आयोगाने प्रथम जून २०२५ मध्ये बिहारमध्ये लागू करण्याचे आदेश दिले. याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या, परंतु न्यायालयाने प्रक्रियेला स्थगिती दिली नाही. असे असूनही, २७ ऑक्टोबर रोजी निवडणूक आयोगाने एसआयआरची व्याप्ती वाढवली आणि तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि केरळसह अनेक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ती लागू केली. त्यानंतर तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये एसआयआरला कायदेशीर आव्हाने दाखल करण्यात आली, ज्यावर सर्वोच्च न्यायालयाने ११ नोव्हेंबर रोजी नोटीस बजावली. **(वृत्तसंस्था)**

### तत्काळ धोका नाही

» सर्वोच्च न्यायालयात निवडणूक आयोगाने म्हटले की, एसआयआर ही मतदार यादी अधिक अचूक बनवण्याच्या उद्देशाने एक नियमित आणि आवश्यक प्रक्रिया आहे. आयोगाने असाही युक्तिवाद केला की, राजकीय पक्ष तथ्ये अतिशयोक्तिपूर्ण करत आहेत आणि मतदारांमध्ये अनावश्यक भीती निर्माण करत आहेत.

## बद्रीनाथ मंदिराचे दरवाजे झाले बंद

◆ **चामोली, २६ नोव्हेंबर**

चार धाम यात्रेतील सर्वात महत्त्वाचे तीर्थस्थळ मानले जाणारे बद्रीनाथ धामचे दरवाजे बंद झाले आहेत. दरवाजे बंद होण्यापूर्वी, पंचपूजेच्या चौथ्या दिवशी माँ लक्ष्मी मंदिरात विशेष पूजा करण्यात आली. यानंतर, देवी लक्ष्मीला बद्रीनाथच्या गर्भगृहात राहण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.



बद्रीनाथ धाम बंद होण्याच्या चार दिवस आधी, २१ नोव्हेंबरला पंच पूजा (पाच दिवसांची धार्मिक पूजा) सुरू झाली. गणेश मंदिर, आदि केदारेश्वर आणि आदि गुरु शंकराचार्य गादी स्थळ यांचे दरवाजे देखील विधीपूर्वक बंद करण्यात आले. मंदिरात वैदिक स्तोत्रांचे पठण देखील झाले. सोमवारी, देवी लक्ष्मी मंदिरात विशेष पूजा करण्यात आली. उन्हाळ्याच्या सहा महिन्यांत, देवी लक्ष्मी तिच्या निवासस्थानी वास करते, परंतु हिवाळ्यात, ती मुख्य मंदिराच्या गर्भगृहात राहते. परिणामी, मंदिराचे दरवाजे बंद असतात. या ऐतिहासिक आणि भावनिक समारोप समारंभाचे साक्षीदार होण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. **(वृत्तसंस्था)**

# शांतता करार अमान्य केल्यास अमेरिकेकडून मदत नाही

## ट्रम्प यांनी झेलेन्स्कींना सुनावले, युद्ध थांबविण्यासाठी २८ कलमी योजना स्वीकारावीच लागणार

◆ **वॉशिंग्टन, २६ नोव्हेंबर**

युक्रेनला अमेरिकेची मदत हवी असल्यास त्यांनी प्रस्तावित २८ कलमी योजना स्वीकारून शांतता करार मान्य करावा. राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी शांतता कराराला मान्यता दिल्यावरच मी त्यांना भेटणार असल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.

पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, झेलेन्स्की हवे असल्यास मला भेटू शकतात, परंतु त्यांना आधी शांतता करार मान्य करावा लागेल. २८ कलमी योजनेसंदर्भात आमच्यात चांगली चर्चा सुरू आहे. या करारामुळेच युक्रेन-रशिया संघर्ष थांबवणे शक्य होणार आहे. युक्रेनसमोर आता कुठलाही पर्याय उरलेला नाही, त्यांनी विषयाला अधिक ताणू नये. मी त्यांनी करार मान्य करण्यासाठी २८ नोव्हेंबरपर्यंतचा वेळ दिला आहे, त्यांनी निर्णय घेण्यास विलंब केल्यास मी काहीही करू शकणार नाही. शांतता करार दोन्ही बाजूंसाठी सर्वोत्तम आहे आणि यामुळे युद्ध थांबेल. पुतिन आणि युक्रेनियन अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी अमेरिकन राजदूत पाठवण्यात आले आहेत. युरोपियन देशही चर्चेत सहभागी आहेत. मला कोणत्याही परिस्थितीत युद्ध संपवायचे आहे, दोन्ही देशातील नागरिकांचे बळी जात आहेत. शेकडो सैनिक मारले जात आहेत. **(वृत्तसंस्था)**



### युरोपीय नेत्यांकडून चिंता

» युक्रेन-रशिया युद्ध थांबविण्यासाठी ट्रम्प यांनी सादर केलेल्या योजनेवर फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन म्हणाले, शांतता चर्चा एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचली आहे आणि ती पुढे नेण्याची वेळ आली आहे. मात्र यातील काही अटींवर आम्ही सहमत नाही. ब्रिटिनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांनी म्हटले, की झेलेन्स्की बहुतांश मुद्यांवर सकारात्मक असले तरी, त्यांनी युक्रेनचा प्रदेश रशियाला देण्यास असहमती दर्शवली आहे.

### सहमती मिळविण्याचे प्रयत्न

» रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी ट्रम्प यांच्या २८कलमी शांतता योजनेला पाठिंबा दिला आणि म्हटले, की ही योजना युद्धबंदीचा आधार म्हणून काम करू शकते. तथापि, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की हा करार स्वीकारण्यास तयार नाही, कारण, या करारानुसार, युक्रेनला त्यांच्या भूभागाचा मोठा भाग रशियाला द्यावा लागेल आणि नाटोमध्ये सामील होण्याचा त्यांचा हेतूही सोडून द्यावा लागेल.

# निवडणूक अधिकाऱ्यांना धोका

## आयोगाचे बंगाल पोलिसांना पत्र

◆ **नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या एसआयआर दरम्यान निवडणूक आयोगाने कोलकाता पोलिसांना पत्र लिहून निवडणूक अधिकाऱ्यांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली आहे. निवडणूक आयोगाने कोलकाता पोलिस आयुक्तांना पत्र लिहून डयुटीवर तैनात असलेल्या निवडणूक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यास सांगितले आहे.

२४ नोव्हेंबर रोजी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कार्यालयाच्या सुरक्षेत भंग झाल्याचे समोर आले आहे. याशिवाय मुख्य निवडणूक आयुक्त, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, संयुक्त मुख्य निवडणूक अधिकारी आणि उपमुख्य निवडणूक अधिकारी यांच्या सुरक्षेतही तडजोड करण्यात आली आहे, असेही पत्रात म्हटले आहे.

निवडणूक आयोगाने या घटनेची आधीच दखल घेतली आहे. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची सुरक्षा देणे आवश्यक आहे. त्यांच्या कार्यालय आणि निवासस्थानावर सुरक्षा मजबूत केली पाहिजे. एसआयआर प्रक्रिया आणि डेटा संरक्षित करण्यासाठी पुरेसे सुरक्षा उपाय केले पाहिजेत. निर्देशानंतर उचललेल्या पावलांची माहिती ४८ तासांच्या आत द्यावी, अशी विनंती निवडणूक आयोगाने केली आहे.

सोमवारी बीएलओ हक्क संरक्षण समितीच्या शेकडो सदस्यांनी कॉलेज चौकापासून सीईओ कार्यालयापर्यंत मोर्चा काढला आणि धरणे आंदोलन केले. पोलिस मानवी अडथळ्याप्रमाणे पहारा देत असतानाही, काहींनी गेट तोडण्याचा प्रयत्न केला. **(वृत्तसंस्था)**

# नकली तूप विकणाऱ्या टोळीचे सूत्रधार पकडले

◆ **बंगळूर, २६ नोव्हेंबर**

बंगळूरू पोलिसांनी एक मोठे यश मिळविले आहे. बनावट नंदिनी तूप रॅकेटचा पर्दाफाश केल्यानंतर काही दिवसांतच त्यांनी त्याचा सूत्रधार अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवकुमार आणि त्यांची पत्नी रम्या यांना बुधवारी ताब्यात घेण्यात आले. याआधी या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या इतर चार आरोपींनाही अटक करण्यात आली होती.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, शिवकुमार दाम्पत्य कर्नाटक मिल्क फेडरेशनच्या लोकप्रिय नंदिनी ब्रँडचा वापर करून बनावट तुपाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करणारे एक उत्पादन युनिट चालवत होते.

अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, माहिती मिळाल्यावर, केंद्रीय गुन्हे शाखेच्या पथकाने या सुविधेवर छापा टाकला आणि त्यांना उच्च तंत्रज्ञानाच्या यंत्रसामग्रीचा संपूर्ण संच आढळला. आरोपी मूळसारखे दिसणारे बनावट नंदिनी तुपाचे पॅकेट तयार करण्यासाठी उच्च तंत्रज्ञानाच्या औद्योगिक उपकरणांचा वापर करीत होते. घटनास्थळावरून सर्व यंत्रसामग्री आणि उपकरणे जप्त करण्यात आली आहेत.

त्यानुसार, १४ नोव्हेंबर रोजी सीसीबीच्या विशेष पथकाने आणि केएमएफ दक्षता शाखेच्या संयुक्त पथकाने एका गुप्त माहितीच्या आधारे पाळत ठेवण्यास सुरुवात केली. चामराजपेट्या नानजांबा अग्रहारा परिसरातील कृष्णा एंटरप्रायझेसच्या गोदामांवर आणि दुकानांवर एकाच वेळी छापे टाकण्यात आले. तामिळनाडूहून भेसळयुक्त पॅकेज्ड तूप घेऊन जाणाऱ्या एका वाहनावरही एकाच वेळी छापा टाकण्यात आले. एकूण १.२६ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली. त्यात ८१३६ लिटर भेसळयुक्त तूप (अंदाजे ५६.९५ लाख किमतीचे), बनावट तूप तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व मशीन, भेसळ करण्यासाठी वापरले जाणारे नारळ तेल आणि पाम तेल, ५ मोबाईल फोन, १.१९ लाख रोख आणि चार बोलेरो पिकअप ट्रक आदींचा समावेश आहे. **(वृत्तसंस्था)**

# धर्मध्वजारोहणाने पाकिस्तानचा जळफळाट

◆ **इस्लामाबाद, २६ नोव्हेंबर**

अयोध्येतील राम मंदिरावरील धर्मध्वजारोहणामुळे पाकिस्तानचा जळफळाट झाला असून त्यांनी संयुक्त राष्ट्रांत यावर आक्षेप घेतला. भारतात अल्पसंख्यकांच्या अधिकारांना दडपले जात आहे आणि अयोध्येत मंदिर उभारणे हा मुस्लिम वारसा मिटवण्याच्या प्रयत्नाचा भाग असल्याचा आरोप केला आहे.

संयुक्त राष्ट्रांतील पाकिस्तानच्या राजदूताने ज्या ठिकाणी पूर्वी बाबरी मशीद होती, तिथे आता राम मंदिर बांधण्यात आले आहे. बाबरी मशीद अनेक शतके जुने धार्मिक स्थळ होते. ६ डिसेंबर १९९२ रोजी जमावाने ते पाडले. भारताच्या न्यायालयांनी या प्रकरणात ज्या लोकांवर आरोप होते, त्यांना निर्दोष मुक्त केले आणि त्याच जमिनीवर मंदिर बांधण्याची परवानगी दिली. हे अल्पसंख्यकांसोबतच्या भेदभावाचे मोठे उदाहरण आहे. भारतात धार्मिक अल्पसंख्याक, विशेषतः मुस्लिमांवर दबाव वाढत आहे. भारतातील अनेक ऐतिहासिक मशिदी धोक्यात आहेत आणि मुस्लिमांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या बाजूला सारले जात आहे. जगाने भारतात वाढत्या मुस्लिमांवरील हल्ल्यांकडे लक्ष द्यावे आणि संयुक्त राष्ट्रे आणि आंतरराष्ट्रीय संघटनांनी अल्पसंख्यांकांच्या धार्मिक स्थळांच्या आणि त्यांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी पावले उचलावीत. **(वृत्तसंस्था)**

# कोठडीतील मृत्यू स्वीकारार्ह नाहीत : सर्वोच्च न्यायालय



◆ **नवी दिल्ली, २५ नोव्हेंबर**

पोलिस कोठडीत होणारे मृत्यू हे व्यवस्थेवर डाग आहेत आणि आता देश ते सहन करणार नाही, असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाने अशा घटनांवर तीव्र आक्षेप नोंदवला. तसेच सर्व राज्ये आणि केंद्राकडून पोलिस ठाण्यांमध्ये सीसीटीव्हीबाबत मागवलेला अहवाल सादर न केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या न्यायासनाने सांगितले की, जर १६ डिसेंबरपर्यंत अहवाल आला नाही, तर संबंधित राज्यांचे मुख्य सचिव आणि केंद्रीय संस्थांच्या संचालकांना न्यायालयात स्वतः हजर राहावे लागेल आणि विलंबाचे कारण सांगावे लागेल.

सप्टेंबर २०२५ मधील एका अहवालात असे म्हटले होते की, राजस्थानमधील पोलिस ठाण्यांमध्ये आठ महिन्यांत ११ कोठडीतील मृत्यू झाले होते. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने सप्टेंबरमध्ये या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली होती आणि १४ ऑक्टोबर रोजी सर्व राज्यांकडून पोलिस ठाण्यांमध्ये सीसीटीव्हीबाबत अहवाल मागवला होता.

राजस्थानमधील पोलिस कोठडी संबंधित अहवालावर ४ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली होती. **(वृत्तसंस्था)**

## चुराचंदपूरमध्ये शस्त्रे जप्त

**इम्फाळ :** मणिपूरच्या चुराचंदपूर जिल्ह्यातील वनक्षेत्रात सुरक्षा दलांनी शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्यांचा साठा जप्त केला आहे. एका गोपनिय माहितीच्या आधारे, पोलिस, बीएसएफ, सीआरपीएफ आणि लष्कर जवानांच्या संयुक्त पथकाने बोल्जो वनक्षेत्रात शोध मोहीम राबवली आणि शस्त्रे जप्त केली, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. जप्त केलेल्या वस्तूंमध्ये सात सुधारित प्रोजेक्टाइल लाँचर, सात देशी बनावटीच्या सिंगल-बॅरल रायफल, दोन देशी बनावटीच्या पिस्तूल आदींचा समावेश आहे.

## चित्रपट वार्ता

### कॅटरिनाची कंपनी फायद्यात तर दीपिकाची तोट्यात

**मुंबई :** आजकाल बहुतांश कलाकार अभिनयासोबतच एखाद्या व्यवसायात उतरतात. पुढील काळाच्या दृष्टीने सावध पाऊल म्हणून हा निर्णय अतिशय स्तुत्य आहे. काही कलाकारांनी हॉटेल सुरू केले तर काहींनी स्वतःचे काही ब्रँड तयार केले. कॅटरिना कैफने मेकअप ब्रँड सुरू केला होता. अवघ्या तीन वर्षात या ब्रँडने चांगली कमाई सुरू केली आहे. तिचा ब्रँड नायकासोबत भागीदारीत सुरू आहे. या कंपनीचा महसूल ८८ कोटी झाला असून त्याचा नफा ११ कोटींहून अधिक आहे. याउलट, दीपिकाच्या सौंदर्य प्रसाधन कंपनीला तोटा सहन करावा लागत आहे. वर्षभरात कंपनीच्या कमाईत ३० टक्क्यांहून अधिकची घट झाली आहे.



### धर्मेंद्रच्या वाढदिवशी पाहा 'ओरिजनल शोले'





**मुंबई :** नुकतेच अभिनेता धर्मेंद्र यांचे निधन झाले. त्यांचे चाहते अतिशय दुःखी असतानाच त्यांना काहीसा दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. यंदा 'शोले' चित्रपटाला ५० वर्षे पूर्ण होताहेत. या निमित्ताने धर्मेंद्र यांच्या वाढदिवशी म्हणजे १२ डिसेंबर रोजी कोणतेही बदल न केलेला 'ओरिजनल शोले' चित्रपट देशभरात प्रदर्शित होणार आहे. देशातील १५०० हून अधिक ठिकाणी शोले फायनल कट दाखवला जाणार आहे. म्हणजेच कोणताही बदल न करता 'शोले' नव्याने प्रदर्शित केला जाईल. मुळात, १९७५ मध्ये आणिबाणी लागू झाल्याने सेन्सॉरशिप होती. त्या कारणाने चित्रपटाचा शेवट बदलण्यात आला होता. म्हणजे आता जो 'शोले' प्रदर्शित होईल तो अस्सल स्वरूपातील राहणार आहे.

# इथियोपियात १२ वाजता होतो सूर्योदय!


## तीन हजार वर्षांची परंपरा, स्वतःची दिनदर्शिका

◆ **अदिस अबाबा, २६ नोव्हेंबर**

इथियोपियाच्या अफार प्रदेशातील एक ज्वालामुखी १२ हजार वर्षांनंतर सक्रिय झाल्याने आशिया आणि आफ्रिकेतील अनेक देशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्वालामुखीच्या उद्रेका दरम्यान १४ किलोमीटर उंच राख आणि धुराचे दाट ढग उठले. या देशाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे दुपारी १२ वाजता सूर्योदय होतो, असे मानले जाते.

इथियोपिया हा पूर्व आफ्रिकेच्या हॉर्न क्षेत्रामध्ये स्थित एक प्राचीन देश आहे. तो लाल समुद्राच्या नैऋत्येस, इरिट्रिया, जिबूती, सोमालिया, केनिया आणि दक्षिण सुदानने वेढलेला आहे. हा आफ्रिकेतील एकमेव असा देश आहे जिथे कधीही युरोपीय सत्तेखाली नव्हता. विशेष म्हणजे इथियोपिया या देशाला तीन हजार वर्षांची परंपरा, स्वतःची दिनदर्शिका, स्वतःची भाषा आणि स्वतंत्र संस्कृती आहे. इथियोपिया समाज अत्यंत वैविध्यपूर्ण आहे. येथे ८० हून अधिक वांशिक गट राहतात. प्रत्येकाची स्वतःची भाषा आणि संस्कृती आहे. ६० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या ख्रिश्चन आहे. ते जगातील सर्वात जुन्या ख्रिश्चन समुदायांपैकी एक आहे. या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य म्हणजे वर्षात १३ महिने असतात. यामध्ये १३ वा महिना हा पाच दिवसांचा असतो. लीप इयरमध्ये हा महिना ६ दिवसांचा होतो.

इथियोपियामध्ये, प्रत्येक महिना अगदी ३० दिवसांचा असतो. म्हणजे १२ महिने गुणिले ३० दिवस = ३६० दिवस. उर्वरित पाच दिवस एका वेगळ्या लहान महिन्यात जोडले जातात. याला पॅगुमेन म्हणतात. लीप वर्षात, इथिओपियामध्ये १३ वा महिना सहा दिवसांचा असतो. यामुळे एकूण महिन्यांची संख्या १३ होते. हे कॅलेंडर पूर्णपणे सौर-आधारित आहे. इथिओपियातील घड्याळ मोजणी जगभरातील पद्धतीपेक्षा पूर्ण वेगळी आहे. ते वेळेची गणना सूर्योदयापासून करतात. सूर्योदय साधारण ६ वाजता होत असला तरी इथिओपियन वेळेनुसार तो १२:०० वाजता मानला जातो. म्हणूनच इथिओपियन वेळ आणि जगातील वेळ यात मोठा फरक पडतो. **(वृत्तसंस्था)**



### देशात वेळ आहे स्थिर

» **इथिओपिया हा आधुनिक जगात एक असा देश आहे जिथे वेळ स्थिर आहे. संस्कृती प्राचीन आहेत आणि जीवन जगाच्या इतर भागांपेक्षा वर्षानुवर्षे मागे आहे. इथिओपियाने जाणीवपूर्वक आपली प्राचीन ओळख, वेळेचे नियोजन, दिनदर्शिका आणि जीवनशैली जपली आहे. हा जगातील एकमेव देश आहे, जो अजूनही स्वतःची दिनदर्शिका पाळतो. ते येशू ख्रिस्ताच्या जन्मापासून ७ ते ८ वर्षे मागे आहे. त्याला गीझ कॅलेंडर म्हणतात. येथे, सध्या २०१८ आहे.**

# काँग्रेसच्या सात नेत्यांची हकालपट्टी

## बिहारचा पराभव जिव्हारी

◆ **पाटणा, २६ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएने शानदार विजय मिळवला आहे. काँग्रेस आणि आरजेडीचा दारूण पराभव झाला आहे. या पराभवामुळे दोन्ही पक्षांतील अंतर्गत वाद आता समोर आला आहे. अशातच आता काँग्रेस पक्षाने मोठी कारवाई करत सात नेत्यांची सहा वर्षासाठी हकालपट्टी केली आहे.

पक्षाचे मुख्य प्रवक्ते राजेश राठोड यांनी एक निवेदन जारी करत ही माहिती दिली आहे. बिहार प्रदेश काँग्रेस शिस्तपालन समितीने सात नेत्यांवर कठोर कारवाई केली आहे. पक्षाच्या मुख्य तत्त्वाबद्दल, शिस्त आणि संघटनात्मक शिष्टाचाराबद्दलच्या हलगर्जीपणाबद्दल आणि पक्षाच्या व्यासपीठाबाहेर वारंवार दिशाभूल करणारी विधाने केल्याबद्दल त्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात आले आहे.

शिस्तपालन समितीने निलंबनाची कारवाई करताना असं म्हटलं की, या सर्व नेत्यांनी सातत्याने पक्ष व्यासपीठाबाहेर काँग्रेसच्या निर्णयांविरुद्ध भाष्य केले होते. तसेच प्रिंट आणि सोशल मीडियावर तिकीट खरेदी केल्याचे आरोप करत पक्षाच्या प्रतिष्ठेला गंभीर नुकसान पोहोचवले होते, त्यामुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. तसेच समितीने हेही सांगितले की, पक्षाने पूर्णपणे पारदर्शकरित्या निरीक्षकांची नियुक्ती, अधिकृत उमेदवारांची घोषणा केली होती. मात्र, या नेत्यांनी त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. **(वृत्तसंस्था)**

### आदेश बांदेकरांची सून होणार पूजा बिरारी

**मुंबई :** सध्या मराठी मनोरंजन जगतात कलाकारांच्या लग्नाचा धूमधडाका सुरू आहे. नुकतीच अभिनेत्री मेघन जाधव आणि अनुष्का पिंपुटकर यांनी लगीनगाठ बांधली तर २९ नोव्हेंबर रोजी सूरज चव्हाण लग्न करणार आहे. अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड २ डिसेंबर रोजी लग्न करणार आहे. सोबतच सर्वांचे लाडके भावोजी आदेश बांदेकरांच्या घरीही सनईचे सूर निनादणार आहेत. आदेश बांदेकरांचा मुलगा सोहम याचे लग्न अभिनेत्री पूजा बिरारी हिच्यासोबत होणार आहे. ती सध्या 'येड लागलं प्रेमाचं' या मालिकेत काम करत असून मालिकेच्या सेटवरच तिचे केळवण पार पडले. आदेश बांदेकरांच्या कुटुंबाचेही त्यांच्या मित्रमंडळींनी नुकतेच केळवण केले. आदेश बांदेकरांचा मुलगा सोहम सध्या निर्मिती क्षेत्रात असून बांदेकर प्रॉडक्शनचे काम पाहत आहे.



## अग्रलेख...

# पाच शतकांच्या संघर्षाची अलौकिक फलश्रुती

''शिखरं यस्य देवस्य ध्वजेन विराजिते।
तत्र देवाः तिष्ठन्ति सर्वकामप्रदायकाः ॥''

मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५, मार्गशीर्ष शुक्ल पंचमीचा दुर्मिळ असा संयोग साधत, अभिजित मुहूर्तावर अयोध्येच्या श्रीराम मंदिरावर धर्मध्वजा फडकली. ही तिथी त्रेतायुगातील श्री राम-सीतेच्या विवाहाशी संबंधित आहे. मंगळ हा पृथ्वीचा पुत्र म्हणून भावाने करावयाच्या विधीसाठी सीतेच्या विवाहात पुढे सरसावला होता, अशी आख्यायिका आहे. श्रीराम मंदिराची धर्मध्वजा गगनी विराजमान झाली तोही दिवस मंगळवारच. या अर्थाने हा दुग्धशर्करा योग आहे, जो पवित्र कार्याची सिद्धी दर्शवितो. अयोध्या नगरीत ही जी पावन स्मृती अंकित झाली आहे, ती केवळ एका मंदिराच्या शिखरावरील ध्वजारोहण सोहळ्याची नव्हे. तब्बल ५०० वर्षांच्या प्रदीर्घ 'यज्ञा'ची ती पूर्णाहुती व फलश्रुतीही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या शुभ हस्ते शरयूच्या तीरावर, श्रीराम मंदिराच्या १९१ फूट उंच शिखरावर 'धर्मध्वज' मोठ्या दिमाखाने फडकला तेव्हा कोट्यवधी रामभक्तांच्या नेत्रांतून केवळ कृतार्थता आणि कृतज्ञतेचे अश्रू ओघळले. हे प्रतीक दगड-मातीचे बांधकाम पूर्ण झाल्याचे नाही. भारताच्या सुप्त सांस्कृतिक स्मृतीचा, आत्मसन्मानाचा, अस्मितेचा आणि 'धर्मो रक्षति रक्षितः' या तत्त्वज्ञानाच्या विजयाचा हा शंखनाद आहे.

हा धर्मध्वज ज्या शिखरावर विराजमान झाला आहे, त्याच्या पायथ्याशी सुमारे ५०० वर्षांचा धगधगता संघर्ष दडला आहे. १५२८ मध्ये मोगल शासक बाबरचा सेनापती मीर बाकी याने, प्रभू श्रीरामचंद्रांच्या जन्मस्थानाचे पवित्र मंदिर उद्ध्वस्त करून त्यावर बाबरी मशीद बांधली. या संघर्षाची बीजे रोवली गेली ती तेव्हापासूनच. तो संघर्ष केवळ जमिनीच्या तुकड्यासाठी नव्हता, तर 'आस्था' आणि 'अनास्था' यांच्यातला होता. भारताच्या आत्म्यावरचे ते आक्रमण होते. श्री रामभक्तांनी तेव्हापासूनच रामजन्मभूमी मुक्त करण्यासाठी अविरत संघर्ष केला, प्रसंगी बलिदानही दिले. इतिहासातील नोंदीनुसार, या संपूर्ण काळात तब्बल ७६ मोठे संघर्ष झालेत आणि असंख्य कारसेवकांचे, साधू-संतांचे रक्त सांडले. १८५३ मध्ये हिंदू आणि मुस्लिम समाजात पहिला मोठा वाद झाला. त्यानंतर १८८५ मध्ये महंत रघुबर दास यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. ९० च्या दशकात विश्व हिंदू परिषदेच्या नेतृत्वात श्री रामजन्मभूमी आंदोलन उभे राहिले. 'श्री रामलला हम आयेंगे, मंदिर भव्य बनायेंगे' ही घोषणा देशव्यापी झाली. मग ६ डिसेंबर १९९२ ची घटना असो वा त्यानंतरचा न्यायालयीन लढा, प्रत्येक टप्पा हा या यज्ञातील एका आहुतीसारखाच होता. ५०० वर्षांच्या संघर्षाचा निर्णायक क्षण आला तो ९ नोव्हेंबर २०१९ रोजी. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक आणि एकमताने निर्णय देत, वादग्रस्त जमीन श्रीराम मंदिराला देण्याचा स्पष्ट आदेश दिला. त्यानंतर ५ ऑगस्ट २०२० रोजी पंतप्रधान मोदींच्या हस्ते या भव्य मंदिराचे भूमिपूजन झाले आणि बांधकाम सुरू झाले.

येथे एक गोष्ट आवर्जून सांगितली पाहिजे. ती अशी की, प्राप्त भूमी श्रीरामाच्या पुरातन मंदिराचीच आहे का, असा जो प्रश्न इरफान हबीबसारख्या कट्टर मुस्लिम व्यक्तीने आणि समाजवाद्यांनी विचारला होता, त्यास तत्कालीन भारतीय पुरातत्त्व विभागाचे विभागीय संचालक पद्मश्री के. के. मुहम्मद यांनी दिलेले समर्पक उत्तर ही चपराकच होय. ज्यांनी अयोध्येत केलेल्या उत्खननाला आधार मानून सर्वोच्च न्यायालयाने हा ऐतिहासिक निकाल दिला, त्या चमूत महत्त्वाची भूमिका बजावणारे के. के. मुहम्मद यांनी २०२० मधील 'तरुण भारत'च्या दिवाळी विशेषांकाला मुलाखत देताना सांगितले होते की, ''अयोध्या प्रकरणात मुस्लिम समुदायातील एक वर्ग माझा प्रचंड तिरस्कार करीत होता. त्यात विशेषतः जेएनयु, अलीगड येथील साम्यवादी इतिहासकार होते. ज्यांत इरफान हबीब अग्रणी होते. खरे तर, मुस्लिम समाजातील मोठ्या वर्गाला रामजन्मभूमीची ती जागा हिंदूंसाठी सोडावी असेच वाटत होते. परंतु, इरफान हबीबसारखे लोक त्याला सातत्याने विरोध करीत होते. हिंदूंच्या आराध्यासाठी ती जागा सोडून आपल्या दातृत्वाचा परिचय देण्याची संधी मुस्लिमांनी गमावली असेच मी म्हणेन. तसे घडले असते तर हिंदू-मुस्लिम संबंधाचा एक नवा अध्याय या देशात लिहिला गेला असता.'' त्या मुलाखतीत मुहम्मद असेही म्हणाले होते की, १९७८-८० चा तो काळ होता जेव्हा आम्ही बाबरी मशिदीत प्रवेश केला. तेव्हा आम्हाला असे दिसले की मशीद ज्या स्तंभांवर उभी आहे, ते स्तंभ तर हिंदू मंदिराचेच आहेत. कोणत्याही प्राचीन हिंदू मंदिराची ओळख म्हणजे मंदिराच्या खाली आठ कलश ठेवले असतात. त्याला अष्ट मंगल चिन्ह असे म्हणतात. अयोध्येत हे कलश सापडले होते. तेथील उत्खननात मंदिराचे असे अनेक खांब सापडले, ज्यांची संख्या पन्नासावर होती आणि ते सतरा रांगांमध्ये होते. याचाच अर्थ, तिथे मशिदीपूर्वी एक विशाल मंदिर होते. विशेष म्हणजे, साधारण २६३ मूर्ती त्यात आढळून आल्या. त्या ठिकाणी मशीद आधीपासून असती, तर मूर्ती मिळणे केवळ अशक्य होते. याशिवाय सर्वांत महत्त्वाचा पुरावा म्हणजे या उत्खननात सापडलेला शिलालेख. मध्ययुगीन काळात अशा अनेक चुका मुस्लिम आक्रमकांकडून घडल्या आणि त्या चुका आम्ही मान्य केल्या पाहिजेत. पण त्याचवेळी त्या आक्रमकांच्या चुकांसाठी वर्तमानातील मुस्लिमांना दोषी धरू नये. परंतु, काही अतिवादी मुस्लिम त्या चुकांची माफी मागण्याऐवजी त्याचे समर्थन करतात हे चुकीचे आहे.

२२ जानेवारी २०२४! भारतीय संस्कृती व अध्यात्माच्या दृष्टीने सुवर्ण दिवस अखेर उजाडला. याच दिवशी, अभिजित मुहूर्तावर सावळ्या बालस्वरूपातील श्री रामललाची 'प्राणप्रतिष्ठा' झाली. प्राणप्रतिष्ठा हा केवळ मूर्ती स्थापनेचा विधी नसतो, तर तो त्या मूर्तीच्या चैतन्याचा विधी असतो. या विधीने मंदिराच्या गर्भगृहाला आध्यात्मिक सामर्थ्य प्राप्त झाले. श्री रामभक्तांच्या ४९६ वर्षांच्या तपश्चर्येची ती पहिली मोठी फलश्रुती ठरली. या सोहळ्यामुळे जगभरातील रामभक्तांच्या हृदयमंदिरात 'रामराज्य' स्थापनेची एक नवी आस जागली. त्यानंतरच्या अवघ्या २२ महिन्यांत, २५ नोव्हेंबर रोजी 'धर्मध्वजारोहण' झाले. हे ध्वजारोहण मंदिराच्या बांधकामाची 'औपचारिक समाप्ती' दर्शविणारे नाही. ते या संपूर्ण मंदिर परिसंस्थेचे 'आध्यात्मिक सक्रियण' दर्शविणारे आहे. २२ फूट लांब आणि ११ फूट रुंद आणि ४२ फूट उंचीच्या दंडातल्या या धर्मध्वजावर अंकित 'सूर्य' हे तेज, शौर्य आणि अविरत ऊर्जेचे, 'ॐ' हे वैश्विक नाद आणि आध्यात्मिक शक्तीचे आणि 'कोविदार वृक्ष' हे शाश्वत नीती, ज्ञान आणि परोपकाराच्या आदर्श 'रामराज्या'चे प्रतीक आहे.

डॉ. मोहनजी भागवत यांनी, या क्षणाला 'दीर्घकाळ जपलेले स्वप्न' असे म्हटले, तर पंतप्रधान मोदींनी 'शेकडो वर्षांच्या वेदनांवरील उपचार' असे या धर्मध्वजारोहण सोहळ्याचे वर्णन केले. हे ध्वजारोहण श्रीराम मंदिराच्या 'सार्वभौमत्वाचा' सार्वजनिक उद्घोष आहे. हा 'धर्मध्वज' आता भारताच्या सांस्कृतिक अवकाशातील एक तेजस्वी ध्रुवतारा असेल. हे ऐतिहासिक यश केवळ हिंदू समाजाचे नाही, तर हे भारताच्या न्यायप्रणालीचे, लोकशाहीच्या संयमाचे आणि 'वसुधैव कुटुंबकम्' या आदर्शावर विश्वास ठेवणाऱ्या समस्त राष्ट्र-पुरुषांच्या धैर्याचे आहे. ज्यांनी आपला वेळ, श्रम आणि आयुष्याचा होम केला अशा कोट्यवधी कारसेवकांच्या त्यागाची ही फलश्रुती आहे. अयोध्या आता केवळ एक धार्मिक नगरी नव्हे, तर ती जागतिक स्तरावर भारताच्या सांस्कृतिक सभ्यतेच्या परंपरेची राजधानी म्हणून उदयास आली आहे. ५०० वर्षांचा संघर्षमय अध्याय पूर्ण करून, विकसित बनण्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या भारताला या ध्वजारोहणाने नवी ऊर्जा दिली आहे. प्रभू रामचंद्रांच्या आदर्श नीतीनुसार जगाला मार्गदर्शन करण्याची भारताची क्षमता दर्शविणारा हा धर्मध्वज अनेक शतके अवकाशात दिमाखाने फडकत राहील, यात तिळमात्र शंका नाही. जय श्रीराम!

## तंत्रवेध

# वनस्पती आणि संगीताचे भावविश्व

डॉ. दीपक शिकारपूर

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी' हा ज्ञानोबा माउलींचा विचार. सर जगदीशचंद्र बोस यांचा ठाम विश्वास होता की, वनस्पतींमध्ये संवेदनशील मज्जासंस्था असते, ती प्राण्यांपेक्षा वेगळी नाही तसेच बाह्य उत्तेजनांवरील त्यांच्या प्रतिक्रिया मोजल्या जाऊ शकतात आणि त्या रेकॉर्ड केल्या जाऊ शकतात. जगातील प्रत्येक गोष्ट काही ना काही आवृत्तीच्या कंपाने बनलेली आहे. हिंदू तत्त्वज्ञानात 'ॐ' हा नाद सृष्टीचा मूलाधार मानला जातो. वनस्पती, प्राणी, मानव, पाणी, हवा सर्व एकाच नादात्मक ऊर्जेच्या स्वरूपातून निर्माण झाले आहेत. संगीत वातावरणात गुंजते, तेव्हा ही ऊर्जा जिवंत पदार्थाशी जोडली जाते. म्हणूनच संगीत वनस्पतींना 'जिवंत' वाटते; त्यातून परस्परसंवाद निर्माण होतो. मानवप्राण्याप्रमाणे वनस्पतींनाही आपल्या आयुष्यात अनेक सूक्ष्म संवेदना अनुभवता येतात, हे वैज्ञानिक संशोधनातून स्पष्ट झाले आहे. प्रकाश, पाणी, तापमान, वायू यासारख्या भौतिक गोष्टींसोबतच ध्वनीलहरींचाही वनस्पतींच्या वाढीवर आणि विकासावर परिणाम होतो. ध्वनी म्हणजे कंपन; आणि कंपन हा निसर्गाचा मूलभूत घटक आहे. संगीत हे अशा सुव्यवस्थित ध्वनिकंपनांचे सूक्ष्म रूप आहे. म्हणूनच 'वनस्पती आणि संगीत यांचा परस्पर संबंध' हा अभ्यास अनेकांना आकर्षक वाटतो. जगतातील प्रत्येक सजीव घटक काही ना काही प्रमाणात वातावरणातील कंपने अनुभवत असतो. वनस्पतींमध्ये चेतासंस्था नसली तरी त्या सभोवतालच्या परिस्थितीला प्रत्युत्तर देतात. सूर्यप्रकाशाकडे झुकणे, पाण्याच्या दिशेने मुळे वाढवणे, स्पर्शाने पाने आकुंचन पावणे ही याची काही उदाहरणे. यावरून वनस्पतींची संवेदनाक्षमता लक्षात येते.

ध्वनीलहरी हाही एक पर्यावरणीय घटक असल्यामुळे संगीतामुळे वनस्पतींच्या वाढीवर परिणाम होतो का, याविषयी अनेक प्रयोग झाले असून त्यातून रोचक निष्कर्ष समोर आले आहेत. ध्वनी हा कंपनांद्वारे प्रसारित होणारा ऊर्जा-स्वरूप आहे. संगीत वाजते तेव्हा हवेमध्ये सूक्ष्म कंपने निर्माण होतात. काही संशोधकांच्या मते हे कंपन वनस्पतींच्या पेशींच्या भिंतींवर परिणाम करतात. कंपनांमुळे पेशींची उत्तेजना वाढते. ध्वनीलहरींमुळे वनस्पतींच्या पेशींमध्ये सूक्ष्म हालचाली निर्माण होतात. त्यामुळे वाढीसाठी आवश्यक असलेल्या एंझाइम्सची कार्यक्षमता वाढू शकते. यामुळे फोटोसिंथेसिस प्रक्रिया सुधारू शकते. काही प्रयोगांमध्ये संगीत सुरू असताना क्लोरोफिलचे प्रमाण अधिक वाढल्याचे निरीक्षण आढळले आहे. यातून ऑक्सिजन आणि गिबरेलिनसारख्या वनस्पती हार्मोन्सच्या क्रियाशीलतेत फरक पडतो. त्यामुळे मुळांची आणि खोडांची वाढ बदलू शकते. वनस्पतींवर विभिन्न प्रकारच्या संगीताचा परिणाम होतो.



संगीत अनेक प्रकारचे असते. शास्त्रीय, लोकसंगीत, रॉक, पॉप, वाद्यसंगीत इत्यादी. आश्चर्याची गोष्ट म्हणजे वनस्पती प्रत्येक प्रकारच्या संगीताला समान प्रतिसाद देत नाहीत. अनेक प्रयोगांमध्ये आढळले की शांत, सुरेल आणि नादमय संगीतामुळे वनस्पतींची तुलनेने चांगली वाढ होते. स्वरांच्या मृदू कंपनांमुळे पेशींची रचना स्थिर राहते आणि सकारात्मक वाढ होते. रॉक किंवा मोठ्या आवाजातील तालवाद्यांचे संगीत वनस्पतींना ताण देऊ शकते. अशा कंपनांची तीव्रता जास्त असल्याने मुळांची वाढ मंदावणे, पानांची सुकणारी स्थिती किंवा नाजूक वनस्पतींची हानीही दिसून आली आहे.

दरम्यान, पाण्याचा आवाज, वारा हे ध्वनी वनस्पतींसाठी तुलनेने नैसर्गिक असतात आणि त्यांचा परिणाम सौम्य आणि संतुलित असतो, असे लक्षात आले आहे. भारतीय संस्कृतीमध्ये नादाचा, विशेषतः 'नादब्रह्म' या संकल्पनेचा महत्त्वपूर्ण विचार आहे. वेदांमध्ये, पुराणांमध्ये आणि आयुर्वेदात निसर्गाशी एकरूप होण्याचा उल्लेख आढळतो. अनेक शेतकरी आपल्या शेतात सकाळच्या वेळेस भजन किंवा शास्त्रीय संगीत लावतात. त्याचा वैज्ञानिक पुरावा मर्यादित असला तरी अनुभवजन्यदृष्ट्या त्यांना उत्पादनात सकारात्मक बदल आढळल्याचे अनेकदा ऐकायला मिळाले जाते. माणसांप्रमाणेच वनस्पतीही पर्यावरणाला प्रतिसाद देतात. आपण त्यांना सुखदायक संगीत ऐकवल्यास आश्चर्यकारक परिणाम मिळवू शकतो. त्यातून पानांची, फुलांची संख्या वाढते. फुलांची वेळ लवकर येते (किमान एक आठवडा). बिया लवकर फुटतात. हे थोतांड नसून त्यावर अनेक देशांमध्ये दीर्घ संशोधन (विकसितही) झाले आहे. या विषयावरील शोधनिबंध सर्वत्र उपलब्ध आहेत. वनस्पतींना शास्त्रीय संगीत, स्तोत्रे, बासरी, वैदिक चँट्स आवडतात पण कानठळ्या बसवणारे रॉक संगीत आवडत नाही, हेही शोधनिबंधामध्ये नमूद केले आहे. ऐकायला मधुर वाटणाऱ्या शांत ध्वनीमुळे मनाची एकाग्रता आणि प्रसन्नता वाढते, मधुर संगीत श्रवणामुळे गायी जास्त दूध देतात. पक्षी, प्राणी यांची उत्पादनक्षमता वाढते. कुक्कुटपालन केंद्रांमध्ये अंड्यांचे उत्पादन वाढल्याचेही प्रयोगात आढळले आहे. मधुर ध्वनी-संगीतामुळे वनस्पती आणि पिकांची वाढ चांगली होते. डॉल्फीन या सागरी माशांना (बहामा बेटाजवळ) संगीत आवडते. गुरांना पाणी पाजताना शीळ घालतात. गुरांची तहान समाधानाने शांत होते. वृक्षामध्ये प्राण असतो, त्यांना भावना असतात आणि ते मुके जीव नसून ध्वनीही निर्माण करतात, अशी ठाम धारणा असणारे अनेक निसर्गप्रेमी आहेत. १९७० मध्ये पीटर टॉम्पकिन्स आणि क्रिस्टोफर बर्ड यांच्या 'द सीक्रेट लाईफ ऑफ प्लांट्स' या पुस्तकाने न्यू यॉर्क टाईम्सच्या बेस्टसेलर यादीत स्थान मिळवले होते. या जोडगोळीने या विषयावर सुमारे पन्नास वर्षांपूर्वी सखोल अभ्यास केला होता. वनस्पती संगीताचा मानवाच्या आरोग्यावर होणारा विशेष प्रभाव पाहून अनेक डॉक्टर आनंदाने आश्चर्यचकित झाले. प्रभातफेरी वृक्षवल्लीच्या सहवासात केल्यास मन प्रसन्न होते, याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. शास्त्रज्ञांना आढळून आले की वनस्पती विद्युत आवेग आणि कंपने निर्माण करू शकतात. उदाहरणार्थ, पान त्याच्या पृष्ठभागावर विद्युत प्रभार गोळा करू शकते आणि ते वनस्पतीच्या आतील उतींमधून प्रवाहित करू शकते. वनस्पतीच्या उती नंतर ते वनस्पतीच्या इतर भागांमध्ये प्रसारित करतात. तुम्ही रोपाच्या खोडाला प्लग जोडून त्याची शक्ती मोजू शकता. प्लँटवेव्ह हा उद्योग या क्षेत्रात भरीव कार्य करत आहे. त्याने अनेक उपकरणे विकसित केली आहेत, जी तुम्हाला वनस्पतींच्या संगीताचा आस्वाद देते. 'प्लँटवेव्ह' नावाचे उपकरण तुम्हाला निसर्गाशी अक्षरशः संपर्क साधू देते. ते तुम्हाला झाडे, फुले, बोन्सायपासून मशरूमपर्यंत वनस्पतींनी निर्माण केलेले आवाज ऐकू देतात. हे उपकरण पानांवर दोन इलेक्ट्रोड लावून वनस्पतींमधील विद्युतीय फरक ओळखू शकते. ही तफावत नंतर लाटांच्या रूपात रेखाटली जाते. तयार झालेले उत्पादन म्हणजे आनंददायी संगीताचा अखंड प्रवाह. संगीतामुळे वनस्पतींमध्ये होणारी प्रतिक्रिया ही जैविक पातळीवरील असली तरी तिचा प्रभाव मानवाला सौंदर्य, संतुलन आणि शांततेचा अनुभव देतो. संगीत निसर्गासाठीही उपकारक ठरू शकते. म्हणूनच शेतात, बागेत किंवा घरातील रोपट्यांसाठी हलके, सुरेल संगीत वाजवणे हा निसर्गाशी संवाद साधण्याचा सुंदर मार्ग आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

नीलेश जोशी

# कुष्ठरोग निवारणासाठी पुढाकार घ्या

कोरोना काळातील भयावहता अद्याप सर्वांच्या स्मरणात असेलच. सख्ख्या नात्यातील परकेपण या कालावधीत सर्वांनीच अनुभवले. समाजातील मानवी मूल्ये आणि संवेदना जणू नष्ट झाल्या होत्या. अजूनही मागे वळून पाहिल्यानंतर अंगावर शहारे यावे इतक्या कटू आठवणी तेव्हाच्या आहेत. पण यावरही वैद्यकशास्त्राने तोडगा काढून मात केली. वास्तविक इतिहासातील हा काही पहिला प्रसंग नव्हता. यापूर्वीही असाध्य आजारांनी थैमान घातल्याचे दिसून येते. पण काही आजार समाजात संवेदनाशून्य परिस्थिती निर्माण करतात. मग ती केवळ आरोग्याची समस्या न राहता सामाजिक अभिशाप ठरतो. गत शतकात महारोग अर्थात कुष्ठरोग हा असाच आजार होता. त्याकाळी असाध्य असणाऱ्या या आजारावर आता उपचार शक्य आहेत. त्यावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळविण्यात देखील यश मिळाले आहे. नव्हे गत काही दशकांत तर त्याचे निर्मूलन झाले असे देखील म्हटले जात होते. पण नुकत्याच राज्यात सुरू असलेल्या कुष्ठरोग शोध मोहिमेंतर्गत अकोला जिल्ह्यात ११ नवीन रुग्ण आढळून आले. तर तब्बल ३,९९६ संशयित रुग्णांची नोंद करण्यात आली. एका जिल्ह्यातील संशयित रुग्णांची ही आकडेवारी धक्कादायक आहे. या आजाराबाबत आता गांभीर्याने उपाययोजना झाल्या नाहीत तर समाजवीण उद्ध्वस्त करणारे भविष्यातील मोठे संकट येऊ शकते.

कुष्ठरोग हा मायकोबॅक्टीरियम लेप्रे या जीवाणूमुळे होतो. या आजारात सुरुवातीला शरीरावर संवेदनाहीन चट्टा आढळतो. हळूहळू संसर्ग वाढून काही ठिकाणच्या संवेदना कमी व्हायला लागतात. हात-पाय विकृत होणे अशी लक्षणेही आढळतात आणि नंतर रुग्णामध्ये न्यूनगंड वाढण्यास सुरुवात होते. सख्खे नातलग देखील अज्ञान आणि गैरसमजामुळे आजारी व्यक्तीला दूर ठेवतात. गत शतकात या आजाराने ग्रस्त असणाऱ्या रुग्णांची अतिशय दैना होती. हा आजार झालेला रुग्ण महारोगी म्हणून ओळखला जाई. त्याच्या स्पर्शाने इतरांना हा रोग होईल म्हणून त्याला गावाबाहेर निर्वासित करण्यात येत होते. विविध सण, समारंभ आणि सार्वजनिक उत्सवात त्यांना स्थान नसे. सर्वांत भयंकर म्हणजे अशा रुग्णांना बहिष्कृत केल्यानंतर उपजीविकेसाठी साधन उपलब्ध नसत. एकीकडे आजाराने ग्रस्त तर दुसरीकडे कुटुंब, सख्ख्या नातलगांचा बहिष्कार यामुळे रुग्ण मानसिकरीत्या खचून जात असत. अशा काळातही कुष्ठरुग्णांच्या मदतीसाठी अनेक महनीय व्यक्तींनी पुढाकार घेतला. यापैकीच एक म्हणजे सदाशिव गोविंद कात्रे. सदाशिव कात्रे हे स्वतः कुष्ठरोगी होते. या आजारामुळे त्यांचे हात-पाय बाधित झाले. पण स्वतःच्या वाटेला आलेले दुःख बाजूला सारत त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी काम करण्याचा संकल्प केला. अनंत अडचणींवर मात करीत त्यांनी छत्तीसगड राज्यातील चंपा जिल्ह्यात जांजगिर येथे भारतीय कुष्ठ निवारक संघाची स्थापना केली. त्यांच्या प्रयत्नातून अनेक रुग्णांना आधारासह निवारा, औषधोपचार, पुनर्वसन, कौशल्य प्रशिक्षण त्यांनी दिले. अनेक रुग्ण बरे होऊन पुन्हा स्वाभिमानाने जीवन जगायला लागले. महात्मा गांधी, विनोबा भावे, बाबा आमटे यांनी देखील त्यावेळी कुष्ठरोग्यांना मोठा आधार दिला. अमरावती येथील डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी देखील विदर्भ महारोगी सेवा मंडळाची स्थापना करून अमरावती येथे तपोवन परिसरात कुष्ठरोग्यांच्या उपचार आणि पुनर्वसनासाठी जीवन समर्पित केले. पश्चिम विदर्भातील कुष्ठरोग्यांसाठी तपोवन हे मोठे आधार केंद्र होते. खरं म्हणजे आता कुष्ठरोग हा काही असाध्य श्रेणीत मोडणारा आजार नाही. वैद्यकशास्त्राने केलेल्या प्रगतीमुळे सुरुवातीलाच आजाराचे निदान होते. तर अगदी काही महिन्यांच्या उपचारानंतर रुग्ण बरा होतो. हे खरे असले तरी गैरसमज, अज्ञानातून रुग्णाने याकडे दुर्लक्ष करणे सोयीचे नाही. शासनस्तरावर कुष्ठरोग निर्मूलन, नियंत्रणासाठी प्रयत्न सुरू आहेतच. त्यासाठी तपासणी आणि सर्वेक्षण देखील करण्यात येते. पण याच प्रकारच्या तपासणीत आढळलेली ही संशयित रुग्णसंख्या धक्कादायक आहे. त्यामुळे या आजाराचा धोका, व्याप्ती वेळीच ओळखली पाहिजे. सदाशिव कात्रे, डॉ. पटवर्धन यांनी यासाठी जीवन समर्पित केले. आताची आकडेवारी पाहता पुन्हा अशाच समर्पणासाठी समाजातील स्वयंसेवी संघटनांसह सामाजिक भान असणाऱ्यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# शिवकुमारांमुळे सिद्धरामय्या अडचणीत

श्यामकांत जहागीरदार

बिहार विधानसभा निवडणुकीत महाआघाडीचा दारुण पराभव झाल्यानंतर येत्या काही दिवसांत काँग्रेसमध्ये फूट पडली तर मला आश्चर्य वाटणार नाही, असे महत्त्वपूर्ण विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. मोदी यांचे हे विधान खरे करून दाखवण्यासाठी काँग्रेसजनांनी कंबर कसली असल्याचे दिसते. त्यात सध्या तरी कर्नाटकातील काँग्रेसनेते आघाडीवर आहेत, असे म्हणायला हरकत नाही. कर्नाटकातील सत्तेवरून मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यात जुंपली आहे. दोघांनी अजून एकदुसऱ्याचे कपडे फाडायला सुरुवात केली नसली तरी तो दिवसही फारसा दूर नाही. या दोघांनी एकमेकांचे कपडे फाडायला सुरुवात केल्यानंतर खऱ्या अर्थाने काँग्रेसचे वस्त्रहरण होणार आहे. मुळात आज देशातील इनमीनतीन राज्यात काँग्रेसची सत्ता आहे, यातील कर्नाटक हे एक राज्य आहे. तेलंगणा आणि हिमाचल प्रदेश ही अन्य दोन राज्ये आहेत. अडीच वर्षांपूर्वी कर्नाटकात झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला सत्ता मिळाली. राज्यात काँग्रेसला सत्तेवर आणण्यात त्यावेळी प्रदेश काँग्रेस अध्यक्ष असलेले डी. के. शिवकुमार यांचे मोठे योगदान होते. त्यामुळे निवडणुकीनंतर शिवकुमारच मुख्यमंत्री होतील, असे वाटत असतांना अचानक सिद्धरामय्या यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली. माळ पडली असे म्हणण्यापेक्षा काँग्रेस नेतृत्वाला आपल्या बाजूला वळवत ती माळ त्यांनी आपल्या गळ्यात पाडून घेतली. त्यावेळी मुख्यमंत्रिपद अडीच-अडीच वर्षे वाटून घेण्याचा करार काँग्रेसच्या राज्यातील या दोन बड्या नेत्यांमध्ये झाला होता, असे म्हणतात. म्हणजे फक्त शिवकुमारच तसा दावा करतात. मुख्यमंत्री सिद्धरामय्या वा काँग्रेसचे नेतृत्व याबाबत काहीही बोलायला तयार नाही. म्हणजे या दोन नेत्यांमध्ये असा करार झाला होता असेही काँग्रेसचे नेतृत्व सांगत नाही आणि झाला नव्हता, असाही दावा करत नाही. उपमुख्यमंत्री शिवकुमारच असा दावा वारंवार करत असल्यामुळे त्यावेळी असा करार झाला होता, असे म्हणता येईल. कारण या मुद्यावर शिवकुमार खोटे बोलतात, असेही आतापर्यंत काँग्रेसच्या नेतृत्वाने म्हटले नाही.

सिद्धरामय्या यांच्या मुख्यमंत्रिपदाची अडीच वर्षे पूर्ण झाल्यामुळे ठरल्याप्रमाणे मुख्यमंत्रिपद मला मिळावे, अशी मागणी शिवकुमार करत आहे. एवढेच नाही तर या मागणीसाठी पक्षनेतृत्वावर दबाव आणण्यासाठी त्यांनी आपल्या समर्थक आमदारांना दिल्लीत पाठवायला सुरुवात केली आहे. अजून तरी त्यांच्या समर्थक आमदारांना भेटायची वेळ काँग्रेसच्या नेतृत्वाने दिली नाही.



मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मंत्रिमंडळ विस्ताराची परवानगी पक्षश्रेष्ठींकडे मागितली आहे. पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील, तो आपल्याला मान्य राहील, असेही ते सांगतात. याचाच अर्थ मुख्यमंत्रिपदाबाबत अडीच-अडीच वर्षाचा करार झाला होता, हे ते अप्रत्यक्षरीत्या मान्य करतात. पक्षनेतृत्वाने सिद्धरामय्या यांना मंत्रिमंडळ विस्ताराची परवानगी दिली तर पक्षनेतृत्वाने त्यांना मुदतवाढ दिली, मुख्यमंत्रिपदाचा शिवकुमार यांचा दावा फेटाळला, असे मानले जाईल. मात्र यावेळी शिवकुमार यांचा दावा फेटाळणे काँग्रेसच्या नेतृत्वाला परवडणारे नाही.

त्यामुळे राज्यातील नेतृत्वबदलाच्या मुद्यावर पक्षश्रेष्ठींना निर्णय घ्यायचा आहे. कर्नाटकातील या गुंत्यावर लवकरात लवकर तोडगा काँग्रेसच्या नेतृत्वाला काढावा लागणार आहे. अन्यथा हातातील आणखी एक राज्य गमावण्याची वेळ त्यांच्यावर आल्याशिवाय राहणार नाही. शिवकुमार आता माघार घेण्याच्या स्थितीत नाहीत. आर वा पारची लढाई लढण्याच्या मानसिकतेत ते आले आहे. आतापर्यंत शिवकुमार समर्थक १५ ते २० आमदार दिल्लीत पोहोचले असले तरी १४० आमदार आपल्या पाठीशी असल्याचा दावा ते करत आहे. असा दावा करत ते एकप्रकारे पक्षनेतृत्वाला इशाराही देत आहे. मुळात कर्नाटक हे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांचे राज्य आहे. सिद्धरामय्या यांच्या मंत्रिमंडळात खडगे यांचा मुलगाही मंत्री आहे. त्यामुळे या मुद्यावर कोणताही निर्णय घेण्याची खडगे यांची तयारी नाही. काँग्रेसचे खरे नेतृत्व म्हणजे गांधी परिवार कर्नाटकातील नेतृत्वबदलाच्या मुद्यावर निर्णय घेईल, असे म्हणत खडगे यांनी एकप्रकारे हात वर केले आहे. याचा अर्थ खडगे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री शिवकुमार या दोघांनाही दुखवू इच्छित नाही. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असले तरी कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार आपल्याला नाही, अशी कबुली ते देत आहेत, असे म्हणायला हरकत नाही. काँग्रेसचे नेतृत्व असलेले राहुल गांधी नेहमीप्रमाणे परदेशात आहेत. ते परदेशातून आल्यावर काँग्रेसच्या नेतृत्वाला कर्नाटकातील पेचप्रसंगावर तोडगा काढावा लागेल. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यातील वादात काँग्रेसने याआधी राजस्थान हे राज्य गमावले आहे. त्या राज्यातही काँग्रेसचे सरकार असताना मुख्यमंत्री अशोक गहलोत आणि उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांच्यात वाद होता. शिवकुमार यांच्याप्रमाणे सचिन पायलट यांनी राजस्थानमध्ये काँग्रेसला सत्तेवर आणले होते. पायलट मुख्यमंत्री होतील, असे वाटत असताना अचानक गहलोत यांनी बाजी मारली आणि मुख्यमंत्रिपद बळकावले. पायलट यांना उपमुख्यमंत्रिपदावर समाधान मानावे लागले. आज कर्नाटकात तेच सुरू आहे. तसाच संघर्ष तेव्हा राजस्थानात गहलोत आणि पायलट यांच्यात होता. त्याची परिणती विधानसभा निवडणुकीत राज्यातील काँग्रेसची सत्ता गमावण्यात झाली. तरीसुद्धा काँग्रेसला शहाणपण येत नाही. काँग्रेसला हरवण्यासाठी भाजपाची गरजच नाही. काँग्रेसचे नेते काँग्रेसला पराभूत करण्यासाठी पुरेसे आहेत. यातून जी थोडीफार कसर राहात असेल ती भरून काढण्यासाठी राहुल गांधी समर्थ आहेत. काँग्रेसला राज्याराज्यात हरवण्यासाठी जिथे काँग्रेसचे कार्यकर्ते कमी पडत असतील, तिथे मी आहे, हे राहुल गांधी यांनी वारंवार सिद्ध करून दाखवले आहे. कर्नाटकातील या पेचप्रसंगावर काँग्रेसच्या नेतृत्वाला यशस्वी तोडगा काढता आला नाही तर कर्नाटक हे राज्य काँग्रेसला गमवावे लागेल, यात शंका नाही. आणि तोडगा म्हणजे शिवकुमार यांची मुख्यमंत्रिपदाची मागणी मान्य करणे हा आहे. काँग्रेसने त्यांना मुख्यमंत्रिपद दिले नाही तर ते बंड करू शकतात, आपला गट घेऊ बाहेर पडू शकतात. शिवकुमार काँग्रेसमधून बाहेर पडून भाजपात जातील का, याची शक्यता आज अतिशय कमी असली तरी ते भाजपाच्या पाठिंब्याने राज्यात सरकार स्थापन करण्याची शक्यता नाकारता येत नाही. राजकारणात कधी काय होईल, हे कोणी सांगू शकत नाही. मुख्यमंत्रिपदाच्या मुद्यावरून अडीच वर्षांपूर्वी काँग्रेसच्या नेतृत्वाने आपल्यावर अन्याय केला, ही त्यांची भावना आहे, जी चुकीची म्हणता येणार नाही. त्यामुळे आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शिवकुमार कोणत्याही थराला जाऊ शकतात, काँग्रेसच्या नेतृत्वाला धडा शिकवू शकतात. शिवकुमार याच्या नावातच शिव आहे. त्यामुळे त्यांनी तांडवनृत्य केले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

९८८१७१७८१७

## आजचे संघगीत-८८

गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५

### अविरत पुढे पुढे जाऊ

अविरत पुढे पुढे जाऊ
अम्हि ना विश्रांति आता घेऊ ॥धृ.॥

उद्धाराया पूर्वज शापित घोर आचरुनि तप हे अविरत
मुक्ति मिळवुनी देइ भगीरथ सातत्याने भगीरथाच्या
पुढे पुढे जाऊ ॥१॥

शांत सागरी सेतू बांधून नष्ट कराया संकट दारुण
जाई वानरासह रघुनंदन त्या धैर्याने रघुरायाच्या
पुढे पुढे जाऊ ॥२॥

स्वर्गी तो देवेन्द्र कोपला गारायुत पर्जन्य वर्षला
गोवर्धन गोपांनि उचलला चातुर्याने श्रीकृष्णाच्या
पुढे पुढे जाऊ ॥३॥

धुमाकूळ यवनांचा चाले आवर घाली शिवराय बळे
घेउनि संगे मित्र मावळे त्या शिवराया साक्ष ठेवुनी
पुढे पुढे जाऊ ॥४॥

सातत्याच्या अन् धैर्याच्या चातुर्याच्या संघटनेच्या
मातृभूमिच्या उद्धाराच्या महाजनांच्या त्याच पथाने
पुढे पुढे जाऊ ॥५॥

### सरन्यायाधीशांचे विधान स्वागतार्ह

देशाचे नवनियुक्त सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी 'भारतात दीर्घविलंबित न्यायदानाविषयी' व्यक्त केलेले विधान खूप महत्त्वाचे आहे. माजी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी सुद्धा सध्या प्रचलित असलेल्या 'तारीख पे तारीख' या न्यायदानाच्या प्रचलित अनिष्ट प्रथेबद्दल चिंता व्यक्त केली होती. या प्रथेमुळे वकील व त्यांचे सहकारी यांचा आर्थिक फायदा होतो, हे सर्वश्रुत आहे. पण न्यायदानाची प्रतीक्षा करत असलेल्या सामान्य जनतेचे व गोरगरिबांचे अतोनात नुकसान होते. अर्ध्या तासात निपटारा होऊ शकणारी प्रकरणे, जुनाट कार्यपद्धतीमुळे वर्षानुवर्षे भारतात प्रलंबित राहतात. याचा दुरुपयोग करून घेत काही मंडळी फायदा घेतात. 'न्यायदेवता आंधळी असते', 'हजारो गुन्हेगार सुटले तरी चालतील, पण एका निर्दोष व्यक्तीवर अन्याय होऊ नये' अशा विलंबाला खतपाणी घालणाऱ्या भ्रामक कल्पना मुद्दाम पसरविण्यात आल्या की काय, अशी शंका घ्यायला बराच वाव आहे. आजच्या आधुनिक कृत्रिम बुद्धिमतेच्या युगात साध्या खटल्यांना वर्षानुवर्षे विलंब होणे व ९०,००० च्या वर नुसत्या सर्वोच्च न्यायालयात वाढत जाणे, ही बाब चांगली नाही. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी याबद्दल खंत व्यक्त केली व वाद सोडवण्यासाठी मध्यस्थीला प्रोत्साहन देण्याची नवीन कल्पना सुचविली, हे निश्चितच स्वागतार्ह आहे. सूर्य कांत यांच्या पुढाकाराने, या प्रलंबित खटल्यांमुळे कोट्यवधी लोकांचा व्यर्थ होणारा वेळ वाचेल व भारत देश विकासाच्या दिशेने आणखी वेगाने वाटचाल करेल अशी आशा करूया.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

### शहरी नक्षल समर्थकांना ठेचून काढा

देशाच्या राजधानीत अत्यंत धक्कादायक प्रकार नुकताच घडला. दिल्लीतील इंडिया गेटवर वायुप्रदूषणाविरुद्ध निदर्शने करणाऱ्या आंदोलनकर्त्यांनी नक्षल विरोधी चकमकीत खात्मा झालेला देशातील मोस्ट वॉन्टेड नक्षलवादी कमांडर माडवी हिडमाचे पोस्टर झळकावले. पोस्टरमध्ये हिडमाची तुलना आदिवासी स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांच्याशी करण्यात आली. त्याचे जल, जंगल आणि जमिनीचे रक्षक म्हणून वर्णन करण्यात आले. त्याच्या समर्थनार्थ ''जितने हिडमा मारोगे, हर घर से हिडमा निकलेगा'' असे नारे लावून देशाच्या सुरक्षेला-शांततेला व एकात्मतेला धमकी देण्याची हिंमत करण्यात आली. ''हेच ते लपलेले नक्षल समर्थक'' असा आरोप संपूर्ण देशात होऊ लागला. सोशल मीडियावर या आंदोलनकर्त्यांच्या विरोधात लाट उसळली. नुकत्याच घडलेल्या बॉम्बस्फोटाच्या धक्क्यातून दिली सावरत असतानाच असा धक्कादायक प्रकार घडल्याने चिंता वाढली.अर्बन नक्षलिझम आणि अर्बन समर्थक ही बाब पुन्हा स्पष्टपणे अधोरेखित झालेली दिसते. नक्षलवाद ही कीड कुठून कुठपर्यंत लागलेली आहे हे आता पुन्हा एकदा या घटनेने समोरे आले आहे. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी, ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद हद्दपार होणार असे घोषित केल्यापासून व प्रत्यक्षात यावर आक्रमकपणे कृती योजना सुरू असतानाच अनेक नक्षलवादी शरणागती पत्करताना दिसत आहेत. ज्यांनी आत्मसमर्पणाचा मार्ग स्वीकारला नाही त्यांना थेट गोळीनेच उत्तर मिळत आहे. हे सर्व सुरू असताना कधी नव्हे तर युद्धबंदी करण्याचा व सरकारसोबत शांती वार्ता करण्याचा प्रस्ताव नक्षलवाद्यांकडून ठेवण्यात आलेला होता. परंतु गृहमंत्री अमित शाह यांनी ''शस्त्र हातात असणाऱ्यांसोबत चर्चा बिलकूल होणार नाही जे आत्मसमर्पण करतील त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यास मदत केली जाईल अन्यथा सुरक्षा दलांच्या कारवाईला सामोरे जावे लागेल'' असे ठणकावून सांगत प्रस्ताव नाकारत कठोर इशारा दिला होता. नक्षलवाद्यांच्या समर्थनार्थ दिल्लीमध्ये घोषणा देणे म्हणजेच प्रदूषणविरोधी आंदोलनाच्या आडून देशविरोधी अजेंडा चालवणे हा स्पष्ट उद्देश दिसून येतो आहे, अशांना ठेचूनच काढायला हवे.

**वैभव बावनकर**/९५४५७४५५८०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संविधान दिन साजरा...



### कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळा

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रथमता मा. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी श्रुती कुलकर्णी यांनी संविधानाविषयी गीत सादर केले. राघव हेंबाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले व मयुरी दुरुकर यांनी संविधान प्रस्ताविक विषयी माहिती सांगितली. संविधान सप्ताहाच्या निमित्ताने शाळेत इयत्ता तिसरी विद्यार्थ्यांची रॅली इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी भारत माता व आंबेडकरांची वेशभूषा केली इयत्ता चौथी विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा, विद्यार्थ्यांची मानवी साखळी, सेप्टी पॉईंट असे विविध उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमासाठी शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन व आभार मयुरी दुरुकर यांनी केले.



### हरिभाई देवकरण प्रशाला

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

येथील हरिभाई देवकरण प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रशालेच्या मुख्याध्यापिका दीपा फाटक पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, पर्यवेक्षक महेंद्र रणधीर, पर्यवेक्षक गणेश नेवरे, राघवेंद्र पिछ्ले यांच्या हस्ते भारतरत्न, विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रशालेचे सहशिक्षक राघवेंद्र पिछ्ले यांनी भारतीय संविधानातील विविध कलम, परिशिष्टे यांच्या संदर्भात विध्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. यावेळी संविधान उद्देशिका वाचन व विद्यार्थ्यांची भाषणे झाली, भारतीय संविधानाबद्दल घोषणा देण्यात आल्या. प्रास्ताविक सूत्रसंचालन मंजिरी हरहरे यांनी केले तर आभार मल्लिकार्जुन घवाळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल महारुद्र कत्ते, सेवक प्रशांत गायकवाड, मारुती माळी, विनय वाघमारे, ब्रह्मदेव ननवरे आदींनी परिश्रम घेतले.



### श्री मल्लिकार्जुन हायस्कूल

**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय,हत्तुरे नगर येथे संविधान दिन साजरा झाला. मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, अनिलकुमार गावडे, जिल्हा कौशल्य विकास रोजगारचे जिल्हा समन्वयक सिद्धप्पा बनसोडे व लिपिक वर्ग तृष्णा गायकवाड, रेश्मा विद्याधर, रोहिदास डोईफोडे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधानाचे पूजन करण्यात आले.यावेळी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. २६/११ हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी सुनीता गंगोंडा यांनी संविधानातील हक्क,कर्तव्य,मूल्ये यांचे महत्त्व सांगत संविधानाविषयी माहिती सांगितली. या संविधान दिनानिमित्त निबंध, चित्रकला, रांगोळी, प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या व प्रशालेतील विद्यार्थ्यांनी नगरातून संविधान जागृतीविषयी घरोघरी संविधान, हर घर संविधान अशा घोषणा देत रॅली काढली. यावेळी शिक्षक आनंद काकडे, दत्तात्रय आगरखेड, सुकेशनी गंगोडा, अमरनाथ कदारे, गणेश कोरे, संतोष स्वामी उपस्थित होते. सूत्रसंचालन रमेश आगवणे यांनी केले. प्रतीक्षा बिडवे यांनी आभार मानले.

# ऊसाला पहिली उचल ३४०० रुपये देण्याची मागणी

## शेतकरी संघटना तेरा मैल येथे उद्या करणार आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

यावर्षीचा ऊस गाळप हंगाम सुरू होऊन एक महिना होत आला. ऊस कायदा १९६६ नुसार ऊस गाळप झाल्यापासून १४ दिवसाच्या आत ऊस बिले जमा करणे बंधनकारक असताना एक महिना झाला तरीही साखर कारखान्यांनी ऊस बिले जमा केली नाहीत आणि ऊस दर जाहीर केले नाहीत.

सोलापूर जिल्ह्याच्या शेजारी असणाऱ्या सर्व जिल्ह्यांमध्ये ऊसाला पहिली उचल म्हणून ३२०० ते ३६०० पर्यंत ऊस दर जाहीर केले आहेत. त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यामध्ये सुद्धा यावर्षी गाळप होणाऱ्या उसाला पहिली उचल ३४०० रुपये मिळावेत, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर -विजापूर महामार्गावर होनमुर्गी फाटा (तेरामैल) या ठिकाणी रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या मागणीचे निवेदन मंद्रुप अप्पर तहसलदारांना देण्यात आले. यावेळी शेतकरी संघटना जिल्हा अध्यक्ष विजय रणदिवे, युवा जिल्हा अध्यक्ष मोहसीन पटेल, अखिल भारतीय किसान सभेचे तालुकाध्यक्ष जावेद आवटे, तालुकाध्यक्ष बिळेणी सुंटे, यासीन मकानदार, चाँदसाब यादगिरी, तुकाराम शेतसंदी, सिकंदर इनामदार आदी उपस्थित होते.



# आयआयटी बॉम्बेचे नाव मुंबई करण्यासाठी पंतप्रधानांना पत्र लिहिणार : फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. २६ नोव्हेंबर-**

भाजपचे केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांच्या वक्तव्यानंतर निर्माण झालेल्या वादाबाबत मुख्यमंत्री यांनी आता प्रतिक्रिया दिली आहे. आमच्यासाठी हे मुंबईच असून आयआयटी बॉम्बेचं नाव आयआयटी मुंबई असे करण्याची विनंती आपण पंतप्रधानांना पत्र पाठवणार आहे, असे त्यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी आयआयटी मुंबईतील एका कार्यक्रमात आयआयटी बॉम्बेचे नाव मुंबई केलं नाही यामुळे मला बरं वाटले,असे विधान केल्याने वाद ओढावून घेतला होता. त्यावर मनसे व काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत त्यांना उत्तर दिले होते. राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेवर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''बॉम्बेचे नाव मुंबई करण्यामागे सर्वात मोठा वाटा हा भारतीय जनता पक्षाचे नेते रामभाऊ नाईकांचा आहे. आमच्याकरता बॉम्बे नाही तर ते मुंबईच आहे.

बॉम्बेच्या खुणा या मिटल्या पाहिजेत आणि सगळीकडे मुंबईच असलं पाहिजे. आयआयटी बॉम्बेचं नाव आयआयटी मुंबई असं करण्याची विनंती करणारे पत्र मी स्वतः देशाचे पंतप्रधान आणि मानव संसाधन मंत्र्यांना लिहिणार आहे.''

काही लोक सोईस्करपणे, आपल्या मुलांना ज्या शाळेत शिकवतात त्या शाळेचे नाव बदलावे, अशी विनंती करत नाहीत असा टोलाही फडणवीसांनी ठाकरे यांना लगावला.

# जिल्ह्यात ई-केवायसी न केलेल्या २० टक्के युनिटचे धान्य होणार बंद!

## जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

रेशनकार्डची ई-केवायसी करणे आवश्यक असल्याचे सरकारने स्पष्ट केले होते; त्यासाठी ३-४ महिने मोहीमही राबविली. ज्यांच्या रेशन कार्डची ई-केवायसी होणार नाही; त्यांना सरकारी रेशन मिळणार नाही. यामुळे येत्या काळात तुमची शिधापत्रिका बंद होण्याची शक्यता आहे असा इशारा देवूनही जिल्ह्यातील ८० टक्के ई-केवायसी झाली आणि २० टक्के स्थलांतरीत, लग्न झालेल्या मुली आणि इतर काहीजणांची ई-केवायसी झाली नाही; यामुळे या २० टक्के युनिटचे रेशन कुठल्याही क्षणी शासनस्तरावरुन बंद होवू शकते, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी आज (दि. २६) दिली.रेशनकार्डच्या ई-केवायसीची मुदत जवळपास ३ ते ४ महिने शासन स्तरावरून वाढविल्याने जिल्ह्यातील ई-केवायसीचा टक्का वाढला.



सोलापूर जिल्ह्यातील आजतागायतची तालुकानिहाय आकडेवारी पाहिल्यास सांगोला ८५.४६ टक्के, पंढरपूर ८०.७८, माळशिरस ८०.६७, करमाळा ८०.४०, माढा ८०.२७, बार्शी ७७.९५, मोहोळ ७७.७४, उत्तर सोलापूर ७७.७१, दक्षिण सोलापूर ७७.६२, अक्कलकोट ७६.५९ तर मंगळवेढा ७६.१४ टक्के इतकी झाली आहे. तर जिल्ह्यातून सरासरी ७९.५६ टक्के ई-केवायसी झाली असून, उर्वरित शिधापत्रिका धारकांची ई-केवायसी झाली नसल्याने कुठल्याही क्षणी त्यांचे धान्य शासन स्तरावरून बंद होण्याची शक्यता जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी व्यक्त केली.

आजतागायत ९ लाख ९६ हजार ४६६ युनिटची ई-केवायसी झाली आहे. तर ४ लाख ७० हजार ८९२ जणांची ई-केवायसी पेंडिंग आहे.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Sushant Rajdatta Salunkhe** HAS BEEN CHANGED TO **Sushant Rajadatta Salunke**

Resi. - 165, Jaymahalaxmi Nagar, Near Girija Mangal Karyalaya, Majrewadi, Solapur

**KINDLY NOTE**

THE SAME. (53388 Dtd.10.11.2025)



# 'सिंहगड'मध्ये संविधान दिनानिमित्त सामूहिक उद्देशिका वाचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने संचालित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.यावेळी सीआरटीडी संशोधन विभागाचे संचालक डॉ. एस. एच. पवार यांनी संविधानाचे महत्त्व अधोरेखित करताना विद्यार्थ्यांनी नागरिक म्हणून आपली कर्तव्ये ओळखावीत, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संविधानाची निर्मिती, त्यामागील ऐतिहासिक भूमिका व लोकशाही मूल्यांची सविस्तर माहिती दिली. तसेच २६ नोव्हेंबर रोजी घडलेल्या मुंबई दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करत हुतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून शहीद जवानांना अभिवादन केले.

## जन्मदिवस श्री सद्गुरूंचा, जल्लोष शिष्यांचा

**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

परमपूज्य गुरुवर्य श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त येथील सर्व शिष्य बांधवांकडून सद्गुरूंना अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी प्रथम महाराजांचे औक्षण तेजल व वासंती जवंजाळ यांनी केले. तदनंतर अनिकेत जवंजाळ परिवार व सागर कुरापाटी परिवार यांच्याकडून श्री सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच याप्रसंगी येथील सर्व शिष्य बांधवांनी सद्गुरूंचा सत्कार करून आशीर्वाद घेतला. यावेळी शिवराज नगरकर, गुरुनाथ पतंगे, नितीन चव्हाण, सदाशिव चौगुले, लिंगप्पा जवळकोटे, विजय मोरे, सोमनाथ परिवार, प्रदीप पडगे, नक्का, शिवानंद सावळगी, कदम परिवार, राजेश झिंगाडे,अतुल भडांगे, अक्षय भडंगे, स्वप्निल मालकुस्कर, प्रकाश केकडे,मनोज सरवदे, आदिनाथ उपरे, नितीन निकते, नागेश कमटम आदी शिष्य परिवार उपस्थित होता.



**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
सार्वजनिक बांधकाम विभाग
नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) योजना - सन २०२४-२५ अंतर्गत
ई- निविदा सूचना क्र. :- ४४५/सन.२०२५-२६
ई-निविदा आय.डी.क्र. १२५१९१७-१.

**नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजना** सन २०२४-२५ अंतर्गत १ कामाची ई-निविदा सुचना क्र. ४४५ सन २०२५-२६ ई-टेंडर पध्दतीने ऑनलाईन मागविणेसाठी शासनाच्या http://mahaetenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
(मा.आयुक्त, यांचे मान्यतेने)

सही/-
शहर अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः बार्शी शहर व आसपासचे लोकांना सदर जाहिर नोटीसीने कळिवण्यात येते की,

१) डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु.पल हद्दतील गट नं. २६०/८/२८ बिनशेती प्लॉट नं. २८ याचे क्षेत्रफळ १४९.९९ चौ.मी. चे चौ. फुट १६१३.८९ आहे. याचा बिनशेती आकार २२६.00 पैसे आहे. याची मोजमापे पूर्व बाजु मीटर १५.३९, दक्षिण बाजु मीटर ९.७५, पश्चिम बाजु मीटर १५.३८ व उत्तर बाजु मीटर ९.७५ आहे. यासी चतुसिमा पुर्वेस-सदर गट नंबर पैकी बिनशेती प्लॉट नं. २७, दक्षिणेस ९.00 मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस-सदर गट नंबर पैकी बिनशेती प्लॉट नं. २९ व उत्तरेस गट नंबर २६0 पैकी मिळकत आहे. सदर प्लॉटची पाणी व वागणुक दक्षिण बाजूच्या रस्त्याने जाते व आहे.

येणेप्रमाणे चतुसिमापुर्वक खुला बिनशेती प्लॉट आतिल दगड, माती वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह.

२) सदर प्लॉट शितल भागवत क्षिरसागर, यांच्या खरेदी मालकीचा व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीचा आहे. त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी सदरचा प्लॉट विक्रीस काढला आहे. त्याची माहिती आमचे पक्षकारास झाल्याने उभयंतामध्ये खरेदी विक्रीचा व्यवहार झालेला आहे. इसारापोटी रक्कमही दिलेली आहे. सदरचा प्लॉट हा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाचा आहे. असा विश्वास व भरोसा दिलेला आहे. परंतु सदर प्लॉट संबंधाने कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी आमचे पक्षकार अथवा खालील नमुद पत्त्यावर लेखी हरकत १५ (पंधरा) दिवसांच्या आत नोंदवावी. अन्यथा आमचे पक्षकार सदर मुदतीनंतर कोणाची काही हरकत तक्रार नाही असे समजुन खरेदीखताचा दस्त नोंदवतील. कोणाची फसवणूक होऊ नये म्हणून हि जाहिर नोटीस दिली असे दि. २६/११/२०२५

श्री. संजयकुमार श्रीराम गुंड
खरेदी घेणार

सही/-
खरेदी घेणारतर्फे
**ॲड अनिल विठ्ठल शिंदे**
दिवाणी व फौजदारी न्यायालय, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर
मो. ९९२१०७७५५१

**जाहिर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज नं.९८/२०२५
नि. नं. 0६

**बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात**

**कु. आर्या रोहित बाशिंगे,** वय- 0९ वर्षे, (अज्ञान)
धंदा- शिक्षण, रा.९२८/२, परांडा रोड, बाशिंगे प्लॉट, बार्शी
ता. बार्शी जि. सोलापुर --अर्जदार
**सदर अर्जदाराचे अ.पा.क. जनक आई**
**सौ. स्वप्नाली रोहित बाशिंगे,** वय-३२ वर्षे,
धंदा- घरकाम रा९२८/२, परांडा रोड, बाशिंगे प्लॉट, बार्शी
ता. बार्शी जि. सोलापुर
विरुध्द
महाराष्ट्र शासन (यांचे समन्स / नोटीस --सामनेवाला
सहाय्यक सरकारी अभियोक्ता --
बार्शी यांना बजावण्यात यावे)

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी डि सोलापुर सब डि बार्शी व ता. बार्शी पैकी मौजे बार्शी नगरपालीका हद्दीतील मिळकत गट नं. ९२८/२ पैकी प्लॉट नं. ७८ + ७९ मधील बहुमजली निवासी बिल्डींग मेट्रो टॉवर्स या बिल्डींगमधील पहिल्या मजल्यावरिल फ्लॅट नं. २0२ क्षेत्रफळ ४९.0७ चौ.मी. ही अज्ञानाची मिळकत विकणेकामी परवानगी मिळणेसाठीचा अर्ज CMA 98/2025 मे. कोर्टात आणलेला असुन सदर मिळकत विक्री करणेकामी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असेल तर किंवा सदर मिळकतीसंबंधी कोणताही खरेदी, विक्री, गहाण, दान, बोजा, लिज, चोळी, बांगडी, पोटगी, अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व हरकत असेल तर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख दि. १८/१२/ २०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.00 वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी. त्याअर्थी, कोणाचेही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदर मिळकत विक्री करणेबाबत परवानगी देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. २४/११/२०२५

क. लिपीक
कोर्टाचा शिक्का
सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
**जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी**



## मार्केट यार्ड येथून चोरट्याने दुचाकी पळवली

**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

मार्केट यार्ड येथील गेट क्रमांक दोन येथून १५ ते २२ नोव्हेंबर दरम्यान हँडल लॉक करून लावलेली दुचाकी (क्रमांक एम एच १३ ई एच ८७१९) ही चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी उर्मिला विकास बनसोडे (रा. न्यू बुधवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

**महाळुंग श्रीपूर नगरपंचायत**
**जाहीर निविदा सूचना**

नगरपंचायतच्या आरोग्य विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षाकरिता महाळुंग श्रीपूर नगरपंचायत हद्दीतील एनिमल वेलफेअर नियमावली प्रमाणे मोकाट कुत्र्यांचे निर्बीजकरण, नसबंदी व लसीकर करणे कामासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| विभागाचे नाव | कामाचा पत्ता | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | कामाचे वर्णन | निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| आरोग्य विभाग | भटकी कुत्री पकडून त्यांचे निर्बीजकरण नसबंदी व लसीकरण करणे. | ३,००,०००/- | ३,०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ३००/- |

निविदा अर्ज दिनांक: २७/११/२०२५ ते दिनांकः ०३/१२/२०२५ अखेर सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत सायंकाळी ०५:०० वाजे पर्यंत निविदा शक्यतो त्याच दिवशी सायंकाळी ०५:०० वाजता उपस्थित निविदा धारका समोर किंवा प्रतिनिधी समोर उघडणेत येतील, तसेच कोणत्याही कारणामुळे त्याच दिवशी निविदा उघडणे शक्य न झालेस त्याबाबतची निविदा उघडण्याचे पुढील तारीख व वेळ नगरपंचायत सूचना फलकावर लावण्यात येईल. याबाबत कोणत्याही व कोणासही स्वतंत्र सूचना देण्यात येणार नाही.

निविदेतील अटी व शर्तीचे इत्यादीची अधिक माहिती कार्यालयीन वेळेत व कार्यालयामध्ये पहावयास मिळेल. सादर करण्यात आलेल्या निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
अटी:- दरपत्रक हे प्रती एक कुत्रे प्रमाणे असावे.

**(डॉ. श्री. योगेश डोके)**
मुख्याधिकारी
महाळुंग, श्रीपुर नगरपंचायत

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**बांधकाम कामे**

ई-निविदा सूचना क्रमांक:-१६-२०२५-SrDENCo डीआरएम (डब्ल्यू), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहे. 0१. कामाचे नाव: १-एडीईएन/डब्ल्यू/एसयूआर उपविभागांतर्गत एसयूआर (प्रकार-III 0८ युनिट्स आणि प्रकार IV 0६ युनिट्स) येथे जुन्या क्वार्टरच्या जागी क्वार्टरचे बांधकाम. २-एडीईएन/केएलबीजी आणि एडीईएन/डब्ल्यू/एसयूआर उपविभागांतर्गत डब्ल्यूडी (प्रकार-III 0४ युनिट्स), एसडीबी (आरबी-II ४ युनिट्स आणि प्रकार-III 0२ युनिट), एमआर (प्रकार-II 0४ युनिट्स) आणि एनजीएस (प्रकार-II 0४ युनिट्स) येथे जुन्या क्वार्टरच्या जागी क्वार्टरचे बांधकाम. ३- ADEN/W/SUR अंतर्गत SUR (प्रकार-III 0८ युनिट्स), WDS (प्रकार-II 0४ युनिट्स), MA (प्रकार-II 0४ युनिट्स) आणि MVE (प्रकार-II 0४ युनिट्स) येथे नवीन क्वार्टरचे बांधकाम. ४- ADEN/W/SUR अंतर्गत HG (प्रकार-II ८ युनिट्स आणि प्रकार-III २ युनिट्स), DUD (प्रकार-II ४ युनिट्स) आणि AKOR (प्रकार-II ४ युनिट्स) येथे नवीन क्वार्टरचे बांधकाम. 0२. कामाची अंदाजे किंमत: रु. १४,९८,५२,१२९.९९ 0३. बयाणा रक्कम रु. ८,९९,३00.00 0४. काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ (बारा) महिने 0५. देखभाल कालावधी: २४ (चोवीस) महिने 0६. निविदा फॉर्मची किंमत: शून्य 0७. www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ: १६.१२.२०२५ ते १५.00 वाजेपर्यंत. 0८. www.ireps.gov.in वर १६.१२.२०२५ रोजी १५.३0 वाजेनंतर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ. 0९. वेबसाइट तपशील: www.ires.gov.in 10. टीप: संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदा वेबसाइट: www.ireps.gov.in साठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. ANJ-67

परवानगीशिवाय रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-टेंडर आमंत्रित करत आहे. निविदा सूचना क्रमांक: १७-२०२५-SrDENCo कामाचे नाव: १-पीएफ-१ चा विस्तार, पीएफ पृष्ठभाग सुधारणे, जेईयूआर स्टेशनवरील गर्दी व्यवस्थापनासाठी पाण्याचा वापर वाढवणे. २-पीएफ पृष्ठभाग सुधारणे (पीएफ १ आणि २ आणि पीएफ ३ आणि ४), निवृत्ती कक्षांची तरतूद, पीएफ १ आणि २ येथे सीओपीची तरतूद, पीएफ-१ येथे आरपीएफ पोस्ट, पीएफ १ आणि २ येथे शौचालय ब्लॉक, केडब्ल्यूव्ही स्टेशनवर एसएस बेंच. ३-गर्दी व्यवस्थापनपीएफ-२ (एमएल ते एचएल) वाढवणे, पीएफ-0१ येथे शौचालय ब्लॉक, यूएमडी स्टेशनवर बुकिंग ऑफिस वाढवणे. कामाची अंदाजे किंमत: रु. १८६२३९७७८.२५ बयाणा रक्कम: रु. १0८१२00.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने देखभाल कालावधी: २४ महिने निविदा सूचना क्रमांक: १८-२०२५-SrDENCo कामाचे नाव: १-सोलापूर स्थानकावर गर्दी व्यवस्थापनासाठी उत्सव काळात योग्य कुंपण, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि इतर सुविधांसह कव्हर शेडची तरतूद. २- केएलबीजी स्थानकावर गर्दी व्यवस्थापनासाठी कॅरेज वॉटरिंग सुविधा आणि सर्व प्रवाशांच्या सुविधांसह होल्डिंग एरियाची तरतूद. कामाची अंदाजे किंमत: रु. १५१४३२१५६.६१ बयाणा रक्कम: रु. ९0७२00.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने देखभाल कालावधी: २४ महिने www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ १६/१२/२०२५ रोजी दुपारी ३.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ १६/१२/२०२५ रोजी दुपारी ३.३0 वाजता. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट: www.ireps.gov.in ANJ-68

परवानगीशिवाय रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

प्रस्तुत शाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेय विशेषतः मौजे साकत, तालुका बार्शी व जिल्हा सोलापूर येथील व आरापाराचे सालग्न तालुक्यातील य परिसरातील तमाम लोकांना कळविण्यात येते की, तालुका बार्शी पैकी मौजे साकत येथील शेतजमीन याचा गट नं. ८८ पैकी दक्षिणेकडील बाजूचे क्षेत्र 0 हे ४९ आर, आकार १ रु ४३ पैसे हि मिळवत उत्तम अंबादास मोरे याचे नावे असून मालकीचे व कब्जे वहिवाटाची जमीन असुन याची चतुःसिमा पुर्वेस पिंपरी शिव, दक्षिणेस गट नं. ८९, पश्चिमेश- गट नं. ७४ उत्तरेस गट नं. ८८ पैकी उर्वरित क्षेत्र येणेप्रमाणे चतुःसिमा पुर्वक शेतजमीन आतील सर्व झाडझुडुप, दगड, माती, तरंगभुत वस्तु हक्कासह.

वर नमुद शेतजमीन हि उत्तम अंबादास मोरे यांचे पोकळ स्वरुपी नावे असुन सदर मिळकत आमचे अशिल बापु सोपान मोरे यांनी त्यांना दिनांक २२/0६/१९८९ रोजी पोकळ खरेदी दिलेली होती. सदर मिळकतीच्या बदल्यात आमचे अशिल यांना उत्तम अंबादास मोरे यांनी त्यांचे नावे असलेली दुसरी मिळकत खरेदी देण्याचे ठरवलेले होते. परंतु त्यावेळी यातील उत्तम अंबादास मोरे यांनी त्यांच्या नावे असलेली मिळकत आमचे अशिलांना फसवुन त्रयस्त व्यक्तीस विक्री केल्यामुळे आमचे अशिलांनी शेतजमीन गट नं. ८८ मधील त्यांचे वडील सोपान उध्दव मोरे यांचे असणारे कुळ कमी करून कब्जा दिलेला नाही. आमचे अशिल यांचेकडुन उत्तम अंबादास मोरे यांनी गट नं. ८८ मधील क्षेत्राचे पोकळ खरेदी घेतलेली आहे. सदर मिळकत आमचे अशिलांचे प्रत्यक्ष कब्जात असून सदर मिळकतीवर आमचे अशिलांचे कुळ आहे. त्यामुळे सदर मिळकत आमचे अशिलांना प्रथम खरेदी करण्याचा हक्क व अधिकार आहे.

सदरची मिळकत उत्तम अंबादास मोरे हे ७/१२ हक्कपत्रकी असलेल्या पोकळ नोंदीचा गैर आधार घेऊन त्रयस्त व्यक्तीस विक्री करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे सदर मिळकत हि सरकारी मुल्यांकनाप्रमाणे आमचे अशिलांना खरेदी करण्याचा हक्क व अधिकार आहे. आमचे अशिल बापु सोपान मोरे यांचे कब्जे वहिवाटीत कुळ म्हणून पुर्वहक्कदारापासून गट नं. ८८ ताब्यात आहे. तशा वहिवाट सदरी नोंदी आमच्या अशिलाच्या वडीलांपासुन आहेत. परंतु उत्तम अंबादास मोरे यांनी त्यांची ७/१२ पत्रकी पोकळ नोंद मालक सदरात असल्याचा गैरफायदा घेवून वर नमुद मिळकत विक्रीस काढली आहे. तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, कुळ म्हणून पुर्वापारपासून गट नं. ८८ आमचे अशिलाचे ताब्यात असल्याने कोणीही कसल्याही प्रकारचा गट नं. ८८ बाबत व्यवहार उत्तम अंबादास मोरे यांच्याशी करू नये केल्यास तो व्यवहार मुलतः रद्दबातल ठरेल व आमचे अशिलाचे हक्कावर व कब्जावर बंधनकारक राहणार नाही. कळावे हि जाहीर नोटीस दिली. ता. २१/११/२०२५

सही/-
**ॲड राहुल अंकुश पाटील**
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो. ९५२७०२३११८
अशिलातर्फे ॲडव्होकेट

## महत्त्वाचे

### टेबल टेनिस स्पर्धेत भारताला दोन पदके

**नवी दिल्ली** : रोमानिया येथे झालेल्या आयटीटीएफ जागतिक युवा टेबल टेनिस स्पर्धेत भारताने चमकदार कामगिरी केली. पदार्पणाच्या वर्षातच एक रौप्य आणि एक कांस्य अशी पदके जिंकली. १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने दमदार कामगिरी दाखवत अंतिम फेरीत प्रवेश केला. तथापि, विजेतेपदाच्या सामन्यात त्यांना बलाढ्य जपानकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला आणि रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. अंकुर भट्टाचार्य, अभिनंदन आणि प्रणुज यांनी अंतिम फेरीत जोरदार लढत दिली, परंतु जपानी खेळाडू युंसेई कावाकामी, काझुकी योशियामा आणि तमितो वातानाबे यांनी निर्णायक विजय मिळवला. १५ वर्षांखालील मुलींच्या संघानेही उत्कृष्ट कामगिरी करत जर्मनीला ३-१ असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यांना दक्षिण कोरियाकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला. त्यांनी कांस्य पदक जिंकले. १९ वर्षांखालील मुलींच्या स्पर्धेत भारताने उपांत्यपूर्व फेरी गाठली, जिथे चायनीज तैपेईने भारतीय खेळाडूंचे आव्हान ३-२ असे रोखले. या अजिंक्यपद स्पर्धेत भारताने पदकतालिकेत एक मजबूत उपस्थिती दर्शविली.

### महाराष्ट्राची वेटलिफ्टिंग, जलतरणात पदकांची लयलूट

**बिकानेर** : खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेतील पाचव्या पर्वात सलग दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. वेटलिफ्टिंगमधील ६५ किलो वजन गटात पुणे विद्यापीठाच्या संजय लोखंडेने सुवर्णपदकाचा करिश्मा घडविला. जलतरणात दीपक पाटील, साहिल पवार यांनी रुपेरी यशाला गवसणी घातली. अहिल्यानगरमधील पाथर्डी तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील संजय लोखंडे याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना ६५ किलो वजन गटात १०७ किलो स्नॅच व १३७ किलो क्लीन अॅण्ड जर्क असे एकूण २४४ किलो वजन उचलून सुवर्ण पदक पटकावले. त्याला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. विजय देशमुख, प्रा. सचिन शिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले. जयपूरमध्ये सुरू असलेल्या जलतरण स्पर्धेत पुरुषांच्या २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक शर्यतीत मुंबई विद्यापीठाच्या दीपक बाजीराव पाटील यांनी अचूक तंत्र, दमदार वेग आणि उत्कृष्ट तयारीच्या जोरावर रौप्य पदक पटकावले. जैन विद्यापीठाच्या मणिकांत एल यांनी २:२४.८७ वेळ नोंदवत सुवर्णपदकावर नाव कोरले. पाटीलने २:२८.८६ वेळेत शर्यत पूर्ण करीत रूपेरी यशाची कमाई केली. पंजाब विद्यापीठाच्या केशव कौशिक यांनी २:२९.५५ वेळ नोंदवत कांस्य पदक मिळवले. पुरुषांच्या ५०मी फ्रीस्टाईल प्रकारात पुणे विद्यापीठाच्या साहिल पवारने रौप्य पदकाची कमाई केली. २४.३५ सेकंदात शर्यत पूर्ण करीत खेलो इंडिया स्पर्धेत पदकावर नाव कोरले. जैन विद्यापीठाच्या श्रीहरी नटराजने २३.७९ सेकंदाची अव्वल कामगिरी करीत सुवर्णपदक तर ज़ेवियर डीसूज़ाने कांस्यपदक पटकावले.

### सिंदारोव्ह फिडे विश्वचषक जिंकणारा सर्वात तरुण खेळाडू

**पणजी** : उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोव्हने बुधवारी येथे चीनच्या वेई यीचा पराभव करून फिडे विश्वचषक जिंकला. यामुळे तो १९ व्या वर्षी ही कामगिरी करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला. वेई यीने पांढऱ्या सोंगट्यांसह आणखी एक सोपा ड्रॉ खेळला. परंतु सिंदारोव्हने पांढऱ्या सोंगट्यांसह दुसरा गेम जिंकला. सिंदारोव्ह आणि वेई दोघेही कॅंडिडेट्समध्ये खेळतील. वेईला ८५,००० डॉलर्स इतकी बक्षीस रक्कम मिळाली. सिंदारोव्ह, वेई यी आणि रशियाचा आंद्रे एसिपेंको या विश्वचषकातून पात्र ठरले.

# द. आफ्रिकेचा सामन्यासह मालिका विजय

**भारताचा ४०८ धावांनी पराभव • सामनावीर मार्को यान्सन, मालिकावीर सायमन हार्मर**

**♦ गुवाहाटी, २६ नोव्हेंबर**

भारताला घरच्या मैदानावर आणखी एका दारुण पराभवाचा सामना करावा लागला. दक्षिण आफ्रिकेने गुवाहाटी कसोटी ४०८ धावांनी जिंकली. दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताला २-० ने पराभवाचे तोंड पाहावे लागले. दक्षिण आफ्रिकेने कोलकाता कसोटी ३० धावांनी जिंकली. दक्षिण आफ्रिकेने ५४९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. जागतिक कसोटी विजेता द. आफ्रिकेने दुसऱ्या डावात भारताला १४० धावांत गुंडाळले आणि ४०८ धावांनी विजय मिळवला. हा भारताचा एकूण आणि घरच्या मैदानाच्या फरकाने सर्वांत मोठा कसोटी पराभव आहे. यापूर्वी २००४ मध्ये नागपूरमध्ये भारताचा ऑस्ट्रेलियाने ३४२ धावांनी पराभव केला होता. सामनावीर मार्को यान्सन तर मालिकावीर सायमन हार्मर ठरला.

पाहुण्या संघाने पहिल्या डावात ४८९ धावा केल्या आणि दुसऱ्या डावात ५/२६० धावांवर डाव घोषित केला. भारतासमोर ५४९ धावांचे मोठे लक्ष्य होते.





भारताविरुद्ध २-० ने कसोटी मालिका जिंकल्यानंतर चषकासह आनंद साजरा करताना दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू

भारतीय संघ दबावाखाली खेळला. पहिल्या डावात फक्त २०१ धावा आणि दुसऱ्या डावात १४० धावाच करता आल्या. दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी दोन्ही डावात भारतीय फलंदाजांना बांधून ठेवले. दक्षिण आफ्रिकेकडून सायमन हार्मरने दुसऱ्या डावात ६ बळी आणि सामन्यात ९ बळी घेतले.

भारताच्या दुसऱ्या डावाची सुरुवात खराब झाली. यशस्वी जयस्वाल (१३) स्वस्तात बाद झाला, मार्को यान्सनच्या गोलंदाजीवर यष्टीरक्षक काइल व्हेरेनने त्याला टिपले. त्यानंतर लगेच केएल राहुल (६) देखील सायमन हार्मरचा बळी ठरला. पाचव्या दिवशी, भारताने २७/२ च्या धावसंख्येसह फलंदाजी सुरू केली. तथापि, कुलदीप यादवला सायमन हार्मरने ५ धावांवर बाद केले तेव्हा एकूण धावसंख्येत आणखी १३ धावा जोडल्या गेल्या. त्याच षटकात ध्रुव जुरेल देखील बाद झाला. त्यानंतर भारतीय कर्णधार पंतने आक्रमकता दाखवत एक चौकार आणि एक षटकार मारून संघाची धावसंख्या ५८ धावांवर नेली, परंतु तोही हार्मरच्या बाउन्सवर १३ धावांवर एडेन मार्करामकरवी बाद झाला. चहापानानंतर, साई सुदर्शनचाही संयम सुटला आणि त्याला सेनुरन मुथुस्वामीने १४ धावांवर बाद केले. वॉशिंग्टन सुंदर (४४ चेंडूत १६) देखील फारशी प्रभावी कामगिरी करू शकला नाही. हार्मरने त्याला बाद केले.

नितीश रेड्डी शून्य धावांवर बाद झाला. भारताकडून केवळ रवींद्र जडेजा प्रभावी ठरला. त्याने द. आफ्रिकेच्या गोलंदाजांचा सामना करीत ८७ चेंडूत ५४ धावा केल्या. मोहम्मद सिराज बाद होणारा शेवटचा फलंदाज होता. जसप्रीत बुमराह १ धाव काढून नाबाद होता. (वृत्तसंस्था)

## ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पराभवाचे दु:ख अजूनही कायम



सूर्यकुमारचे मत

**♦ मुंबई, २६ नोव्हेंबर**

कर्णधार सूर्यकुमार यादव हा रोहित शर्माच्या त्या शानदार संघाचा भाग होता ज्याने २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात सलग १० सामने जिंकले होते आणि त्यानंतर अहमदाबादमध्ये झालेल्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला होता आणि आता पुढच्या वर्षी त्याच ठिकाणी टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात त्यांना खेळवायचे आहे.

मंगळवारी, २०२६ च्या टी-२० विश्वचषकासाठी गतविजेत्या भारताला पाकिस्तान, अमेरिका, नेदरलँड्स आणि नामिबियासह गट अ मध्ये स्थान देण्यात आले होते, तर ऑस्ट्रेलियाला श्रीलंका, आयर्लंड, झिम्बाब्वे आणि ओमानसह गट ब मध्ये स्थान देण्यात आले होते.

१९ नोव्हेंबर २०२३ च्या झालेल्या अंतिम सामन्यानंतर भारताने ऑस्ट्रेलियाला दोन सामन्यांमध्ये पराभूत केले आहे, परंतु त्यानंतर दोन आयसीसी स्पर्धा जिंकणाऱ्या खेळाडूंमध्ये अंतिम फेरीत त्यांना पराभूत करण्याची इच्छा कायम आहे. गेल्या टी-२० विश्वचषकाच्या सुपर एट सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा २४ धावांनी पराभव केला आणि या वर्षीच्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीतही त्यांना चार गडी राखून पराभव केला.

पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात कोणत्या संघाचा सामना करायचा आहे असे विचारले असता, सूर्यकुमारने म्हणाला, अहमदाबादचे नरेंद्र मोदी स्टेडियम, ऑस्ट्रेलिया.

भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरच्या संघाने उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाला हरवून अलिकडेच विश्वचषक जिंकला होता, तिनेही तेच मत मांडले. (वृत्तसंस्था)



## श्री साई औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग दि २६ नोव्हेंबर-**

श्री साई औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात झाला. या क्रीडा महोत्सवामध्ये विविध ट्रेडमधून ७२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सर्व निदेशकांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा उत्साहात पार पडल्या. बुधवारी संविधान दिनाचे औचित्य साधून या स्पर्धांच्या विजेत्यांना श्री साई चॅरिटेबल संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मीरा सूर्यवंशी आणि प्राचार्य श्याम गोवर्धन यांच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफीचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघराज गायकवाड यांनी केले. अहवाल वाचन प्रसाद पोळ यांनी केले. संभाजी जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

## राज्य बास्केटबॉल स्पर्धेत सोलापूर व जळगाव विजेते

### डॉ. आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धा

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ लोणेरे रायगड अंतर्गत झालेल्या आंतरविभागीय बास्केटबॉल स्पर्धेत पुरुष गटात सोलापूरने व महिला गटात जळगावने विजेतेपद पटकाविले. सोलापूर विभागामध्ये धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली व सोलापूर या जिल्ह्यातील खेळाडूंचा समावेश होता .

एन. के. ऑर्किड महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर, पुणे, सोलापूर, नागपूर, जळगाव सहा विभागातील अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी भाग घेतला होता. या स्पर्धा दिवसा, सायंकाळी व विद्युतझोतातही घेण्यात आल्या. पुरुष गटातील अंतिम सामन्यात सोलापूरने कोल्हापूरवर तर मुलींमध्ये जळगावने कोल्हापूर वर मात केली. सोलापूरच्या महिला संघास तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड, ग्रामीण टेक्निकल इन्स्टिट्यूट नांदेडचे प्रा सलीम सय्यद, बास्केटबॉलचे पंच राजेंद्र नारायणकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आयोजन व पात्रता समितीचे सदस्य ए. एस जामदार, प्रा अमित वाडवेराव हे उपस्थित होते. यशस्वी खेळाडूंचे प्राचार्य डॉ बी के सोनगे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास मेतन, डॉ व्ही. के. पत्की आदींनी अभिनंदन केले. या स्पर्धा पार पाडण्यासाठी आयोजन समिती सदस्य प्रा शिवशरण कोरे, प्रा गणेश बागल, प्रा ऋचा श्रीराम, आयटी सेलचे आर. आर. पाटील, लॅब असिस्टंट श्री पाटील, वामन पवार, इक्बाल शेख, प्रमोद लिगाडे, दादा पांगळे, खेळाडू समन्वयक प्रतीक राय, विद्यार्थी क्रीडा सचिव प्रवीण गुंजाळ यांच्यासह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.





## शिंदे बीपीएड महाविद्यालयाच्या आकांक्षा गावडेला दोन सुवर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत सुशीलकुमार शिंदे बीपीएड महाविद्यालयाच्या आकांक्षा गावडे हिने दोन सुवर्णपदके पटकाविली. दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत आकांक्षाने २०० व ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत ही कामगिरी केली. तसेच महाविद्यालयाने विद्यापीठाचा महिला गटात पांडुरंग मस्करने फिरता करंडक पटकाविला. आकांक्षाचे संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, उपाध्यक्ष विवेक चव्हाण, प्राचार्या डॉ.कलाश्री देशपांडे, प्रा.नागनाथ पुदे. प्रा.विजय तरंगे, सुनील राठोड, अनिल राठोड यांनी अभिनंदन केले.



## उमाबाई श्राविका विद्यालयास विजेतेपद

### शालेय शहर आट्यापाट्या : दोन गटात उपविजेते, दोन गटात तृतीय स्थान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

शासकीय मैदान नेहरूनगर येथे झालेल्या शालेय शहर आट्यापाट्या स्पर्धेत उमाबाई श्राविका विद्यालयाने १४ वर्षांखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले. या संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. १७ वर्षांखालील मुले व मुलींनी उपविजेतेपद तर १९ वर्षांखालील मुले व १४ वर्षांखालील मुलींना तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.

संघास क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, वरिष्ठ दिप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले.

**यशस्वी संघातील खेळाडू : विजेते** : १४ वर्षे मुली : जोया शेख, साक्षी सुरडे, तुलसी माने, तनिष्का माने, कृष्णाली सोनटक्के, वैष्णवी जव्हेरी, अमृता जाधव, अनुजा कांबळे, कल्याणी जाधव, देवयानी रोमन, उपासना गुंड, अंजली गरड, भाग्यश्री गरड.

**उपविजेते:** १७ वर्षे मुली : अनुष्का केत, समृद्धी जगताप, ईश्वरी शिंदे, सुमेधा ढावरे, वैष्णवी शेरखाने, अंबिका गुंड, अपूर्वा शिंदे, सृष्टी रणदिवे, श्रावणी बहिरमल, सुजाता ढोकळे. मुले : श्रेयस चट्टे, शरद कादे, कृष्णा काकडे, यश बेळ्ळे, ओम पवार, हर्ष कोकरे, श्रेयस भोसले, आरोष घोडके, प्रथमेश आगलावे, धीरज बरडे,विश्वतेज हचडे.

**तृतीय** : १९ वर्षे मुले : अथर्व साठे, राजवर्धन घोडके, हर्षवर्धन घोडके, अर्चित बनसोडे, समर्थ चुंगे, आरुष घोडके, राजू कबाडे, तन्म हिप्परकर, संकेत बोराडे, रुद्र होनराव, सोहम शिंदे, रोहित मठे, शुभम पौळ.

१४ वर्षे मुले : अथर्व होळकर नैतिक गायकवाड हर्षल चौगुले प्रणव भांगे सुरज बरडे, मयूर यमगर, यश भोज, हट्टीवाले, लोक बर्डे, वेदांत ढोकळे, शिवराज कोरे.

# सोलापूर विद्यापीठातील विविध खेळांच्या सराव शिबीरास सुरुवात

- **महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव**
- **८ खेळ, १६ संघ, १८७ जणांचा चमू सहभागी होणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**

महामहिम राज्यपाल कार्यालय आयोजित महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा जगतातील एक महत्त्वपूर्ण असलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आठ खेळातील सोळा संघाच्या सराव शिबिरास सुरुवात झाली.

यावर्षी या स्पर्धेचे आयोजन स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे ४ ते ८ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे. सोलापूर विद्यापीठाकडून या महोत्सवासाठी खेळाडू, प्रशिक्षक आणि व्यवस्थापकांचा असा एकुण १८७ जणांचा मोठा चमू नांदेडकडे कूच करणार आहे. यात १६२ खेळाडू (पुरुष व महिला), २४ संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक आणि १ स्पर्धा समन्वयक यांचा समावेश आहे. या स्पर्धेत अॅथलेटिक्स, बास्केटबॉल, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो, टेबल टेनिस, बॅडमिंटन व बुद्धिबळ या आठ क्रीडा प्रकारांचा समावेश आहे.





या स्पर्धेच्या अनुषंगाने सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, आणि संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग डॉ. अतुल लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंच्या स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरांसाठी व तयारीसाठी विशेष नियोजन करण्यात आले.

बास्केटबॉल, कबड्डी, व्हॉलिबॉल, खो-खो, आणि बुद्धिबळ या खेळांच्या पुरुष व महिला संघांचे १० दिवसांचे स्पर्धा पूर्व सराव शिबीर विद्यापीठ परिसरात २२ नोव्हेंबरपासून सुरू झाले आहे. १ डिसेंबरपर्यंत हे शिबिर होणार आहे. या शिबिरामध्ये ११२ खेळाडू तसेच त्यांचे प्रशिक्षक व व्यवस्थापक यांच्या निवासाची व भोजनाची उत्तम व्यवस्था विद्यापीठ परिसरात करण्यात आली आहे. सरावासाठी व्हॉलिबॉल मैदान (फ्लड लाईटसह), बास्केटबॉल सिंथेटिक ग्राऊंड (फ्लड लाईटसह), कबड्डी मैदान (मॅटसह), आणि खो-खो मैदान यांसारख्या अद्ययावत सुविधा तयार करण्यात आल्या होत्या.

विद्यापीठ परिसराबाहेरील इतर ठिकाणी देखील खेळाडूंसाठी सराव शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. अॅथलेटिक्सचे शिबीर येथील डीबीएफ दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या मैदानावर व टेबल टेनिसचे पार्क मैदानावरील मुळे पॅव्हिलियन हॉल मध्ये तर बॅडमिंटनचे कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथे सुरू आहे. या संपूर्ण तयारी आणि स्पर्धेसाठी बाळासाहेब वाघचवरे यांची क्रीडा समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### विद्यापीठाचे खेळाडू चांगली कामगिरी करतील

सोलापूर विद्यापीठाच्या या मोठ्या चमूची विद्यापीठ परिसरात व अन्य ठिकाणी विविध मैदानावर कसून तयारी सुरू आहे. या क्रीडा महोत्सवात सोलापूर विद्यापीठाचे खेळाडू निश्चितच चांगली कामगिरी करतील, अशी अपेक्षा आहे.

**-बाळासाहेब वाघचवरे, स्पर्धा समन्वयक**

### हे आहेत विविध खेळाचे प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक

- **अॅथलेटिक्स : डॉ. अशोक पाटील, डॉ. किरण चोकाककर,धनंजय देशमुख.**
- **बास्केटबॉल : डॉ. स्मिता सुरवसे, डॉ. महेश ढेंबरे, डॉ. प्रशांत तांबिले.**
- **व्हॉलिबॉल : नंदकिशोर देशपांडे, खंडू चव्हाण, डॉ. सुरेश लांडगे.**
- **कबड्डी : सुवर्णा कांबळे, विजय पवार, डॉ. रविंद्र कुनाळे.**
- **खो-खो :डॉ. सुभाष मारकड, डॉ. शिवानंद तोरवी, विशाल होनमाने.**
- **बॅडमिंटन : मकरंद भुजबळ, महादेव वाघमारे,. डॉ. समर्थ मनुकर.**
- **टेबल टेनिस : गुलनार हरकारे,अनिल परमार प्रा. संतोष गवळी.**
- **बुद्धिबळ :दिपक भोसले, जगदिश चेडे, डॉ. सुरेश भोसले.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सोनंद येथील जय काशीद यांची सैन्यदलात अग्नीवीरसाठी निवड

**सांगोला, दि.२६ नोव्हेंबर-**

सांगोला तालुक्यातील सोनंद गावचे सुपुत्र जय सर्जेराव काशीद यांची भारतीय सेनेमध्ये अग्नीवीर साठी निवड झाली आहे. या निवडीबद्दल सोनंद येथील आजी माजी सैनिक कल्याण संघ यांचे वतीने माजी सैनिक उत्तम चौगुले यांचे हस्ते जय काशीद यांचा सत्कार करण्यात आला. असेच कार्य संघटनेच्या वतीने पुढे चालू ठेवावे, जेणेकरून समाजाला एक चांगली शिस्त लागेल. तसेच देश सेवेसाठी नवीन पिढी तयार झाली पाहिजे. यासाठी सर्व माजी सैनिकांनी असे विचार आपल्या परिसरात मांडले पाहिजेत असे मनोगत उत्तम चौगुले यांनी यावेळी व्यक्त केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनंद संघटनेचे अध्यक्ष ऑनरी सुभेदार मेजर रामचंद्र काशीद, सचिव ठोकळे व संघटनेचे सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले.



### कुसमोड येथे शालेय साहित्याचे वाटप; संविधान दिनानिमित्त आयोजन

**पिलीव, दि. २६ नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्ह्य परिषद लक्ष्मीनगर शाळेत आज संविधान दिनानिमित्त शाळेचे मुख्याध्यापक सुनिल डुरे सर यांच्या हस्ते डॉकटर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिनाचे महत्व सांगीतले. आज संविधान दिनाचे औचित्य साधून या शाळेचे माजी मुख्याध्यापक स्व. शंकरराव लेंगरे गुरूजी यांच्या द्वितीय पुणयसमरणानिमीत शैक्षणिक साहित्याचे व खाऊचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.यावेळी अंगणवाडी सेविका सत्यभामा मदने, मदतनीस सरगर उपस्थित होते.

### करे महाराज दत्त मंदिरात आज होणार मूर्ती प्राणप्रतिष्ठापना

**मंगळवेढा दि. २६ नोव्हेंबर-**



दामाजीनगर, जुना ढवळस रोड, त्रिमूर्ती नगर येथे आज गुरुवार दि. २७ नोव्हेंबर रोजी नूतन श्री गुरुदेव दत्त मंदिर व मूर्ती प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. यावेळी सकाळी नऊ वाजता मिरवणूक सोहळा, सकाळी दहा वाजता होम हवन, दुपारी १२.१५ वाजता आरती आणि दुपारी एक वाजता महाप्रसादाचे आयोजन केले आहे. गुरुवारी दि. ४ डिसेंबर रोजी श्री दत्त जयंती निमित्त फुलांचा कार्यक्रम दुपारी बारा वाजता आयोजित केला आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी निर्गुण मठ श्रीक्षेत्र मंगळवेढा येथे सकाळी आठ वाजता उपस्थित राहण्याचे आवाहन तायप्पा करे महाराज यांनी केले आहे.

## निधन वार्ता...

### विजया कलढोणे



**करकंब, दि. २६ नोव्हेंबर-**

करकंब (ता.पंढरपूर) येथील विजया गोरखनाथ कलढोणे वय ७९ यांचे बुधवार, दि.२६ नोव्हेंबर रोजी विटा येथे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर विटा (सांगली) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुले, जावई, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्या जि. प. प्राथमिक शाळेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका होत. गायक दीपक कलढोणे व एलआयसीचे विकास अधिकारी किरण कलढोणे तसेच एलआयसी सातारा विभागाच्या असिस्टंट डिव्हिजनल मॅनेजर ज्योती चोथे यांच्या त्या मातोश्री होत.

### दत्तात्रय वग्गु



**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

गोदूताई विडी घरकुल, कुंभारी रोड येथील दत्तात्रय परभय्या वग्गु (वय ८५) यांचे बुधवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे

### सुमन भोसले



**टेंभुर्णी, दि. २६ नोव्हेंबर-**

चव्हाणवाडी भोसले वस्ती येथील सुमन रामदास भोसले यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या सोलापूर डीसीसी बँकेचे कॅशियर औदुंबर भोसले यांच्या आई होत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### रुद्रांबिका कंठीमठ



**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

येथील एलआयसी एजंट सोमशंकर कंठीमठ यांच्या मातोश्री रुद्रांबिका कंठीमठ (वय ७५) यांचे बुधवारी २६ नोव्हेंबर रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी वीरशैव लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ४ मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

# बार्शी बाजार समिती निवडणूक : सोपलांची परिवर्तन आघाडी अन् राऊतांची बळीराजा आघाडी यांच्यात जोरदार फाईट

**१६ जागांसाठी ३६ उमेदवार मैदानात; ७९ जणांची माघार दोन जागा यापूर्वीच बिनविरोध**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२६ नोव्हेंबर**

बार्शी उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विविध मतदार संघातील ७९ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने १६ जागांसाठी ३६ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. या निवडणुकीसाठी आमदार दिलीप सोपल यांच्या नेतृत्वाखालील बाजार समिती परिवर्तन आघाडी विरुद्ध माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखालील बळीराजा विकास आघाडीत दुरंगी लढत होणार आहे. या निवडणुकीत व्यापारी मतदारसंघातील दोन जागी राऊत गटाचे उमदेवार यापूर्वीच बिनविरोध झाले आहेत.

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीसाठी सहकारी संस्था, ग्रामपंचायत, हमाल तोलार व व्यापारी मतदारसंघात





११७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. अर्ज माघारी घेण्याच्या कालावधीत यापूर्वीच व्यापारी मतदारसंघातील तीन उमेदवाराने अर्ज माघारी घेतल्याने या मतदारसंघातील माजी आमदार राजेंद्र राऊत गटाचे भरतेश गांधी व प्रवीण गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली होती. तर उर्वरित १६ जागांसाठी दाखल केलेले अर्जामध्ये ७९ जणांनी माघार घेतल्याने ३६ उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यात शिल्लक राहिले आहेत.

बार्शी तालुक्यात १३५ विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसाट्यातील १६४३ संचालक ग्रामपंचायतीचे १०३९ सदस्य, आणि हमाल तोलार मतदारसंघातील १०२५ मतदारांना मतदानाचा अधिकार आहे. उमेदवारी अर्ज माघार घेतल्यानंतर दिलीप सोपल आणि राजेंद्र राऊत या दोघांनी आपल्या आघाडीची घोषणा करत उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे या दोघांमध्ये चुरशीची लढत या निवडणुकीसाठी होणार आहे.

**दोन गटात सरळसरळ लढत**

सोसायटी मतदारसंघात १ तर हमाल तोलार मतदारसंघात २, ग्रामपंचायत मतदारसंघात १ असे चार उमेदवार सोपल-राऊत यांचे पॅनल सोडून अपक्ष उभे राहिले आहेत. एकंदरीत या निवडणुकीसाठी दोन गटात सरळसरळ लढत होत आहे.

**७ डिसेंबरला मतदान**

आज दि.२६ रोजी अंतिम उमेदवाराची यादी जाहीर केली जाणार आहे तर ७ डिसेंबर रोजी मतदान तर ८ डिसेंबर रोजी निकाल जाहीर केला जाणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी आबासाहेब गावडे यांनी सांगितले.

**बळीराजा विकास आघाडीचे उमेदवार**


- सहकारी संस्था सर्वसाधारण : सुरेश गुंड, बाबा गायकवाड, विजय गरड, अभिजीत कापसे, प्रभाकर डमरे, रविकांत साळुंखे, आणि यशवंत माने.
- सहकारी संस्था महिला राखीव : मनीषा ताकभाते, सुमन पाटील
- सहकारी संस्था इतर मागासवर्गीय : संजयकुमार माळी.
- सहकारी संस्था विमुक्त जाती भटक्या जमाती : रामेश्वर पाटील.
- ग्रामपंचायत सर्वसाधारण : नेताजी घायतिडक, अजित बारंगुळे.
- ग्रामपंचायत अनुसूचित जाती जमाती : सतीश हनुमंते.
- ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल घटक : सचिन बुरगुटे
- हमाल तोलार प्रतिनिधी : गजेंद्र मुकटे

**परिवर्तन आघाडीचे उमेदवार**

- सहकारी संस्था सर्वसाधारण : युवराज काटे, संपतराव चव्हाण, नंदकुमार काशीद, राजकुमार पुजारी, धर्मराज गाडे, संपत अंधारे, अशोक काशीद.
- सहकारी संस्था महिला राखीव : सुषमा पाटील, ज्योती पवार.
- सहकारी संस्था इतर मागासवर्गीय : भास्कर काशीद
- सहकारी संस्था विमुक्त जाती भटक्या जमाती : सुभाष शेळके.
- ग्रामपंचायत सर्वसाधारण : आबासाहेब जगताप, सौदागर संकपाळ.
- ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल : बाळासाहेब पिसाळ
- ग्रामपंचायत अनुसूचित जाती जमाती : विनोद वाघमारे.
- हमाल तोलार प्रतिनिधी : प्रेम बगाडे

## लाच घेताना तालुका कृषी अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**



महाडीबीटी पोर्टलवर शेतीसाठी मिळणाऱ्या अनुदानाच्या अर्जाला पूर्व मंजुरी देण्यासाठी १० हजारांची लाच मागितल्याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी धनंजय सुभाष शेटे (वय ३१) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) सोलापूर युनिटने रंगेहात पकडले. तडजोडीअंती ८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली.

तक्रारदार यांचे वडील यांनी कृषी विभागाकडून मिळणाऱ्या शेती अवजारांसाठी 'आपले सरकार' पोर्टलमार्फत ऑनलाईन अर्ज केला होता. या अर्जाला महाडीबीटी पोर्टलवर पूर्व मंजुरी देण्यासाठी आरोपी शेटे यांनी २५ नोव्हेंबर रोजी १० हजारांची मागणी केली होती. तडजोड झाल्यानंतर ८ हजार रुपये घेण्याचे ठरले. बुधवारी (दि. २६) रोजी उत्तर सोलापूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कक्षात आरोपी शेटे समोरील टेबलवरील कागदांमध्ये ठेवलेली ८ हजारांची रक्कम स्वीकारताना एसीबी पथकाने त्यांना सापळा रचून रंगेहात पकडले. आरोपीविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ अंतर्गत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई एसीबी पुणे शिरीष सरदेशपांडे, एसीबी पुणे अपर पोलीस अधीक्षक अजित पाटील, पर्यवेक्षण अधिकारी एसीबी सोलापूरचे पोलीस उपाधीक्षक प्रशांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शैलेश पवार, रविंद्र लांभाते, पोह. सलीम मुल्ला, पोह. श्रीराम घुगे, पोह. स्वामीराव जाधव, पोशि. राजू पवार, चापोशि. अक्षय श्रीराम यांनी केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आवाहन केले आहे की, लाच मागणाऱ्या कोणत्याही लोकसेवकाबद्दल माहिती असल्यास नागरिकांनी त्वरित एसीबीशी संपर्क साधावा.

## वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून ग्रामसेवकाची आत्महत्या

**अधिकाऱ्यांनी पैशाची मागणी केल्याची तक्रार; सात दिवस मृत्यूशी झुंज**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२६ नोव्हेंबर-**

ग्रामसेवक प्रकाश बाविस्कर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अखेर मृताची मुलगी दिव्या बाविस्कर (वय-२४) यांनी बार्शी शहर पोलिसांत अधिकृत फिर्याद दाखल केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सतत पैसे मागितले जात असल्यामुळे व वारंवार नोकरीवरुन काढून टाकण्याच्या धमक्या दिल्यामुळे वडिलांनी हा टोकाचा निर्णय घेतल्याचा गंभीर आरोप त्यांनी आपल्या जबाबात केला आहे. ही घटना १९ नोव्हेंबर रोजी घडली होती. सात दिवस उपचार सुरु असताना २५ नोव्हेंबर रोजी रात्री ११.३० वाजता हॉस्पिटलमध्ये प्रकाश बाविस्कर यांचा मृत्यू झाला.

**पैशाची मागणी, अफरातफरीत अडकविण्याची धमकी : दिव्या बाविस्कर यांचा गंभीर आरोप**

फिर्यादीनुसार, दिव्या बाविस्कर व तिचे आई-वडील व भाऊ संबरतनगर, बार्शी येथे भाड्याने राहतात. प्रकाश बाविस्कर हे अंबड (ता. माढा) येथील ग्रामपंचायत कार्यालयात सहा महिन्यांपासून ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते. १९ नोव्हेंबर रोजी दुपारी १.३० च्या सुमारास कार्यालयातून फोन आला आणि वडिलांना तात्काळ ऑफिसमध्ये बोलाविण्यात आले. 'साहेब स्वतः भेटण्यास बोलावत आहेत', अशी माहिती त्यांना देण्यात आली. दिव्या यांच्या म्हणण्यानुसार फोननंतर वडील प्रचंड तणावात होते. त्यांनी मुलगी व पत्नीला सांगितले विस्तार अधिकारी अक्षर शेडगे यांचा फोन आल्याचे सांगत वरिष्ठ अधिकारी भुजबळ ऑफीसमध्ये तात्काळ भेटण्यासाठी बोलाविल्याचे सांगितले. मुलीने व पत्नीने काय झाले विचारले असता मी आधीही पैसे दिले आहेत, तरीही वारंवार कार्यालयीन अधिकारी पैशाची मागणी केली जाते. अधिकारी मला नोकरीवरुन काढून टाकण्याची धमकी देतात, अफरातफरीच्या गुन्ह्यात अडकवून नोकरीवरुन हाकलतो, असे म्हणतात. मी प्रामाणिकपणे काम करतो, तरीही जाणूनबुजून मानसिक त्रास दिला जात असल्याचे सांगितले. या त्रासाला मी कंटाळलो असल्याचे मुलगी व पत्नीने सांगितले. यावर पत्नी व मुलीने वडिलांना समजावून सांगितले होते.

**दुपारी २.३० वा. धक्कादायक घटना; घरातील किचनमध्ये गळफास**

वडिलांना समजवल्यानंतर दिव्या अभ्यासासाठी बेडरुममध्ये तर आई घराबाहेर पाणी मारण्यासाठी गेली असताना, किचनमध्ये मोठा आवाज झाल्याने आईने धावत आत येत पाहिले तेव्हा प्रकाश बाविस्कर यांनी किचनमधील सिलिंग फॅनला झेंडा दोरीने गळफास घेतलेला होता. आईने त्यांचे पाय पकडून वर उचलत मदतीसाठी आरडाओरडा केला. दरवाज्याची कडी बाहेरुन बंद असल्याने दिव्या बाहेरुन ओरडत राहिली. शेजाऱ्यांनी धाव घेऊन कडी उघडली. दिव्याने किचनमधील चाकूने दोरी कापून वडिलांना खाली उतरवले. शेजाऱ्यांच्या मदतीने व सीपीआर दिल्यानंतर त्यांना श्वास येऊ लागला आणि तातडीने जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. प्रकाश बाविस्कर यांच्यावर १९ ते २५ नोव्हेंबर या कालावधीत सात दिवस सदर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु होते. २५ नोव्हेंबर रोजी रात्री ११.३० वाजता त्यांचे निधन झाल्याची डॉक्टरांनी माहिती दिली.

**पोलीसांकडून गुन्हा दाखल करण्यास विलंब**

मृतदेह शवविच्छेदनासाठी बार्शी ग्रामीण रुग्णालयत आणला गेला. मुलगी दिव्या व नातेवाईकांनी पोलिसांना तुम्ही वरिष्ठ अधिकारी भुजबळ व विस्तार अधिकारी अक्षर शेंडगे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करा, अशी मागणी केली. मात्र पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी प्रोसेस करु द्या, असा गुन्हा दाखल करता येत नसल्याचे सांगितले. यावर नाराज झालेल्या कुटुंबिय, नातेवाईक व संघटना आक्रमक होत आरोपींवर गुन्हा दाखल झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात न घेण्याचा कुटुंबीयांचा ठाम पवित्रा घेतला. गुन्हा घेण्यास पोलीस प्रशासन टाळाटाळ करीत असल्याने कुटुबियांनी पोलीस निरीक्षकास, आम्हाला न्याय द्या. आपल्यावर कोणाचा दबाव आहे का? दोषींना पाठीशी घातले जात आहे का? अशी विचारणा करत जोपर्यत दोषींवर गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत प्रेत ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा घेतला. या प्रकरणामुळे रुग्णालय परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता. बराच काळ मुलगी दिव्या, नातेवाईक व ग्रामपंचायत कर्मचारी संघटना ठाण मांडून बसले. यानंतर अखेर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास का उशीर केला, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## सोलापूर महापालिका निवडणूक प्रारूप मतदार यादीवर बुधवारी एकूण ४५ हरकती प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर महापालिका निवडणूक कार्यालयाकडे आज दिवसभरात एकूण ४५ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

पहिल्या दिवशी गुरुवार दि. २० नोव्हेंबर रोजी एकही हरकत आली नव्हती. शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी एकूण ६ तक्रारी महापालिका निवडणूक कार्यालयात प्राप्त झाल्या होत्या. दरम्यान, दि. २४ नोव्हेंबर रोजी एकूण ५३ तक्रारी महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. २६ नोव्हेंबर रोजी ४५ हरकती प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नावे त्या प्रभागातून वगळण्यात यावीत आणि संबंधित प्रभागात समाविष्ट करण्याबाबतचे ३५ अर्ज तर इतर ९ अर्ज दाखल झाले आहेत. मनपा संबंधित प्रभागगाच्या क्षेत्रातील विधानसभा भाग यादीत मतदारांची नावे असूनही मतदार यादीमध्ये त्यांची नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याबाबत एक अर्ज आला आहेत. आज एकाच दिवशी एकूण ४५ हरकती व सूचनांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. दि. २० ते २६ नोव्हेंबर दरम्यान एकूण १७९ हरकती व सूचना आल्या आहेत. प्रसिध्द प्रारूप मतदार यादीवर नागरिकांना राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार दि.२० ते ३ डिसेंबर २०२५ अखेरच्या कालावधीत नमूद कारणाकरीता हरकती / सूचना महापालिका निवडणूक मुख्य कार्यालय डॉ. कोटणीस हॉल, आय.सी.आय.सी.आय. बँकेच्यावर या ठिकाणी कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील. दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले, संबधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नांवे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नांवे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ठ करणे या संदर्भात सूचना करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

## अंतिम मतदारयादी आता १० डिसेंबरला होणार प्रसिद्ध

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका निवडणूक २०२५ मतदार यादीसंदर्भात सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार प्रारूप मतदारयादीवर हरकत घेण्यासाठी ३ डिसेंबरपर्यंत मुदत वाढविली आहे. सुधारित कार्यक्रमानुसार अंतिम यादी १० डिसेंबरला प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

यापूर्वी प्रारूप मतदारयादीवर हरकत घेण्यासाठी २७ नोव्हेंबर पर्यंत मुदत देण्यात आली होती. ही मुदत वाढविण्यात आली असून आता हरकत घेण्यासाठी ३ डिसेंबर ही अंतिम तारीख देण्यात आली आहे. पूर्वीच्या कार्यक्रमानुसार प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी जाहीर करण्याची तारीख ५ डिसेंबर होती, ती आता १० डिसेंबर करण्यात आली आहे. मतदान केंद्राच्या ठिकाणी यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक यापूर्वी ८ डिसेंबर होती. सुधारित कार्यक्रमानुसार आता ही यादी १५ डिसेंबरला प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक यापूर्वी १२ डिसेंबर होती. त्यात बदल करून आता ही यादी २२ डिसेंबरला प्रसिद्ध करण्यात येणार आहे. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी यासंदर्भातील आदेश काढले आहेत.

## स्व. विष्णूपंत कोठे प्रतिष्ठानतर्फे बांधल्या २६ नवदांपत्यांच्या रेशीमगाठी

**पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

गोरज मुहूर्तावरची लगबग....मंगलवाद्यांचे सूर...आणि अनुपम्य असा सोहळा 'याची देही याची डोळा' पाहण्यासाठी जमलेले हजारो वऱ्हाडी अशा वातावरणात बुधवारी स्व. विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानतर्फे २६ जोडप्यांचा मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा अत्यंत आनंदी वातावरणात झाला. लिंगराज वल्याळ मैदानावर झालेल्या या सामुदायिक विवाह सोहळ्यास सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, संयोजक आमदार देवेंद्र कोठे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, मनपा आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्व. विष्णूपंत कोठे प्रतिष्ठानतर्फे मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे यंदाचे दुसरे वर्ष होते. प्रारंभी २६ जोडप्यांना सजवलेल्या बग्गीत बसवून शहरातून थाटात वरात काढण्यात आली. स्व. लिंगराज वल्ल्याळ क्रीडांगणापासून सुरुवात झालेली ही वरात सत्यम चौक- साईबाबा चौक - ७० फूट रस्ता - संत तुकाराम चौक - अशोक चौक - वालचंद महाविद्यालय - कर्णिक नगरमार्गे पुन्हा स्व. लिंगराज वल्याळ क्रीडांगणावर आली. या ठिकाणी नव वधू-वरांचे हजारो वऱ्हाडींनी मोठ्या आनंदात स्वागत केले. सायंकाळी ५.४२ वाजताच्या गोरज मुहूर्तावर २६ नव्या वधू-वरांचा सामुदायिक विवाह सोहळा झाला.



पद्मशाली पुरोहित संघम वेदपाठशाळेच्या श्रीनिवास म्याडम पंतलु आणि आत्माराम चिप्पा पंतलू यांच्या मार्गदर्शनाखाली पुरोहितांनी मंत्रोच्चारात सर्व विवाह विधी करवून घेतले. अक्षता पडताच ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली.

स्व. विष्णूपंत कोठे प्रतिष्ठानच्या या सामुदायिक विवाह सोहळ्यासाठी मैंदर्गी मठाचे अभिनव रेवणसिद्ध पट्टदेवरू, पालकमंत्री जयकुमार गोरे, संयोजक आमदार देवेंद्र कोठे, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, शहाजी पवार, अविनाश महागावकर, भाजपा महिला आघाडीच्या शहराध्यक्षा रंजिता चाकोते, देवेंद्र भंडारे, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, पद्माकर काळे, प्रथमेश कोठे, विनायक कोंड्याल, माजी सभागृह नेते सुरेश पाटील, श्रीनिवास करली, गुरुशांत धुत्तरगावकर, त्याचबरोबर भाजपाचे माजी नगरसेवक, नगरसेविका तसेच भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते आदी राजकीय, प्रशासकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शिक्षण, वैद्यकीय, पत्रकारिता, विधी क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बळवंत जोशी यांनी सूत्रसंचालन केले. विवाह सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी स्व. विष्णूपंत कोठे प्रतिष्ठानच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### नूमवि मराठी शाळेत संविधान दिन, शहीद दिन साजरा

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

नू.म.वि. मराठी शाळेत संविधान दिन व शहीद दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, संविधान प्रास्ताविका व शहिदांच्या प्रतिमेचे पूजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंत्रोळीचे सहशिक्षक श्रीरंग बनसोडे यांनी केले. मुख्याध्यापक स्मिता माळवदकर यांनी प्रास्ताविक केले. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारित छोटी भाषणे दिली. शिक्षक सविता नवगिरे यांनी शहीद दिन व संविधान दिनाचे व महत्व मनोगतातून सांगितले. संविधान दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यात संविधान मूल्यांवर आधारित रंगभरण स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा,सुलेखन स्पर्धा,राष्ट्रीय प्रतीके स्पर्धा इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांची घेण्यात आली. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे घटनेच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण झाली. या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक बक्षिसे देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री लंगोटे व सौ आळसंदे यांनी आभार मानले. संविधान रॅलीने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांचे मार्गदर्शन लाभले.



### व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मेडीयम स्कूलमध्ये संविधान दिन साजरा

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापिका जी.एच. कल्याणी यांनी केले. सुरुवातीस विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे उद्देशिकेचे वाचन केले. विद्यार्थिनी राजलक्ष्मी येलदी हिने दिनविशेष आपल्या मनोगतातून व्यक्त केले. रेखा बाबानगरे संविधानाची प्रस्तावना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाबद्दल माहिती दिली. सुनिता मंद्रुपकर यांनी संविधानातील नागरिकांचे मुलभूत कर्तव्य याविषयी माहिती दिली. यावेळी उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा व क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे आदी उपस्थित होते.

# टीईटी परीक्षा बंधनकारकमधून आश्रमशाळेतील शिक्षकांना वगळले

## ▶▶इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाचा आदेश तात्पुरता रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

आश्रमशाळेतील शिक्षकांना टीईटी परीक्षा म्हणजेच शिक्षक पात्रता परीक्षा बंधनकारक केल्याचा आदेश शासनाने काढला होता. तो आदेश रद्द करावा, अशी मागणी विविध शिक्षक संघटनेकडून करण्यात आली होती. त्याला यश आलेइतर मागास बहुजन कल्याण संचालनालयानकडून टीईटी परीक्षा बंधनकारक आदेश तात्पुरता रद्द करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यावतीने चालवण्यात येणाऱ्या आश्रमशाळांतील सर्व शिक्षकांना १७ ऑक्टोबर २०२५च्या पत्रानुसार उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आले होते. मात्र इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहसचिव सुनिल तुंबारे यांनी २० नोव्हेंबर रोजी पत्र काढून त्या आदेशाला स्थगिती दिली आहे. तसेच दोन वर्षात शिक्षक टीईटी परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सेवा सक्तीने समाप्त करण्यात येतील, अशा प्रकारचा निर्णय जाहीर केला होता. त्यामुळे आश्रमशाळेतील शिक्षक अडचणीत आले होते. त्यामुळे हा आदेश रद्द करावा, अशी मागणी शिक्षकांमधून करण्यात आली होती. त्याला यश आले आहे.



टीईटी सक्तीच्या विषयाबाबत राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी या मागणीसाठी व टीईटी उत्तीर्ण न झाल्यास सेवा समाप्ती करण्यात येणार आहे, असा आदेश आश्रम शाळेतील शिक्षकांना लागू करण्यात आला होता. तो रद्द करण्यात यावा आणि शिक्षकांच्या मनात सेवेबाबत तयार झालेली भीतीची भावना दूर व्हावी. यासाठी शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या वतीने राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयावर ९ नोव्हेंबरला मूक मोर्चा काढण्यात आला होता. त्यामुळे आश्रमशाळेतील शिक्षकांच्या सेवा समाप्तीचा आदेश रद्द करण्यात आला आहे.

**- निलेश देशमुख,**
राज्य सचिव, शिक्षक सहकार संघटना.

आश्रमशाळांमधील शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा सक्ती आदेश काढण्यात आले होते. त्या आदेशाला इतर मागास बहुजन कल्याण सहसंचालनालयाकडून स्थगिती देण्यात आले असून त्या शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा सक्ती रद्द करण्यात आल्याचे पत्र प्राप्त झाले असून इतर म ागास बहुजन कल्याण विभागाकडून त्या आदेशाची कार्यवाही करण्यात येणार आहे.

**- गणेश सोनटक्के,**
**सहसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग सोलापूर**

# शहिदांच्या स्मृती प्रित्यर्थ रक्तदान शिबिरात २०० रक्तदात्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**



रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसी, तेजज्ञान फौंडेशन, रापेल्ली परिवार यांचे श्रुती इंजिनिअरिंग पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्यांच्या स्मरणार्थ आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन पोलीस उपायुक्त गौहर हसन यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे आणि श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयचे प्रेसिडेंट श्री सत्यनारायण बोल्ली व चेअरमन डॉ. माणिक गुर्रम, रोटरी क्लबचे अध्यक्ष रमेश कमटम, सचिव काशिनाथ कुंटला यांची प्रमुख उपस्थिती होती. पोलीस उपायुक्त गौहर हसन यांनी फित कापून व शहीद अशोक कामटे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शिबिराचे उदघाटन केले.

यावेळी रोटरीचे भावी प्रांतपाल जयेश पटेल, माजी प्रांतपाल वेंकटेश चन्ना यांनीही भेट देऊन रक्तदात्यांना प्रोत्साहित केले. या शिबिरात तब्बल २०० रक्तदात्यांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जपली. अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील श्रुती इंजीनियरिंग येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी तेजज्ञान ग्लोबल फाउंडेशनचे श्री गणेश ईराबती, बोल्ली ब्लड बँकेचे अशोक इंदापुरे, संजय मडुर, श्रीनिवास रिकमल्ले, रोटरी क्लब सोलापूर एमआयडीसीचे चार्वाक बुर्गल, सत्यनारायण गुर्रम, अंबादास गड्डम, गोपाळ रापेल्ली व कर्मचारी वृंदांनी शिबीर यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. मुख्य संयोजक परशुराम रापेल्ली यांनी मान्यवरांचे, रक्तदात्यांचे आभार मानले.

### सांगोला महाविद्यालयात संविधान दिवस साजरा

**सांगोला :** सांगोला महाविद्यालयात दि. २६ नोव्हेंबर रोजी राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, रिमेंम्बरन्स-डे समि ती व अंतर्गत गुणवत हमी कक्षा यांच्या वतीने संविधान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांनी संविधान दिनाचे महत्त्व विशद केले. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन डॉ.जमीर तांबोळी यांनी केले.

कार्यक्रमाचे नियोजन अधिक्षक विलास माने यांचे मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे डॉ.रेणुकाचार्य खानापूरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.रामचंद्र पवार, शारीरिक शिक्षण संचालक प्रा.जगदीश चेडे, प्रा.डॉ.तानाजी माने यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार प्रकरण

# ॲट्रासिटीच्या गुन्हयातून प्रियकराची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२६ नोव्हेंबर-**



येथील नामांकित बँकेतील अधिकारी महिलेस लग्नाचे आश्वासन देऊन शारीरिक संबंध प्रस्थापित करून लग्नास नकार देऊन फसवणुक केल्याप्रकरणी दाखल गुन्हयातून आदित्यकुमार श्रीइंद्रदेव झा (वय ३०, रा. २९, पद्मानगर सोलापूर) याची येथील प्रमुख जिल्हा न्यायाधिश मनोज शर्मा यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

यात हकीकत अशी की, एका नामांकित बँकेमध्ये फिर्यादी अविवाहीत तरूणी व आदित्यकुमार झा हे अधिकारी म्हणून कार्यरत होते. सन २०१४ मध्ये सदर तरूणी व आदित्यकुम ार यांची पुणे येथे प्रशिक्षणा दरम्यान ओळख निर्माण झाली व तदनंतर दोघांची बदली सोलापूर येथे झाली, दि. २६ जानेवारी २०१५ रोजी आदित्यकुमारने लग्न करतो असे आश्वासन देऊन हॉटेलच्या रूममध्ये सुरूवातीस सदर तरूणीवर अत्याचार केला. त्यानंतर वेळोवेळी राहत्या फ्लॅटवर व तरूणीच्या घरी ३ फेब्रुवारी २०१६ पर्यंत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. २८ मे २०१६ रोजी आंतरजातीय विवाह माझ्या घरच्यांना मान्य नाही, असे कारण सांगून लग्न करण्यास नकार दिला. तरूणीस तिच्या जातीवरून अपमानित केले.

अशा आशयाच्या पिढीत तरुणीच्या फिर्यादीवरून आदित्यकुमार यांचेविरूध्द बलात्कारासह ॲट्रासिटीचा गुन्हा विजापूर नाका पोलीस ठाण्यात दि. ३० ऑगस्ट २०१६ रोजी दाखल करण्यात आला. या गुन्हयाचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त महेश जोशी यांनी करून आरोपीविरूध्द दोषारोपपत्र न्यायालयात पाठवले होते. या खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे एकूण १४ साक्षीदार तपासण्यात आले. खटल्याचे अंतिम युक्तीवादावेळी ॲड. मिलिंद थोबडे यांनी आरोपीची बाजू मांडताना आपले युक्तीवादामध्ये अशा प्रकरणामध्ये सुरूवातीपासून लग्न करण्याचा उद्देश नसताना लग्न करतो.

असे खोटे आश्वासन दिल्याचे शाबित झाल्यास आरोपीस दोषी धरता येईल. याप्रकरणामध्ये सरकार पक्षाने आरोपीचा सुरूवातीपासून लग्न करण्याचा हेतू नसताना देखील लग्नाचे आश्वासन दिले होते. ही बाब शाबित करण्यात आलेली नाही. तरूणीचे आरोपावरून पुर्णपणे संमतीने शारीरिक संबंध झाल्याचे दिसून येत असल्याने सदर तरूणीवर बलात्कार करण्यात आला असे म्हणता येणार नाही. केवळ लग्नास नकार दिल्याने पुर्ण संमतीने झालेले शारीरिक संबंध बलात्काराच्या व्याख्येत येत नसून अशा परिस्थितीत आरोपीचा सुरूवातीपासून तरुणीशी लग्न करण्याचा उद्देश नव्हता. असे म्हणता येणार नाही. असे मुद्दे मांडून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे सादर केले.

हे निवाडे न्यायालयाने ग्राह्य धरून आरोपीची मुक्तता केली. यात आरोपी तर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. राजकुमार मात्रे यांनी तर सरकार पक्षातर्फे ॲड. आनंद कुर्डुकर यांनी तर मुळ फिर्यादीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी यांनी काम पाहिले.




| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | पायल सुरवसे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| २ | ममता वस्त्रद | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ३ | नंदिनी क्षीरसागर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ४ | श्रेया चव्हाण | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ५ | वैष्णवी चव्हाण | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६ | अथर्व मानाळे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७ | समृद्धी बरडे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ८ | लक्ष्मी आळगुंडगी | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ९ | पुर्वी पटणे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १० | वेदिका पुरूड | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ११ | आदर्श गाढवे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १२ | रोहिणी उपरे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १३ | शुभम वाघमारे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १४ | अमृता डावरे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १५ | मानसी थोरात | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १६ | सिद्धी कर्पेकर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १७ | रत्नेश्वरी सागर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १८ | प्रतिक्षा निंबाळकर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १९ | अंजली रेवतगावकर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| २० | तपस्या सिळे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| २१ | भक्ती साठे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २२ | रिया देशमुख | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २३ | प्रतीक काकडे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २४ | समर्थ कुलकर्णी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २५ | अथर्व भोसले | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २६ | रामेश्वरी बंडगर | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २७ | प्रगती कांबळे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २८ | श्रेया भोसले | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २९ | अस्मिता शिंगनाथ | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३० | सिद्धी कटके | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३१ | स्नेहल तोडकरी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३२ | भाग्यश्री गरड | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३३ | वैष्णवी गवळी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३४ | ममता आवले | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३५ | परिणीती कदम | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३६ | ज्ञानाश्री गवळी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३७ | उन्मती कदम | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३८ | दिव्या पाटील | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३९ | भक्ती भोकरे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ४० | वैभवी भोकरे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ४१ | तुषार मुंडे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ४२ | विरेश उण्णगड्डे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४३ | मनस्वी इंगुले | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४४ | पूर्वा भालेराव | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४५ | स्नेहा पाटील | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४६ | प्रिया बरगुडे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४७ | अंजूम नदाफ | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४८ | वैष्णवी पाताळे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४९ | भूमी आवताडे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५० | पद्मजा कारंजकर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५१ | प्रणाली गायकवाड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५२ | श्रेया नंदगावकर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५३ | अनुराधा शिंदे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५४ | श्रेया मोरे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५५ | रेणुका कदम | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५६ | प्रिया पवार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५७ | नेहा कुलकर्णी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५८ | वेदांतिका पवार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५९ | पुनम मुठे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६० | समृद्धी चौधरी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६१ | स्वाती माशाळे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६२ | अमृता यळमेली | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६३ | विनित गायकवाड | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६४ | अजय कोळी | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६५ | हेमलता दलसिंगे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६६ | नव्या पत्तत्तीपाका | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६७ | निकिता माने | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६८ | गौरी पागाद | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६९ | विलास धडे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७० | आरूशी निंबाळकर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७१ | आकांक्षा धडे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७२ | अक्षय पवार | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७३ | भुमिका तंबाके | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७४ | श्रेया बगले | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७५ | तेजस्विनी क्षीरसागर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७६ | समृद्धी काळे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७७ | सायली भोसले | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७८ | अंजली बिराजदार | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७९ | स्नेहा आदलिंगे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ८० | पायल चव्हाण | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ८१ | नंदिनी हिरोळे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ८२ | मुकंद काळे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८३ | वैष्णवी जव्हेरी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८४ | दिव्या चोपडे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८५ | कृष्णाली माने | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८६ | कल्याणी जाधव | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८७ | उपासना मुंगल | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८८ | श्रावणी शिंदे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८९ | आर्या जाधव | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ९० | श्रुतिका सुरवसे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ९१ | श्रुतिका सुरवसे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ९२ | सुजाता अंबीगार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९३ | प्रिती मोरे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९४ | कार्तिकी बडवणे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९५ | स्वराली राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९६ | अमृता स्वामी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९७ | तेजस पवार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९८ | प्रसाद कदम | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९९ | वेदिका राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| १०० | माधवी उण्णगड्डे | भारती विद्यापीठ, सोलापूर |

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## झारखंडची महिला अन् तिच्या ४ मुलांची वेठबिगारीतून मुक्तता

### सहायक कामगार आयुक्त निलेश येलगुंडे यांची माहिती

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

झारखंड राज्यातील स्थलांतरित कामगार नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या तक्रारीच्या आधारे बुधवारी चुंब (ता. बार्शी) येथे वेठबिगार कामगार मुक्तता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान, आरोपी झाकीर इलाही सय्यद याच्या शेतावर एक महिला व तिच्या १० ते ९ महिने वयाच्या चार अल्पवयीन मुलांना वेठबिगार स्वरूपात कामावर ठेवलेले आढळले. संबंधित महिला व तिच्या चार मुलांना मुक्त करण्यात आले असून, प्रांताधिकारी सोलापूर यांचेकडून त्यांचे मुक्तता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आल्याची माहिती सहायक कामगार आयुक्त निलेश येलगुंडे यांनी दिली.

आरोपी विरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या महिलेला आणि तिच्या मुलांना स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने त्यांच्या मूळगावी, गढवा, झारखंड येथे रेल्वेने पाठविण्याची सोय करण्यात आली आहे. या मोहिमेसाठी बाळासाहेब वाघ, अपर कामगार आयुक्त पुणे, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश येलगुंडे, सहायक कामगार आयुक्त सोलापूर आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. इंटरनॅशनल जस्टीस मिशनच्या कॅरल परेरा यांचे सहकार्य देखील लाभले. या प्रकारच्या मोहिमा वेठबिगारीविरोधात लढा देण्यास महत्त्वपूर्ण असून, स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे अनेक कुटुंबांना न्याय मिळवून देण्यात येत आहे.



**▶▶ महत्वाचे...**



### पैशासाठी विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

घरासाठी पैशाची मागणी करून विवाहितेचा छळ केल्याची घटना ३० मे २०२१ ते २५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान घडली. याप्रकरणी वर्षा श्रीहरी कुरापाटी (वय ३१, रा. रविवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पती श्रीहरी, नणंद सुरेखा व्यंकटेश बुर्ला, नणंद जयश्री गोपाळ कंदीकटला, नणंद सोनाली दिनेश पुलगम आणि बालराज बोल्ली (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी वर्षा कुरापाटी या सासरी नांदताना वरील संशयित आरोपींनी मिळून घरासाठी पैशाची मागणी केली. लहान मुलीसमोर शिवीगाळ करून शारीरिक व मानसिक त्रास दिला. तसेच घरात कोंडणे, बाहेरून कुलूप लावणे असे वारंवार प्रकार केले असून नणंदांनी घरी येऊन अपमानास्पद शब्द वापरून शिवीगाळ व दमदाटी केली. तसेच लग्नातील मध्यस्थी यांनी तु या घरात राहू नको असे म्हणून दमदाटी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

### घराकडे जाताना मालट्रकच्या धडकेत इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

मुळेगाव क्रॉस रोड येथे मालट्रकच्या धडकेत गंभीर जखमी होऊन जखमी झालेल्या दुचाकी चालकाचा मृत्यू झाला. दुबराजम गोसकी असे मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. ही घटना २३ नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वातीन वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी श्रीनिवास दुबराजम गोसकी (वय ४७, रा. कुमार स्वामी नगर, शेळगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून संभाजी श्रीरंग कोळी (रा. मुक्काम पोस्ट लांबोटी तालुका मोहोळ जिल्हा सोलापूर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी श्रीनिवास गोसकी यांचे वडील मृत्यू दुबराजम हे त्यांच्या मोटरसायकल (क्रमांक एम एच १३ एच ८२२१) यावर मुलगा दिनेश याला बसून मुळेगाव क्रॉस रोडने घराकडे जाताना रस्ता क्रॉस करताना संशयित आरोपीने त्याच्या ताब्यातील मालट्रक क्रमांक (एम एच १२ एम वी १२७७) ही भरधाव हयगईने अतिवेगाने चालवून फिर्यादीचे वडील चालवत असलेल्या मोटरसायकल जोराची धडक दिली. त्यात माल ट्रकचे पुढील चाक फिर्यादीच्या वडिलांच्या पोटावरून व छातीवरून गेल्याने ते गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# ‘येळकोट येळकोट जय मल्हार’

- घुमला जय मल्हारचा निनाद अन् उधळला भंडारा मल्हारी मार्तंडचा
- श्री क्षेत्र बाळेत श्री खंडोबा मंदिरात चंपाषष्ठीनिमित्त धार्मिक विधी संपन्न
- भरीत,रोडग्याचा नैवेद्य दाखवण्यास अबालवृद्ध भाविकांची गर्दी





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

तीर्थक्षेत्र बाळेत श्री खंडोबा देवाच्या यात्रेचा प्रारंभ बुधवारी चंपाषष्ठीला मोठ्या उत्साही आणि धार्मिक वातावरणात झाला. पहाटे पाच वाजता काकडा आरती करण्यात आली. तद्नंतर अभिषेक आणि महापूजा धार्मिक कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर श्रींच्या दर्शन घेण्यासाठी मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. यावेळी अनेक भाविकांनी भरीत रोडग्याचा नैवेद्य अर्पण करत बेल भंडारा उधळून येळकोट येळकोट जय मल्हार सदानंदाचा येळकोट घोषणा देत मंदिरास प्रदक्षिणा घातल्या.

यावेळी मंदिर परिसरात तसेच श्रींच्या गर्भ गाभाऱ्यात आकर्षक फुलांची सजावट साकारण्यात आली होती. मंदिराच्या आग्रभागी ‘‘शिवमल्हार‘‘ फुलातील सजवलेले अक्षरे भक्तांचे लक्ष वेधून घेत होती. दरम्यान, मार्गशीर्ष महिन्यातील षष्ठी ही चंपाषष्ठी अथवा मार्तंडभैरव षष्ठी म्हणून सर्वत्र साजरी होत असते. मार्गशीर्ष महिन्याला शुक्रवारपासून (दि.२१)प्रारंभ झाला. याच दिवसापासून मार्तंडभैरव षड्यात्रोत्सवासही प्रारंभ झाला. या मासाचा पहिला दिवस खंडोबाची नवरात्री आणि देवदिवाळी म्हणून साजरा झाल्यानंतर सहा दिवसांच्या षड्रात्री उत्सवाचा समारोप बुधवार (दि. २६) चंपाषष्ठीला खंडोबा पूजनाने झाली आहे. ज्या परिवारांमध्ये खंडोबा कुलदैवत आहे तिथे चंपाषष्ठीनिमित्त कुलाचार-कुलधर्म करण्याची परंपरा असते. तत्पूर्वी पाच दिवस अनेक घरांमधील सदस्य उपवास करतात. सहाव्या दिवशी खंडोबाची षोडशोपचार पूजा करून महानैवेद्य दाखवला गेला. यावेळी देव्हाऱ्यात अखंड नंदादीप लावला जातो. अशी माहिती मंदिराचे पुजारी सागर पुजारी यांनी दिली. तीर्थक्षेत्र बाळेत खंडोबा मंदिरात तसेच शहर परिसरातील ईतर श्रीखंडोबा मंदिरांत उत्सव साजरा होत आहे. चंपाषष्ठीला खंडोबाची नवरात्र म्हणूनही ओळखले जाते. मल्हारी मार्तंड हा भगवान शंकराच्या अवतारापैकी एक आहे. हा सण प्रामुख्याने महाराष्ट्र आणि कर्नाटकात साजरा केला जात आहे. घरोघरी मार्तंड भैरवाची म्हणजे मल्हारी मार्तंड देवतेची विधिवत पूजा करून भंडारा उधळत तळी उचलण्याचा विधी केला जातो. यात्रा काळात मंदिर समितीकडून गर्भ गाभारा व सभा मंडपामध्ये आकर्षक अशा रंगबेरंगी सुवासिक फुलांची सजावट करण्यात आली होती. अबालवृद्ध भाविकांना अन्नदान प्रसाद,दर्शनासाठी मुख दर्शन व गाभारा दर्शन रांग , कमांडो फोर्स, सुरक्षेच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही कॅमेरा, पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. सोलापूर महापालिकेच्या वतीने मंदिर परिसर मध्ये आरोग्याच्या दृष्टीने औषध फवारणी, साफ सफाई, पालखी मार्ग व परिसरात अतिरिक्त पथ दिवे, बसेस, फिरते शौचालयची व्यवस्था करण्यात आली आहे. पोलिस आयुक्तांकडून चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आल्याचे मंदिर समितीचे अध्यक्ष विनय ढेपे यांनी सांगितले.

**चंपाषष्ठीचे महत्त्व :** भगवान खंडोबाच्या मल्ल आणि मणि या दोन राक्षसांवर झालेल्या विजयाचे स्मरण म्हणून चंपाषष्ठी साजरी करतात. या राक्षसांचा पराभव करण्यासाठी भगवान शंकराने मार्तंड भैरवाचे रूप घेतल्याचे पुराणात सांगितले जाते. हे युद्ध अवघ्या सहा दिवसांतच संपले. याच दिवशी मार्गशीर्ष महिन्यातील चंपाषष्ठी पूजा विधी मार्गशीर्ष महिन्यातील शुक्ल पक्षातील प्रतिपदा ते षष्ठी तिथीपर्यंत हा उत्सव सुरू असतो. या सहा दिवसांत मार्तंडदेवाजवळ नऊ तेलाचे दिवे लावले जातात. तसेच विधिवत खंडोबाची पूजा करून आरती म्हटली जाते. चंपाषष्ठीच्या दिवशी धान्यांचे पीठ (ठोंबारा) गव्हाचा रोडगा आणि वांग्याचे भरीत नैवेद्य म्हणून अर्पण केले जाते. काही परिवारात प्रथेनुसार पुरणपोळी किंवा श्रीखंडाचाही नैवद्य दाखवला जातो. तसेच दिवे ओवाळणीची देखील पद्धत आहे.यात्रेच्या पुढील प्रत्येक रविवारी सायंकाळी श्रींची पालखी, घोडा, नंदीध्वज याचासह मिरवणूक निघते. मार्गशीर्ष महिन्याच्या प्रत्येक रविवारी यात्रा भरणार असून ३० नोव्हेंबर, ७ डिसेंबर व १४ डिसेंबर २०२५ या तीन रविवारचा समावेश आहे.

**यात्रेस चंपाषष्ठीपासून प्रारंभ :** श्री खंडोबा देवाच्या यात्रा कालावधीत पहाटे ५ वाजता काकड आरती, तर सकाळी ८ वाजता आणि रात्री ७वाजता महापूजा व अभिषेक करण्यात येणार आहे. दिवसभर जागरण गोंधळ, वाघ्या-मुरळी नृत्य, तळी-भंडारा उचलणे, भंडारा खोबरे उधळणे वारू सोडणे, नवस फेडणे, जावळ काढणे यांसह विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत असतात.यात्रेत विविध धार्मिक कार्यक्रमांची पहाटेपासून रात्रीपर्यंत रेलचेल असते.

**- गणेश पुजारी,**
श्री खंडोबा देवस्थान मंदिराचे पुजारी

# उज्वला थिटेंचा अपील अर्ज न्यायालयाने फेटाळला

### अनगर नगराध्यक्षपदाची निवड बिनविरोधच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील अनगर नगरपंचायत नगराध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार उज्ज्वला थिटे यांनी सोलापूर सत्र न्यायालयात धाव घेतली होती. आपल्या उमेदवारीचा अर्ज बाद केल्यानंतर त्यांच्या अर्जावरील अपील संदर्भातील सर्व बाजूचे युक्तिवाद आज न्यायालयात पूर्ण झाले आहेत. न्यायाधीशानी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर उज्ज्वला थिटे यांचा अपील अर्ज फेटाळला आहे.

जिल्हा न्यायाधीश प्रशांत राजवैद्य यांनी उज्वला थिटे यांची अपील फेटाळत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय कायम ठेवला. या निर्णयामुळे अनगर नगराध्यक्षपदाची निवड बिनविरोधच राहणार आहे. दरम्यान, उमेदवारी अर्जावरील सही




खोडण्यात आल्याचा आरोप याचिकाकर्त्याने केला होता. मात्र, जर सही खोडली असा तुमचा आरोप असेल तर उमेदवाराने पोलिसांत तक्रार दाखल करायला पाहिजे, असा युक्तिवाद इथे सरकारी वकिलांकडून करण्यात आला. जिल्हा न्यायाधीश प्रशांत राजवैद्य यांच्या कोर्टासमोर उज्वला थिटे, प्राजक्ता पाटील आणि सरकार पक्षाच्यावतीने तिन्ही वकिलांचे युक्तिवाद पूर्ण झाले. आज सकाळपासून या प्रकरणावर युक्तिवाद सुरु होता. जवळपास ४ तास युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायाधीशनी याप्रकरणी निकाल दिला. त्यामुळे, गेल्या ८ दिवसांपासून अनगर नगरपालिकेवरील नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्राजक्ता पाटील यांच्या बिनविरोध निवडीवर कोर्टाची टांगती तलवार होती. मात्र, आता त्यांची निवड बिनविरोधी विजयी झाल्याचं शिक्कामोर्तब झालं आहे.

दरम्यान, आम्हाला ऑपरेटिव्ह ऑर्डर कोर्टाने सांगितली, आमचा अपील अर्ज फेटाळण्यात आला आहे. कोर्टाने काय ग्राउंडवर हा निर्णय दिला हे आम्हाला उद्या सविस्तर ऑर्डर आल्यावरच समजेल, अशी प्रतिक्रिया उज्ज्वला थिटे यांचे वकील दत्तात्रय घोडके यांनी निर्णयानंतर दिली. उज्वला थिटे यांचे वकील दत्तात्रय घोडके यांच्या वतीने जवळपास दीड तास कोर्टा समोर युक्तिवाद करण्यात आला. उज्वला थिटे यांना उमेदवारी अर्ज दाखल करताना काय काय अडचणीत आल्या हे त्यांनी कोर्टासमोर निदर्शनास आणले. याशिवाय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कशा पद्धतीने कारभार केला. या संदर्भात अनेक तक्रारीचा पाढा वकिलांनी वाचला. दरम्यान, प्रशासकीय यंत्रणेने फसवणूक करून सही गायब केल्याचा दावा देखील वकिलांनी कोर्टासमोर केला होता. उज्वला थिटे यांच्या वकिलांनी दीड तास केलेल्या युक्तिवादनंतर सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांनी आपली बाजू मांडली.

उज्वला थिटे यांच्या वकिलांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले होते. त्यावर बोलताना सरकारी वकिलांनी प्रतिउत्तर दिलं. जर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांविरोधात तक्रार होती तर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक आयोगाकडे तक्रार का केली नाही? असा सवाल राजपूत यांनी न्यायालयात उपस्थित केला. उज्वला थिटे या राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवार आहेत, जर त्यांच्यावर दबाव होता तर पक्षाने का कोणती भूमिका घेतली नाही. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जे काम केलं ते सर्व आयोगाच्या नियमानुसार केलं आहे. त्यामुळे उज्वला थिटे यांचे अपील फेटाळण्यात यावे, अशी मागणी सरकारी वकिलांनी केली होती. सरकारी वकील यांच्या युक्तिवादनंतर राजन पाटील यांच्या सून प्राजक्ता पाटील यांचे वकील अ‍ॅड. महेश जगताप यांनीही युक्तिवाद केला.

## चंपाषष्ठीला भाज्यांचे दर गगनाला

**सोलापूर :** तीर्थक्षेत्र श्री बाळे येथील खंडोबा मंदिरात आज असंख्य भाविक श्रींच्या दर्शनासाठी दाखल झाले होते. यावेळी अबालवृद्ध भाविकांनी चंपाषष्ठीनिमित्त देवाचा कोटंबा भरला. तद्नंतर भरीत रोडग्याचा नैवेद्य अर्पण केला. परंतु आज भाविकांना भाज्यांच्या दरवाढीचा सामना करावा लागला. भाजीमार्केटमध्ये वांगी आणि कांद्याच्या पातीचा दर वाढलेला होता.

वांगी प्रति किलो १०० तर कांदापात प्रतीपेंडी ३० रुपये इतका दर वधारला होता. मार्गशीर्ष महिन्यातील श्री खंडोबा यात्रा उत्सवानिमित्त चंपाषष्ठीला भरीत रोडग्याचा नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा आहे. त्यानुसार असंख्य भाविक भरीत करण्यासाठी वांगे आणि त्यासोबत कांदापात बाजरीचे पीठ यांची खरेदी करण्यासाठी बाजारात दाखल झाले असता, वांग्याचे दर प्रति किलो १०० रुपये तर कांदापात प्रति पेंडी ३० रुपये याप्रमाणे विक्री करत असल्याचे दिसून आले. चंपाषष्ठीपूर्वी याच वांग्याचे दर वीस रुपये प्रमाणे होते तर कांदापात पाच रुपये प्रमाणे होती. अचानक मागणी वाढल्याने भाजी मार्केटमध्ये विक्रेत्यांनी दर वाढल्याचे ग्राहकांनी सांगितले.

# संविधान संरक्षण करण्यासाठी निर्धार खंबीर...

- संविधान बचाव समितीचा सोलापुरात जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा
- हर घर संविधान, होईल देश महानचा दिला नारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

संविधान बचाव समितीच्या वतीने बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर बुधवारी महामोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मुस्लिम, भटके विमुक्त, बौद्ध, धनगर यांच्यासह बहुजन समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हर घर संविधान होईल, देश महान यासह विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडला. संविधान धोक्यात असून संरक्षण करण्याचा खंबीर निर्धार मान्यवरांनी आपल्या भाषणात व्यक्त केला.

संविधानाचा अंमल सुरू होऊन ७५ वर्षांचा कालावधी लोटला आहे. संविधानामुळेच विविध जाती धर्मांचे आणि विविध भाषा बोलणारे लोक एकत्र नांदत आहेत. संविधानामुळेच भारत अखंड आणि एकात्म राहिला आहे. सर्वांना स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय प्रदान केला जात आहे, असे असतानाही भारतीय संविधानाला संपविण्याचे कट कारस्थान रचले जात आहे. त्यामुळे देशाचे संविधान वाचवावे या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला. बुधवारी दुपारी संविधान समर्थकांच्या या महामोर्चास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सुरुवात करण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक



मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय पुनम गेट येथे या मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. या मोर्चामध्ये बहुजन समाजातील संविधान समर्थक सर्व घटकांचा सहभाग होता.

**बोधगया महाबोधी विहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे.**

संकटात सापडलेला शेतकरी, शेतमजूरांच्या समस्या सोडवा त्यांना मदत करा. मुस्लिमांच्या वक्फ बोर्डावर फक्त मुस्लिम व्यक्तीची नियुक्ती करावी. आरक्षण अ ब क ड वर्गीकरण करु नये. समाजात फूट पाडू नये, क्रिमिलेयरची अट घालू नये. राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालवी. सरसंघचालक मोहन भागवत यांना सरकारने दिलेली सुरक्षा काढून घ्यावी.

अंधश्रध्दा पसरविणारी शिक्षण पध्दती बंद करुन विज्ञानवादी शिक्षणपध्दती राबवावी. आदिवासी, धार्मिक अल्पसंख्यांकाना संविधानाने दिलेले आरक्षण कायम ठेवावे. जातीनिहाय जनगणना करुन जातीच्या संख्येप्रमाणे आरक्षण लागू करावे. मागसवर्गीयांचा निधी इतरत्र वळवू नये. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करावी. संविधानाप्रमाणे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय दिला पाहिजे यासह विविध मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला. विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी मान्यवरांचे भाषणे झाली. संविधान धोक्यात असून संरक्षण करण्याचा खंबीर निर्धार सर्वांनी व्यक्त केला. या आंदोलनात माजी आ. नरसय्या आडम, निमंत्रक सुभानजी बनसोडे, कामगार नेते अशोक जानराव, जनार्दन शिंदे, अण्णासाहेब भालशंकर, राजाभाऊ सोनकांबळे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी महापौर सुशीला आबुटे, अलका राठोड, युवराज जाधव, गौतम मसलखांब, अतिश बनसोडे, फारुक शेख, रॉकी बंगाळे, मिलिंद प्रक्षाळे, विजयानंद भालशंकर, युवराज पवार, कुणाल बाबरे, सचिदानंद व्हटकर, अशोक आगावणे, धर्मेंद्र चंदनशिवे, सुमित्रा जाधव, प्रा. संघमित्रा चौधरी, संध्या काळे, सुचित्रा थोरे, अशोक लामतुरे, प्रमिला तुपलवंडे, मयूर तळभंडारे, युवराज पवार, शौकत पठाण, प्रा. सिद्धार्थ जाधव, बाली मंडेपु, विष्णू कारमपुरी, आयाज दिना, रेश्मा मुल्ला, यशवंत फडतरे, सागर उबाळे, एड. केशव इंगळे, महंमद शाहरुख पिरजादे , दत्तात्रय सिद्धगणेश, सुनिता गायकवाड यांच्यासह भारतीय बौद्ध महासभा, माकपा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिम ब्रिगेड, समता सैनिक दल, अखिल भारतीय सफाई काँग्रेस, प्रहार संघटना, विविध पक्ष सामाजिक संघटना संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# समाजकल्याण कार्यालयाच्या संविधान रॅलीस उत्सफूर्त प्रतिसाद

### जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या हस्ते रॅलीचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून संविधान रॅलीची सुरूवात करण्यात आली.

यावेळी पोलिस आयुक्त एम. राजकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कुलदिप जंगम, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण पुणे वंदना कोचुरे, उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती उपायुक्त रवीद्र कदम पाटील, महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणेयांच्या सह इतर मान्यवर व संगमेश्वर महाविद्यालय, उमाबाई श्राविका महाविद्यालय, मासगावर्गीय मुलांचे शासकिय वसतिगृह, मागासवर्गीय मुलींचे शासकिय वसतिगृह येथील एकूण ४०० विद्यार्थी व कर्मचारी बहूसंख्येने उपस्थित होते. रॅलीची सुरूवातीस संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करून करण्यात आले.

**राज्य निबंध स्पर्धांचे पारितोषिक वितरण**

भारतरत्न डॉ. आंबेडकर समता प्रतिष्ठान नागपूर व समाज कल्याण आयुक्तालयाच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त राज्यातील शाकीयक वसतिगृहे व शासकिय निवासी शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय निबंध स्पर्धांचे १५ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील विविध केंद्रावर आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये जिल्हास्तरीय प्रथम, व्दितीय, व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

**रक्तदान शिबिर, सेल्फी विथ संविधान**

ही रॅली सात रस्त्यावरील सामाजिक न्याय भवनकडे मार्गस्थ झाली. तेथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात सेल्फी विथ संविधान हा सेल्फी पॉइंट उभारण्यात आला होता. येथे सेल्फी काढून संविधान जनजागृतीसाठी मोहिम राबविली. सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयात डॉ. वैशपायन वैद्यकिय महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यामाने या रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १२७९

**मग तेथ आपण । एकाग्र अंत:करण ।**
**करुनि सदगुरु स्मरण । अनुभविजे ।।**

योगाभ्यासासाठी मनाची स्थिरता खूप आवश्यक असल्याचे भगवंतांनी अर्जुनाला सांगीतले आहे. मन जर अस्थिर असेल तर त्याच्या जिवनात सुख,समाधान, आनंद, उत्साह हे प्रवेश करीत नाहीत. अर्थात हे सर्व आपोआप अस्थिर होतात. चिंता, मोह, दु:ख क्लेश हे त्याच्या भोवती गराडा घालुन राहतात. सुख, समाधानासाठी मनाची एकाग्रता, स्थिरता होणे अत्यंत आवश्यक असते. ही स्थिरता होण्यासाठी माणसाला तशा म्हणजे विशेष अशा वातावरणाची गरज असते. हे वातावरण, स्थळ कसे असावे. हे सांगतांना माऊलींनी खुप हिरवळ, दाट झाडी, वाहते झरे तसेच पावला, पावलाला पाणी असावे असे सांगीतले आहे. मनाच्या प्रसन्नतेसाठी वातावरण प्रसन्न असावे लागते. वातावरण प्रसन्न असण्यासाठी पाणी, झाडे, हिरवळ असावी लागते. यावरुन वृक्षारोपण, पाणी अडवा, पाणी जिरवा याचे महत्व आपण लक्षात घ्यायला हवे. माऊलींनी वृक्षाच्या,



पाण्याच्या आवश्यकतेची जाणीव आपणाला करुन दिली आहे. असे प्रसन्न वातावरण, स्थळ जर आपणाला सुदैवाने प्राप्त झाले तर तेथे योग्य जागा निवडून आसन घालावे. चांगल्या दर्भांकुरावर स्वच्छ वस्त्र अंथरावे. आसन अतिउंच झाले तर अंग कोलमडेल आणि सखल झाले तर, जमीनीचा गारठा, दगड, कृमी कीटक यांचा संसर्ग होऊन दोष निर्माण होतील. म्हणून आसन टाकतांना जागा योग्य निवडावी. अशा योग्य जागेवरील आसनावर बसुन मन एकाग्र करावे आणि आपल्या सदगुरुचे स्मरण करुन योगाचा अनुभव घ्यावा. हे सांगतांना भगवान श्रीकृष्ण म्हणाल्याचे सांगतांना माऊली म्हणतात, **मग तेथ आपण । एकाग्र अंत:करण ।। करुनि सदगुरु स्मरण । अनुभविजे ।।**

योगाभ्यासासाठी मनाची तयारी ही प्रथम तर योग्य स्थळ ही दुसरी पायरी आहे आणि तिसरी पायरी म्हणजे सदगुरुचे स्मरण होय. आपण सर्व तयारी केली पण सदगुरुंचे स्मरण नसेल तर योगाभ्यास तडीस जात नाही. अहंकाराचे काठिण्य विरुन जाण्यासाठी व हा देह प्रेमाने व अंतर्बाहय अष्ट सात्विक भावाने भरुन जाण्यासाठी सदगुरु स्मरण आवश्यक आहे. सदगुरु स्मरणाने विषयाचा विसर पडतो. इंद्रियांची चळवळ मोडली जाते. मन आणि अंत:करण यांचे ऐक्य होते. या सर्व बाबीसाठी माऊलींनी येथे सदगुरुचे महत्व निदर्शनास आणून दिले आहे. कर्तव्य तडीस नेण्यासाठी कष्टाबरोबर सदगुरुंचे आशीर्वाद हे महत्वाचे असतात. सदगुरु म्हणजे आई, वडील, बंधू, शिक्षक संतमहात्मा या पैकी कोणीही असू शकतो. जो नि:स्वार्थ भावनेने प्रेम व मागदर्शन करतो., तो सदगुरुंचे स्थान घेऊ शकतो. योग्यवेळी योग्य ते मार्गदर्शन करतो, रस्ता दाखवितो तो सदगुरु होय. गुरु आणि सदगुरु मध्ये फरक आहे. वाईट ,चोरी, खून ,लबाडी हया क्षेत्रातही यश मिळविण्यासाठी त्या क्षेत्रातील गुरु लागतो. अर्थात, वाईट क्षेत्रात मार्गदर्शन करणारा त्या क्षेत्रातील अनुभव असलेला त्याक्षेत्राचा गुरु असतो. पण चांगल्या क्षेत्रात मार्गदर्शन करणारा हा सदगुरु असतो. म्हणून माऊलींनी येथे गुरु हा शब्द न वापरता सदगुरु हा शब्द वापरला आहे. सर्व गुरुंनी, सदगुरुची भुमिका निभावली तर जाळपोळ, चो-या, बलात्कार, खुन, हुंडाबळी होण्याचे प्रकार कमी होतील. आपणाला आत्मानंद प्राप्तीसाठी सदगुरुचे स्मरण करावे लागणार आहे. ज्ञानेवर माऊली, तुकाराम महाराज, समर्थ रामदास, चोखामेळा असे अनेक महात्मे त्यांच्या साहित्याच्या रुपाने सदगुरु म्हणून आमच्यासाठी उपलब्ध आहेत, त्याचा सदुपयोग करुन घ्यायला हवा. जय जय राम कृष्ण हरी.

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरूवार
दि. २७ नोव्हेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - मार्गशिष्य शु. सप्तमी
ऋतु - हेमंत
नक्षत्र- धनिष्ठा (२६.३१)
योग - ध्रुव (१२.०८)
करण - गर (१२.२०)
....राहू काल....
गुरूवार : दु. १.३० ते ३.००

दिनविशेष -१८१५: पोलंड राज्याच्या संविधान स्वीकारले.
१८३९: बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स येथे अमेरिकन स्टॅटिस्टिकल असोसिएशनची स्थापना.
१९०७: हरिवंशराय बच्चन, प्रसिद्ध हिंदी साहित्यिक आणि कवी यांचा जन्म
१९५२: बप्पी लाहिरी, भारतीय गायक-गीतकार.
१९८६: सुरेश रैना, भारतीय क्रिकेटपटू.

# भाजपा सुरु करणार बूथ सशक्तीकरण मोहीम

## पक्षाच्या शहर मध्य मंडलाच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

भारतीय जनता पक्षातर्फे आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने बूथ सशक्तीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे.

भाजप शहर मध्य-मध्य मंडलाची बैठक भाजपच्या शहर कार्यालयात आमदार देवेंद्र कोठे, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रदेश समन्वयक कृष्णा चौधरी उपस्थित होते. या बैठकीत बूथ पदाधिकाऱ्यांना बूथ सशक्तीकरण मोहिमेबाबत मार्गदर्शन सविस्तर करण्यात आले.

यावेळी चौधरी म्हणाले की, बूथ कार्यकर्त्यांनी कार्यकर्त्या संदर्भातील माहिती गूगल फॉर्ममध्ये भरावी. केंद्र व राज्य शासनाचे वेगवेगळ्या योजनांचे लाभार्थी जसे लाडकी बहीण, विश्वकर्मा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, जनधन खाते, आयुष्मान भारतचे



लाभार्थी यांची यादी तयार करावी. याशिवाय मतदार यादीची पडताळणी करावी. यावेळी माजी शहराध्यक्ष रामचंद्र जन्नू म्हणाले, 'माझे बूथ, सर्वात मजबूत' हा फक्त एक कार्यक्रम नाही तर तो तळागाळातील भाजपच्या यशाचा सर्वात मजबूत दुवा आहे.जुन्या म्हणीप्रमाणे, एक थेंबही भांडे भरतो. त्याचप्रमाणे, पक्षाचे यश तेव्हाच मिळते जेव्हा प्रत्येक बूथ सर्वात मजबूत असतो.आज सोलापूर शहर मध्य मध्य मंडलाचा प्रत्येक भाजप कार्यकर्ता माझे बूथ, सर्वात मजबूत या संकल्पाने पुढे जात आहे, याचा आनंद आहे.

याप्रसंगी मंडलाचे अध्यक्ष नागेश सरगम म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका जवळ येत असल्याने सर्व कार्यकर्त्यांनी त्यांच्या संबंधित बूथ मजबूत करण्यासाठी तळागाळात काम करणे आवश्यक आहे. हे काम सुरळीत पार पडावे यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी मनापासून प्रयत्न करावेत.सर्व मंडल कार्यकर्त्यांनी त्यांच्या संबंधित शक्ती केंद्रांना भेट देऊन त्यांचा विस्तार करण्यासाठी कार्यकर्त्यांना भेटावे. कार्यकर्त्यांनी त्यांच्या संबंधित बूथ मजबूत करण्यासाठी मेरा बूथ सबसे मजबूतच्या धर्तीवर काम करावे. केंद्रात, राज्यसह सोलापूरकरांची पुन्हा सेवा करण्यासाठी भाजपला बळकटी दिली पाहिजे.

बैठकीस योगेश्वर कदम, संकेत होंडे, शहर उपाध्यक्ष अंबादास बिंगी, माजी नगरसेवक मेघनाथ येमूल, अनिल पल्ली, रवी कैय्यावाले, भारतसिंग बडूरवाले, दत्तात्रय पोसा, आनंद बिरू, सुनील पाताळे, पुरुषोत्तम पोबत्ती, जय साळुंखे, श्रीकांत वाडेकर, मंडल सरचिटणीस प्रशांत पल्ली, हरीश जंगम, मंडल उपाध्यक्ष राम गड्डम, मंडल महिला मोर्चा अध्यक्ष लक्ष्मी बदलापूरे, मंडल युवा मोर्चाचे ओंकार होमकर, मंडल अल्पसंख्यांक अध्यक्ष एजाज सय्यद आधी सह मध्य मध्य मंडळातील शक्ती केंद्रप्रमुख बुथ प्रमुख उपस्थित होते.

# सोलापुरात श्रद्धा-स्वच्छता-संस्कृती संवर्धन अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**



अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या शिखरावर मार्गशीर्ष शुक्ल पंचमीदिनी झालेल्या केशरी ध्वजारोहण सोहळ्याच्या प्रेरणेने सोलापूर शहरात 'श्रद्धा व स्वच्छता अभियान' राबविण्यात आले. विवाह पंचमी आणि शीख गुरु तेग बहादूरजींच्या ३५० व्या हुतात्मा दिनाचे औचित्य साधत श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक जबाबदारीचा त्रिवेणी संगम साधण्याचा हा उपक्रम ठरला.

शहरातील काही मंदिर परिसरात दुभंगलेल्या देवी-देवतांच्या मूर्ती, संत-महापुरुषांच्या छायाचित्रांचे विटंबन तसेच धार्मिक ग्रंथांचे ढिगारे अत्यंत अवमानकारक अवस्थेत आढळून येत असल्याने जगदंब प्रतिष्ठान सामाजिक बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष विजय यादव, उपाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, सचिव किरण पंगुडवाले यांनी केतन शहा आणि महापौरांकडे निवेदन दिले. या निवेदनाची महापालिकेकडून तात्काळ दखल घेऊन विशेष 'श्रद्धा वाहन' पाठविण्यात आले. या वाहनाद्वारे दुभंगलेल्या मूर्ती व पवित्र छायाचित्रांचे सन्मानपूर्वक संकलन करण्यात आले.

याच अनुषंगाने गणपती घाट व श्री सिद्धिविनायक मंदिर परिसरात स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. स्वयंसेवक, सामाजिक-आध्यात्मिक संस्था, महापालिका कर्मचारी व स्थानिक नागरिकांनी सहभागी होत परिसर स्वच्छतेसह भक्तिमय वातावरण निर्माण केले.

या उपक्रमात राहुल शिंदे, सामाजिक कार्यकर्ते चांगदेव जाधव, स्वयंसेवक उत्तम प्रल्हाद खंदारे उपस्थित होते.



# भाजपा जैन प्रकोष्ट अध्यक्षपदी इन्दरमल जैन, महेश भंडारी, अभिनंदन अगरथडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

भारतीय जनता पार्टी सोलापूर जैन प्रकोष्ट अध्यक्षपदी इन्दरमल जैन(शहर उत्तर),महेश भंडारी (शहर मध्य) व अभिनंदन अगरथडे(शहर दक्षिण) यांची निवड करण्यात आली आहे

भारतीय जनता पार्टी शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, शहर उपाध्यक्षा साधना संगवे, मोहन डांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली जैन प्रकोष्ट भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर अध्यक्ष अनिल जमगे यांनी तीन मतदारसंघातील ही कार्यकारणी जाहीर केली आहे.

**विविध मतदारसंघातील कार्यकारिणी याप्रमाणे**

**शहर उत्तर :** अध्यक्ष- इन्दरमल जैन, उपाध्यक्ष -रविंद्र कटके, सचिव-अभय सुराणा. कार्यकारणी सदस्य- नंदकुमार कंगळे, शितल जैन, सागर शिरसाड, सीमा भंडारी, कविता भस्मे, चेतन सुराणा, मंगल पांढरे. **शहर मध्य :**अध्यक्ष- महेश भंडारी, सुहास कोठारी, सुहास छंचूरे, उपाध्यक्ष-मिलींद म्हेत्रे, संजय भन्साळी, अमित कवाड जैन,विजय डाकलिया. **शहर दक्षिण :** अध्यक्ष-अभिनंदन अगरथडे, उपाध्यक्ष-कोमल पाचोरे, सचिव- अशोक भालेराव, कार्यकारणी सदस्य- सचिन जुनवणे, माया पाटील, चित्रा जमगे, पंकजा पंडीत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात संविधान दिन उत्साहात साजरा!




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात संविधान दिन उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ उभारलेल्या संविधान उद्देशिकेच्या स्तंभास कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने विद्यापीठ कॅम्पसमधून रॅलीचे आयोजन करण्यात आले. यानंतर संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

## मतदारांना वेबसाईटवर नाव शोधण्याची सुविधा

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी राज्य निवडणूक आयोगाने मतदारांना आपले नाव शोधण्याची सुविधा ऑनलाइन उपलब्ध केली आहे. त्यामुळे मतदारांना घरबसल्या या सुविधेचा लाभ घेता येणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने https://mahasecvoterlist.in वेबसाईटवर Search name in voters list या टॅबमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीतील मतदाराचे नाव शोधण्याची सुविधा उपलब्ध केली आहे.

ही लिंक मतदारांच्या सोयीकरिता सोलापूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.



# महिला सबलीकरणासाठी संविधान साक्षरतेची गरज : डॉ. रश्मी माने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

स्त्रिया कितीही उच्चशिक्षित झाल्या तरी त्यांच्यावर होणारे अन्याय कमी न होता वाढतच आहेत. त्यामुळे विद्यार्थिनींनी आपल्या शैक्षणिक आयुष्यातच आपले अधिकार आणि त्यांसंबंधीचे कायदे जाणून घेणे अत्यावश्यक आहे, असे मत युगंधर फाउंडेशन, सोलापूरच्या अध्यक्षा डॉ. रश्मी माने यांनी व्यक्त केले.

युनियन एज्युकेशन सोसायटीच्या महिला महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निखत शेख होत्या.

यावेळी प्रा. डॉ. जैनब नायब, डॉ. अमर दीक्षित, प्रा. डॉ. आरिफ जमादार, प्रा. फर्जाना पटेल, प्रा. रईसा पठाण, प्रा. आयेशा महेजबीन, श्री. कय्युम खान पठाण आणि श्री. मुनीर जरतार उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. आरिफ जमादार यांनी मानले.




# कामटे विचार मंचतर्फे ८५ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

शहीद अशोक कामटे विचारमंचतर्फे संविधान दिनाचे औचित्य साधून तसेच २६/११/२००८ रोजी मुंबई येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांच्या स्मरणार्थ तसेच सोलापूरचे तत्कालीन पोलीस आयुक्त शहिद अशोक कामटे यांच्या १८ व्या पुतण्यतिथीनिमित्त नवी पेठेतील शिवस्मारक सभागृहात रक्तदान शिबीराचे तसेच मोफत नेत्ररोग तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे उद्घाटन शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे, सुप्रज्ञा शेटे यांच्या हस्ते करण्यात आला.

शहिद अशोक कामटे यांच्या वर सोलापूरकरांनी भरपूर प्रेम केल आहे. १८ वर्षा पूर्वी शहिद झालेल्या अशोक कामटे यांना सोलापूरमध्ये सोलापूरकर देवाचा दर्जा देतात. सोलापूरकर कामटे यांचे कार्य कधीही विसरणार नाही, असे मनोगत डॉ. शिवरत्न शेटे यांनी श्रध्दांजली प्रित्यर्थ व्यक्त केली.

यावेळी ८५ तरुणांनी रक्तदान करून अर्पन केली. शिबीरात १२० रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाप्रसंगी शहीद अशोक कामटे विचार मंचचे अध्यक्ष योगेश कुंदूर, सल्लगार राजू हौशेट्टी, विनायक विटकर, सुरेश शहापूरकर, वैशाली गुंड, धमेंद्र कर्पेकर, काशिनाथ भतगुणकी, आनंद तालीकोटी, रूपेश करपेकर, राजू पालकर, विकास कुंदूर, गिरीष विजापूरे, दिपक उप्पळकर, विजय पुकाळे, निरंजन बोहदूल, संतोष विजापूरे, संजय कुंदूर, शशिकांत गंगेकर उपस्थित होते.

# मार्गशीर्ष मासातील दोन दिव्य पर्व: गीता जयंती आणि दत्त जयंती

**हिंदू पंचांगानुसार 'मार्गशीर्ष' हा अत्यंत पवित्र आणि आध्यात्मिक उर्जेने भरलेला महिना मानला जातो. या महिन्याची सुरूवातच देवदिपावलीने होते. मार्गशीर्ष शु. प्रतिपदा ते षष्ठीपर्यंत राज्याचं आराध्यदैवत मल्हारीमार्तंडाचा उत्सव साजरा केला जातो. खुद्द भगवान श्रीकृष्णाने गीतेमध्ये 'महिन्यांमध्ये मी मार्गशीर्ष आहे,' असे म्हटले आहे. या पवित्र महिन्यात आध्यात्मिक विश्वातील अत्यंत महत्त्वाचे उत्सव साजरे केले जातात, ते म्हणजे 'गीता जयंती' आणि 'दत्त जयंती'. हे दोन्ही उत्सव ज्ञान, भक्ती आणि कर्मयोगाचा संगम आहेत.**

### गीता जयंती: जीवनाचे सार

मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला (जिला 'मोक्षदा एकादशी' असेही म्हणतात) गीता जयंती साजरी केली जाते. सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी याच तिथीला कुरुक्षेत्राच्या रणांगणावर भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला जे दिव्य ज्ञान दिले, तेच 'श्रीमद्भगवद्गीता' म्हणून ओळखले जाते.

गीता हा जगातील एकमेव असा ग्रंथ आहे, ज्याची जयंती साजरी केली जाते. गीता केवळ एक धर्मग्रंथ नसून ती 'जीवन जगण्याची कला' (art of Living) शिकवणारी संहिता आहे. जेव्हा अर्जुन आपल्या कर्तव्यापासून विचलित झाला होता, तेव्हा श्रीकृष्णाने त्याला कर्माचे महत्त्व समजावून सांगितले. गीतेने जगाला 'निष्काम कर्मयोगा'चा मार्ग दाखवला. फळाची अपेक्षा न करता आपले कर्तव्य पार पाडणे आणि ईश्वरावर श्रद्धा ठेवणे, हा गीतेचा मुख्य संदेश आहे. आजच्या धावपळीच्या युगातही मानसिक शांतीसाठी गीतेचे वाचन आणि चिंतन अत्यंत मार्गदर्शक ठरते.

गीता आणि व्यासजींना पुढील श्लोकात मोठे गोड वर्णन केले आहे.

ॐ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं,
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्ये महाभारतम्।
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीं,
अम्ब त्वामनुसन्दधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम्।।

अर्थ : ज्या गीतेचा उपदेश भगवान नारायणाने स्वत: पार्थ (अर्जुना) ला केला, ज्याला प्राचीन मुनी व्यासांनी महाभारताच्या मध्यभागी गुंफले, जी अद्वैत (एकतेच्या) अमृताची वर्षाव करणारी आहे, जी अठरा अध्यायांची आहे आणि जी संसाररूपी दु:खाचा नाश करणारी आहे अशा भगवती (माते) गीते ! मी तुझे ध्यान करतो.

ज्या श्रीकृष्णाने अर्जूनाच्या निमित्ताने हे गीतातत्व संपूर्ण जगाला दिलेत. श्रीकृष्णाला नमस्कार करताना म्हटले आहे :

प्रपन्नपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये।
ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नम:।।

जे शरणागतांसाठी कल्पवृक्षाप्रमाणे आहेत, ज्यांच्या एका हातात घोड्याला हाकण्याची छडी आहे, जे ज्ञानमुद्रा धारण केलेले आहेत, आणि जे गीतारूपी अमृताचे दोहन करणारे आहेत, त्या भगवान श्रीकृष्णाला माझा नमस्कार असो.

गीतातत्व म्हणजे उपनिषदांचे सार आहे. हे श्रीकृष्णाने केस दिले त्याचे गोड वर्णन पुढील श्लोकात आहे.

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दन:।
पार्थो वत्स: सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत्।।

सर्व उपनिषदे म्हणजे गाई आहेत, गोपालनंदन (श्रीकृष्ण) त्यांचे दोहन करणारे आहेत. अर्जुन वासरू आहे आणि विद्वान लोक (सुधी) त्या दुधाचा उपभोग घेणारे आहेत. आणि ते दुध म्हणजे महान गीतारूपी अमृत आहे. श्रीमद्भगवत गीतेच्या अमृताचे पान केलेली भारतीय जनता धन्य असल्याचे जगाने मान्य केले आहे. ग.दि. माडगुळकरांनीही आपल्या देशभक्तीपर गीतामध्ये वर्णन करताना गीतेचे वर्णन केले आहे.

येथे नको निराशा थोड्या पराभवाने
पार्थास बोध केला येथेच माधवाने
हा देश स्तन्य प्याला गीताख्य अमृताचे
आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

या गीतामध्ये गीताख्य अमृताचे स्तनपान केलेल्या या देशातच श्रीकृष्णाने माधवास केलेल्या बोधाचा संदर्भ देत थोड्या पराभवाने निराश न होण्याचे आवाहन केले आहे.

### दत्त जयंती: गुरुतत्त्वाचा उत्सव

गीता जयंतीनंतर काही दिवसांनीच, म्हणजेच मार्गशीर्ष पौर्णिमेला 'दत्त जयंती' साजरी होते. हा दिवस भगवान दत्तात्रेयांचा जन्मदिवस म्हणून ओळखला जातो. अत्री ऋषी आणि माता अनुसूया यांच्या पोटी, सायंकाळी प्रदोष समयी भगवान दत्तात्रेयांचा जन्म झाला. भगवान दत्तात्रेय हे ब्रह्मा, विष्णू आणि महेश (शिव) या त्रिदेवांचे एकरूप मानले जातात. दत्त संप्रदायात या दिवसाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दत्तात्रेयांनी निसर्गातील चोवीस घटकांना (उदा. पृथ्वी, पाणी, आकाश, हत्ती, मधमाशी इ.) आपले गुरु मानले होते. यातून आपल्याला हे शिकायला मिळते की, जिथे जिथे चांगले गुण दिसतील, ते ग्रहण करणे म्हणजेच खरे ज्ञान होय. दत्त जयंतीच्या दिवशी भक्तगण 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' असा नामजप करत गुरुचरित्राचे




धर्म-संस्कृती
प्रमोद (श्याम) जोशी
मो.7447788349

पारायण करतात. हा उत्सव गुरुभक्ती आणि साधेपणाची शिकवण देतो.

**एकत्रित संदेश : ज्ञान आणि भक्तीचा संगम**

गीता जयंती आणि दत्त जयंती एकाच महिन्यात येणे हा एक विलक्षण योग आहे. एकीकडे भगवान श्रीकृष्ण 'जगद्गुरू' म्हणून गीतेतून कर्मयोगाचा उपदेश करतात, तर दुसरीकडे भगवान दत्तात्रेय 'अवधूत' रूपाने त्याग आणि सर्वसमावेशकतेची शिकवण देतात. गीता आपल्याला 'कर्म' करायला प्रवृत्त करते, तर दत्त उपासना आपल्याला 'ज्ञान' आणि 'वैराग्य' शिकवते. या दोन्ही पर्वांचे औचित्य साधून आपण आपल्या मनातील अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञान आणि भक्तीच्या मार्गावर चालण्याचा संकल्प केला पाहिजे. हे दोन्ही उत्सव मानवी जीवनाला परिपूर्णतेकडे नेणारे दीपस्तंभ आहेत. भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी 'महिन्यांमध्ये मी मार्गशीर्ष आहे' असे म्हटले आहे, बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम् । मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ।। श्रीकृष्णांनी मार्गशीर्ष महिन्याला स्वत:चे रूप मानण्याचे कारणे आहेत. भारतीय पंचांगानुसार या महिन्यात हवामान आल्हाददायक असते. कडाक्याची थंडी नसते आणि उन्हाचा त्रासही नसतो. हा काळ सात्त्विक मानला जातो. पूर्वीच्या काळी वर्षाची सुरुवात मार्गशीर्ष महिन्यापासून होत असे, त्यामुळे त्याला अग्रहायण असेही म्हणतात. हा काळ पिकांच्या काढणीचा असतो, त्यामुळे सर्वत्र समृद्धी आणि आनंदाचे वातावरण असते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## अन्नछत्र मंडळातर्फे आ. दिलीप लांडे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २६ नोव्हेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या परिसरात स्वामींचा महिमा पहायला मिळतो, यामुळे या ठिकाणी श्रद्धा, शांती आणि शाश्वतता दिसून येत असल्याचे मनोगत मुंबई, चांदिवली विधानसभा मतदार संघाचे आमदार दिलीप लांडे यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या उपस्थितीत विश्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत स्वीयसहायक सुनील थोरात व पोलीस पथक उपस्थित होता. यावेळी गोटू माने, एस.के.स्वामी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.




## वळसंग ग्रामपंचायतमध्ये संविधान दिन साजरा

**वळसंग, दि. २६ नोव्हेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील ग्रामपंचायत मध्ये संविधान दिनाचा साजरा करण्यात आला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन संरपंच जगदीश आंटद यांच्या हस्ते करण्यात आले. उपसंरपंच समीर कटरे यांच्याकडून संविधानाचा वाचन करण्यात आला. यावेळी माजी उपसरपंच आरीफ कुरेशी, ग्रामपंचायत सदस्य मलकप्पा कोडले, शालम आमलिचूंगे, श्रीशैल भुसणगी उपस्थित होते. तसेच सिध्दाराम वाघमारे, सूतगिरणीचे संचालक लक्ष्मण हंजगे, सिद्धया स्वामी, मल्लिनाथ स्वामी, रमेश बागलकोटी उपस्थित होते.



## भाजपाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार कल्याणशेट्टी यांचा डोर टू डोर प्रचार

**अक्कलकोट, दि. २६ नोव्हेंबर-**

अक्कलकोट नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीत भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी यांचा प्रभाग १ मध्ये डोअर टु डोअर प्रचार प्रारंभ करण्यात आला. नगराध्यक्ष पदाचे भारतीय जनता पार्टीचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी यांनी प्रभाग १ मध्ये झंझावत डोअर टू डोअर प्रचार फेरीत प्रभाग क्र.१ चे उमेदवार भिमराव शेळके, सुनंदा स्वामी उपस्थित होते. यावेळी अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, विश्राम पटेल, दिनेश पटेल, सिद्ध पाटील,सागर कल्याणशेट्टी, मनोज कल्याणशेट्टी, बालाजी पाटील, वरूण शेळके, छोटू पवार, अनिल लोणार, शितल फुटाणे, प्रकाश कोळी,अशोक माशाळे, चंद्रकांत गवंडी, श्रीशैल गवंडी, इरण्णा गवंडी, बाजीराव जाधव, प्रकाश कोळी, वसंत बंडगर, प्रदिप बनसोडे, सिध्दाराम घटकांबळे, रफिक पालंडे, नागेश होळीकट्टी, तौफिक मुजावर, सिध्दू माळी, शिवू स्वामी, देविदास गोबरे, नुरदिन शेख, बाबा सुरवसे उपस्थित होते.

## तलवार हल्ला प्रकरण; पिता-पुत्राचा जामीन मंजूर

**बार्शी, दि. २६ नोव्हेंबर-**

येथे मेसेजच्या वादातून झालेल्या भांडणात तलवार व गजाने मारहाण केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातील गन्नीसाहेब महेबूब मुलाणी व अमीन गन्नीसाहेब मुलाणी यांचा जामीन अर्ज प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी मंजूर केला. फिर्यादी उस्मान पठाण यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मेसेजच्या वादातून निर्माण झालेल्या वादाचे प्रकरण मिटविण्यासाठी बोलावल्यावर जाधव यांच्या शेतातील वस्तीवर पोहोचल्यावर आरोपींनी त्यांचा मुलगा राजू पठाण याच्यावर गज, काठी व तलवारीने हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला होता. या घटनेत गन्नीसाहेब मुलाणी, अमीन मुलाणी, सद्दाम मुलाणी, शमीना मुलाणी (सर्व रा. श्रीपतपिंपरी) तसेच रेश्मा आयुबतुल्ला शेख व आयुबतुल्ला शेख (रा. आष्टी, ता. मोहोळ) यांच्यावर मारहाणीचा भारतीय न्यायसंहिताचे कलम १९०, १९१(३), १९१(२), १८९(२), ३५२, ३५१(२), ११५(२), ११८(१), ११८(२) या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. यात पोलिसांनी गन्नीसाहेब मुलाणी आणि त्यांचा मुलगा अमीन मुलाणी या दोघांना अटक अटक करण्यात आली. यातील पिता-पुत्रांनी जामीनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला. यात सरकारी वकील आणि तपास अधिकाऱ्यांनी आरोपींना जामीन देऊ नये, अशी मागणी केली. न्यायालयाने अर्जदार यांचे विधीज्ञ यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती रेवती बागडे यांनी अर्जदार आरोपींचा जमीन अर्ज मंजूर केला. अर्जदार आरोपींच्यावतीने ॲड. सुहास कांबळे यांनी काम पाहिले.



# ट्रॅक्टर थेट विहीरीत; बालकाचा दुर्दैवी अंत

### १२ तासाच्या प्रयत्नानंतर मृतदेह काढला बाहेर; शेळगाव (आर) येथील हृदयद्रावक घटना

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२६ नोव्हेंबर-**

बार्शी तालुक्यातील शेळगाव (आर) येथील शेरखाने वस्तीवर मंगळवार, दि.२५ नोव्हेंबर रोजी एक अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. ट्रॅक्टरमध्ये खेळत असताना अचानक ट्रॅक्टर चालू होऊन ते विहिरीत कोसळल्याने चार वर्षांच्या शिवराज संदीप शेरखाने या बालकाचा दुर्दैवी अंत झाला.

या बालकाला वाचवण्यासाठी ग्रामस्थ, प्रशासन आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी तब्बल १२ तास अथक संघर्ष केला. परंतु या प्रयत्नांना यश आले नाही. ही घटना शेळगाव आर ते कळमण रस्त्यावरील शेरखानी वस्तीवर घडली.

**ट्रॅक्टर विहिरीत पडला, १२ तास चालला बचाव संघर्ष**

ही घटना मंगळवारी दुपारी अंदाजे ४ वाजता झाली. चार वर्षीय शिवराज संदीप शेरखाने हा ट्रॅक्टरमध्ये खेळत असताना बसून ट्रॅक्टर अचानक चालू झाल्याने अनियंत्रित झाला आणि जवळच्या विहिरीत कोसळला. घटनेची माहिती मिळताच तात्काळ बचाव कार्य सुरू करण्यात आले. दुपारी ४:३० वाजता सुरू झालेला संघर्ष दुसऱ्या दिवशी पहाटे ४:३० वाजेपर्यंत म्हणजे जवळपास १२ तास अविरत चालू होता. बचाव कार्यासाठी संपूर्ण गाव एकवटले होते. घटनास्थळी बार्शी अग्निशमन दल, १०८ रुग्णवाहिका, वैराग पोलीस स्टेशनचे पथक, आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, गावचे पोलीस पाटील ज्ञानदेव नागणे, ग्रामपंचायत सदस्य विजय अडसूळ व संभाजी गवळी, गावातील सामाजिक, राजकीय कार्यकर्ते हे तातडीने दाखल झाले होते.

गावातील सामाजिक आणि राजकीय मंडळी देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होती. ही घटना गावातील लोकांना कळताच कांही जणांनी विहिरीतील पाण्याचा अंदाज घेण्यासाठी व बालकाला काढण्याच्या हेतूने पाण्यात उड्या मारल्या परंतू विहीरीची खोली जास्त असल्याने मुलाला वाचविण्यासाठी यश आले नाही. त्यानंतर क्रेन बोलावून क्रेनच्या सहाय्याने गळ (हुका टाकून ट्रॅक्टर आणि मुलाला वर काढण्याचा प्रयत्नही करण्यात आला. मात्र, यश न आल्याने विहिरीतील पाण्याचा उपसा सुरू करण्यात आला. या काम ासाठी ५ ते ६ एचपीच्या पाच ते सात पाण्याच्या मोटर्स कार्यान्वित करण्यात आल्या. १२ तासांच्या संघर्षानंतर मोठ्या क्षमतेने पाणी उपसण्याचे काम सुरू होते. रात्री ३ वाजेपर्यंत पाणी पूर्णपणे काढले गेले. अखेरीस, विहिरीच्या सुमारे ५० ते ६० फूट खोल तळाशी पडलेला ट्रॅक्टर आणि बालक शिवराज याचा शोध लागल्यानंतर १२ तासांच्या प्रयत्नांनंतर, पहाटे ४:३० वाजता निष्पाप शिवराजचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यास यश आले.

गेले १२ तास श्वास रोखून सुरू असलेला हा संघर्ष अखेरीस अपयशी ठरल्याने संपूर्ण वस्तीवर आणि शेळगाव परिसरात शोककळा पसरली आहे. या घटनेमुळे शेरखाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण गावासाठी ही अत्यंत वेदनादायक घटना घडली आहे.

## अवैध दारूविरोधात ८ डिसेंबरला होणार धरणे आंदोलन

### ज्योतीबाचीवाडी व हत्तीज परिसरातील विक्रीबाबत दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२६ नोव्हेंबर-**

बार्शी तालुक्यातील व वैराग पोलिस ठाणे हद्दीतील ज्योतीबाचीवाडी व हत्तीज परिसरातील अवैध दारु विक्री कायमस्वरुपी बंद करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते नागेश चव्हाण यांनी पोलीस अधिक्षकांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

वैराग हद्दीतील ज्योतीबाचीवाडी व हत्तीज परिसरात गेल्या कांही महिन्यापासून उघडपणे अवैध दारु विक्री व गुटखा विक्री सुरु आहे. त्यामुळे अनेक तरुण व्यसनाधीन होत आहेत. समाजात अनेक सामाजिक समस्या निर्माण होत असून दारुमुळे अनेकांचे संसार उध्दवस्त होत आहेत.

महिलांवर अन्याय, कौटूंबिक वाद, हाणमार करुन हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. त्यामुळे गावच्या सर्वांगीण विकासात अडथळा निर्माण होत आहे. तसेच गुटखा विक्री मुळे तरुण पिढीचे आरोग्य धोक्यात येत आहे. त्यामुळे ज्योतीबाचीवाडी व हत्तीज या परिसरातील विविध ठिकाणी अनधिकृतपणे दारु विक्री होत आहे. कांही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनम ताने उघडपणे अवैध व्यवसाय चालू असल्याचे दिसत आहे. अवैध दारू विक्री संदर्भात यापूर्वी २६ सप्टेंबर रोजी निवेदन दिले होते. परंतु अद्याप संबंधितावर कारवाई झाली नाही. त्यामुळे गावकरी व महिला ८ डिसेंबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालय पुणे, मुख्यमंत्री कार्यालय मुंबई, पोलीस अधिक्षक सोलापूर यांचे कार्यालय सोलापूर, कोल्हापुर परिक्षेत्र कार्यालय कोल्हापूर येथे दिवसभर कार्यालयीन वेळेत धरणे आंदोलन करणार आहेत. याची दखल घ्यावी तत्काळ अवैध व्यावसायीकांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## एकता मंचच्या शिबिरात २५ महिलांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ नोव्हेंबर-**

गौडगाव (ता. बार्शी) संविधान दिनाचे औचित्य साधून तसेच मुंबईवरील २६/११ च्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवानांना आणि निष्पाप नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी गौडगाव (ता. बार्शी) येथे 'एकता महिला मंचच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

रक्तदान शिबिराच्या प्रारंभी, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर 'एकता महिला मंच'च्या वतीने मान्यवरांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. यावेळी एकता महिला मंचच्या सदस्या शीतल काजळे, मैना सोनवणे, वर्षा यादव आणि राहुल भड यांनी उपस्थित महिलांना म ार्गदर्शन केले. त्यांनी संविधान दिनाचे महत्त्व आणि २६/११ च्या हल्लयातील शहिदांचे बलिदान व्यर्थ न जाऊ देण्याचा संदेश दिला. यावेळी २५ सदस्यांनी रक्तदान केले. हे रक्तदान श्रीमान रामभाई शहा रक्त



केंद्र, बार्शी यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. रक्तदात्यांना रक्त केंद्रामार्फत भेटवस्तू आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित अर्चना पारसे, अर्चना जिने, ताजुद्दीन सय्यद, किरण जाधव, बापू ननवरे, राहुल भड तसेच एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी एकता महिला मंचच्या तालुका प्रमुख कविता दसवंत, तालुका कार्यकारणी सदस्या रीना गुरव, वसुधा कुंभार, सानिया सय्यद, स्वाती चव्हाण यांच्यासह सदस्या शीतल काजळे, भाग्यश्री लाटे, मोहिनी भड, मैना सोनवणे, सुखनंदा सुरवसे, महादेवी माने, सविता काजळे, उषा सुतार, अरुणा काजळे, सिंधु दसवंत, अनिता दसवंत, राजश्री गुरुव, वर्षा यादव, मथुरा दसवंत, मंगल काजळे, शामल सुतार, सुरेखा जगदाळे, जयश्री दसवंत, संगीता काजळे, सरस्वती चादरे, मंगल सुरवसे, पद्मजा भड, सारिका सुतार, ज्योति कुंभार, शुभांगी भड, स्वाती भड, पद्मा महाडिक, विद्या महाडिक उपस्थित होत्या. सूत्रसंचालन व प्रास्ताविक भाग्यश्री लाटे यांनी केले, तर कविता दसवंत यांनी आभार मानले.

## बार्शीत संविधान दिन उत्साहात; युवकांना लोकशाही मूल्यांची प्रेरक शिकवण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२६ नोव्हेंबर-**

बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी येथे संविधान दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम ाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. एस. व्ही. शिंदे यांची उपस्थिती लाभली, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. बी. करंडे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक NSS कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. ए. ढगे यांनी करत संविधान दिनाच्या पार्श्वभूमीचा थोडक्यात आढावा घेतला. मुख्य व्याख्यानात प्रा. एस. व्ही. शिंदे यांनी भारतीय संविधान कसे तयार झाले. संविधान सभेची कार्यपद्धती, प्रमुख टप्पे, तसेच सामाजिक न्याय, सम ता व लोकशाहीची मूल्ये याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी



विद्यार्थ्यांना संविधान साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करत स्वतःम धील नागरिकभाव जागवण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. एस. बी. करंडे यांनी इतिहासातील उदाहरणे देत संविधानाचे संरक्षण करणे ही प्रत्येक युवकाची कर्तव्यभावना असल्याचे सांगितले. स्वातंत्र्य मिळवणे जितके कठीण, त्याचे रक्षण करणे त्याहून कठीण. युवकांनी संविधान समजून घेतले तरच देशाची वाटचाल योग्य दिशेने होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्ही. पी. पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. रोहित डिसले यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे खटउ समन्वयक डॉ. बी. डी. लांडे, NSS कार्यक्रम अधिकारी प्रा. के. एम. म ाळी, प्रशासकीय अधिकारी भाऊसाहेब पाटील, संगणक विभाग प्रमुख बाळासाहेब लिंगे, मोरे, ज्युनियर विभाग समन्वयक पोहळकर, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



## श्री शंकरलिंग प्रशालेत संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २६ नोव्हेंबर-**

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत भारतीय संविधान दिन संपन्न झाला. याप्रसंगी सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान उद्देशिकेच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य विरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्या हस्ते करण्यात आले.

पूजनानंतर सर्व शिक्षक, शिक्षिका, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी व कन्नड भाषांध्ये संविधानाचे वाचन केले. या दिनाचे औचित्य साधून गीत गायन आणि प्राथमिक व माध्यमिक गटात मराठी, कन्नड व इंग्रजी या तीन भाषांमध्ये स्वच्छ व सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक भाषेतून तीन क्रमांक काढून त्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना लेखन साहित्य देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी संविधान दिनाचे महत्त्व प्राचार्य वीरेश थळंगे यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, सिद्धारूढ हिरेमठ, बसवराज दुधगी, वीरेश थळंगे, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, मल्लिनाथ गौडगाव, प्रा.शरणय्या मसुती, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, प्रतिभा तांडुरे, लिपिका राजश्री दुधगी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी आदींचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी मानले.

## कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या किल्ला स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ नोव्हेंबर-**

येथील कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने दीपावली निमित्त घेतलेल्या किल्ला स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ पांडुरंग भवन येथे संपन्न झाला. गेली १७ वर्षे पंढरीत कार्यरत असणाऱ्या या मंडळाच्या वतीने यावर्षी छत्रपती शिवरायांच्या विचारांचा व इतिहासाचा प्रसार व प्रचार व्हावा या उदात्त हेतूने भव्य किल्ला स्पर्धेचे आयोजन केले आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात अक्षय बडवे पाटील यांच्या ईशस्तवनाने झाली. सदर स्पर्धा शालेय व खुल्या अशा दोन गटात घेतल्या होत्या. रोख रक्कम, संस्थेचे मानचिन्ह, सहभाग प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरुप आहे. हा कार्यक्रम एस. के. एन. कॉलेजचे प्राचार्य डॉ.कैलाश करांडे यांच्या अध्यक्षतेखाली व पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे सचिव सुधीर पटवर्धन, तसेच श्री पांडुरंग अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष अनिरुद्ध बडवे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

किल्ला स्पर्धेचे परिक्षण इतिहास



अभ्यासक तुकाराम चिंचणीकर, ॲड. आशुतोष बडवे-पाटील, इंटेरियम डेकोरेटर अभियंता सुमेर काळे, कलाशिक्षक प्रद्युम्न कमठाणकर यांनी समर्थपणे केले. त्याबद्दल स्पर्धेचे सचिव ज्ञानेश्वर मोरे यांच्या हस्ते परिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कलासाधनाचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत बडवे महाजन व डॉ. बसवराज सुतार यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार शिवरायांची अश्वारूढ प्रतिमा देऊन करण्यात आला. परिक्षक ॲड. आशुतोष बडवे यांनी किल्ला स्पर्धेचे परिक्षण कसे केले जाते हे अतिशय लालीत्यपूर्ण ओघवत्या भाषा शैलीत विषद केले. यापुढेही विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येणार असल्याचे श्रीकांत बडवे-महाजन यांनी सांगितले. पाहुण्यांचा परिचय संस्थेचे सदस्य रणजीत पवार यांनी करुन दिला. संस्थेचे कार्याध्यक्ष अमरसिंह चव्हाण यांनी आपल्या प्रास्ताविकात संस्थेच्या मागील व भविष्यातील कार्याचा धावता आढावा घेतला.सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत खजिनदार राजेंद्र माळी यांनी केले.

यावेळी या स्पर्धेला प्रायोजकत्व दिलेल्या स्कॉलर मार्केटिंगचे प्रमुख महेश मोहीकर व एस के एन संस्थेच्या पदाधिका- यांचा यथोचित सत्कार संस्थेचे सदस्य प्रा.मंदार परिचारक यांच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धेत शालेय गटात प्रथम क्रमांक विभागून कु.श्रेया माऊली डांगे व रेणुकामाता मंडळ, द्वितीय क्रमांक विभागून श्रेयश शिंगाडे व साजरा राऊत, तर तृतीय क्रमांक विभागून चिन्मय देशपांडे, वेदांग बोर्खेडकर व सोहम पेटकर यांनी प्राप्त केला तर खुल्या गटात प्रथम क्रमांक विभागून वरद विवेक बडवे व संकल्प प्रतिष्ठान, द्वितीय क्रमांक विभागून अमोल वाखारकर व ओम जाधव, तृतीय क्रमांक स्वराज्य मावळे ग्रुप अंश व आर्य कोठाडिया आणि शिवप्रेमी तरुण मंडळाने प्राप्त केला.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत बडवे-महाजन, प्रा.विनायक परिचारक, अभिराज बडवे, अमृतभाई पेनूरकर, प्रा. राजेंद्र मोरे ,राजेश अंबिके, ज्ञानेश मोरे, डॉ.किरण बहिरवाडे, अनंता नाईकनवरे, महेश देशपांडे, शिवाजी यादव, नारायण बडवे, बसवराज बिराजदार, राजकुमार आटकळे, महेश अंबिके, राजकुमार शहा आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदाकिनी देशपांडे यांनी केले. अरिहंत भाई कोठाडिया यांनी आभार मानले. यावेळी विजेत्यांचे पालकही उपस्थित होते.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बार्शी वकील संघाच्यावतीने संविधान दिन साजरा

**बार्शी, दि.२६ नोव्हेंबर-**

संविधान दिनाचे निमित्ताने बार्शी वकिल संघाच्यावतीने बार्शी न्यायालय समोरील भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर भारतीय संविधानाच्या उद्देशीकेचे वाचन करुन साजरा करण्यात आला.

यावेळी बार्शी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रणजित गुंड, वकील संघांचे लायब्ररी चेअरमन ॲड. अमोल अलाट, ॲड. शैलेजा क्षीरसागर, ॲड. महेश जगताप, ॲड. किशोर करडे, ॲड. गणेश फावडे, ॲड. धीरज कांबळे, ॲड. जगदीश



साखरे, ॲड. शामकुमार झालटे, ॲड. काका कोरके, ॲड. अभिजित जगताप, ॲड. चेतन ढाळे, ॲड.कोकाटे, ॲड. मेघराज आडके, ॲड. चंदनशिवेसह अनेकजण उपस्थित होते.



# पंढरपूर नगरपरिषद निवडणूक पालकमंत्री गोरेंची प्रतिष्ठा पणाला

## भाजपासह इतर विरोधी आघाड्यांकडून व्युहरचना सुरू

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर,दि.२६ नोव्हेंबर -**

पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणूकीच पडघम जोराने वाजू लागलेले आहेत. आरोप,प्रत्यारोपांच्या फैरी एकमेकांवर झाडल्या जावू लागलेल्या आहेत. यंदाच्या निवडणूकीत भाजपाने चांगलीच कंबर कसलेली दिसत आहे. मागील दोन,चार नगरपरिषदेच्या झालेल्या निवडणूका पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीच्या माध्यमातून परिचारक लढवित होते. मात्र या वेळेस जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्ह्यात कमळाची वैयक्तीक ताकद आजमाविण्यासाठी आणि जिल्हाभर कमळ फुलविण्यासाठी कमळाच्या चिन्हावर निवडणूका लढविण्यासाठी स्थानिक नेत्यांना प्रोत्साहित केले आहे. त्यामुळे या निवडणूका आता जिंकण्यासाठी स्थानिक नेतृत्वा बरोबरच पालकमंत्र्यांची देखील प्रतिष्ठा पणाला लागल्याचे दिसत आहे.







पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणूकीत भाजपाकडून नगराध्यक्षपदाची निवडणूक परिचारकांचे विश्वासू शिलेदार लक्ष्मण शिरसट (पापरकर) यांच्या पत्नी शामल शिरसट (पापरकर) या लढवित आहेत. या बरोबरच दोन, तीन प्रभागातील अपवाद वगळता शहरातील अन्य प्रभागातून कमळ या भाजपाच्या चिन्हावरच नगरसेवकपदाच्या उमेदवारांना निवडणूकीच्या रिंगणात उतरविण्यात आलेले आहे. पंढरपूर नगरपरिषदेसाठी नगराध्यक्षपदाचा एक उमेदवार तसेच शहरातील १८ प्रभागातून ३६ उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत. एकट्या परिचारक यांनीच नगराध्यक्षासह १८ प्रभागातून ३६ उमेदवार दिलेले आहेत. परिचारकांच्या विरोधात विठ्ठल सह.साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष भगिरथ भालके यांनी तिर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून दंड थोपटले आहेत. तर माढ्याचे आमदार तथा विठ्ठल कारखान्याचे विद्यमान चेअरमन अभिजीत पाटील यांनी निवडणूकीसाठी जय्यत तयारी केली होती. पुर्ण विठ्ठल परिवार एकसंघ ठेवण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतलेला होता. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या विठ्ठल कारखान्याच्या मदतीच्या ओझ्याखाली त्यांचे हात आडकले गेल्याने केवळ ११ उमेदवारांनाच या निवडणूकीच्या रिंगणात उतरविणे त्यांना शक्य झाले. श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडीकडून त्यांनी आपले उमेदवार निवडणूकीसाठी रिंगणात उतरविले आहेत. दरम्यान नगराध्यक्षपदाच्या त्यांच्या उमेदवाराने निवडणूकीतून ऐनवेळी माघार घेत डॉ.प्रणिता भालकेंना पाठिंबा दिला आहे.

यंदा पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणूकीसाठी भाजपा, भालकेंची तिर्थक्षेत्र विकास आघाडी आणि अभिजीत पाटील यांची श्रीविठ्ठल परिवर्तन आघाडी हे एकमेकांसमोर उभे ठाकलेले आहेत. त्यामुळे या निवडणूकीत तिर्थक्षेत्र विकास आघाडी आणि श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडीचे भाजपा समोर आव्हान आहे. प्रत्येक पक्ष किंवा आघाडी एकमेकांसमोर आपले आव्हान उभे करण्यासाठी आपआपल्या परिने व्युहरचना आखत आहे. दुसरीकडे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पंढरपूर नगरपरिषदेची निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची केली आहे. निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यापासून ते पंढरपूर नगरपरिषदेसाठी वैयक्तीक लक्ष घालून वारंवार येथे भेट देत आहेत.

निवडणूकीच्या अगोदर नगराध्यक्षपदासह भाजपाकडून नगरसेवकपदासाठी असणाऱ्या इच्छुक उमेदवारांच्या देखील त्यांनी मुलाखती घेवून प्रशांत परिचारक, विद्यमान आमदार समाधान आवताडे यांच्याशी विचारविनिमय करीत उमेदवाऱ्या देवू केलेल्या आहेत. अगदी प्रचाराचा नारळ वाढविण्या पासून ते प्रचाराच्या काळातील दररोजची अपडेट पालकमंत्री स्वत: वैयक्तीक पातळीवर घेत आहेत.

दरम्यान पालकमंत्र्यांच्या दृष्टीने अतिशय प्रतिष्ठेच्या झालेल्या पंढरपूर नगरपरिषदेच्या या निवडणूकीत भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रशांत परिचारक तसेच येथील विद्यमान भाजपाचे आमदार समाधान आवताडे यांच्या प्रयत्नातून भाजपाला कितपत यश मिळते या बरोबरच पालकमंत्र्यांची प्रतिष्ठा या नेते मंडळींकडून वाढणार की कमी होणार आदी प्रश्नांच्या उत्तरांसाठी आपणाला येत्या ३ डिसेंबर पर्यंत अर्थात मतमोजणीच्या वेळेपर्यंत वाट पहाव लागणार आहे.

### ताकद देण्यासाठी पालकमंत्र्यांचे वैयक्तीक लक्ष

या निवडणूकी मध्ये कोणतीही रिस्क घेण्यास भाजपाचे वरिष्ठ पातळीवरील नेते घेण्यास तयार नाही. त्यामुळे नगराध्यक्षपदासह जास्तीत जास्त नगरसेवक निवडणूक आणण्यासाठी पालकमंत्र्यांनी भाजपाची सर्व यंत्रणा कार्यान्वीत केलेली आहे. निवडणूकीच्या दृष्टीने स्थानिक नेत्यांना ताकद देण्यासाठी पालकमंत्र्यांनी व्यक्तीश: लक्ष घातलेले आहे. निवडणूकीत स्थानिक नेत्यांना काय हवे, काय नको या बाबतचा आढावा दररोज पालकमंत्र्यांकडून घेतला जात आहे.

ऐवढेच नाही तर निवडणूकीच्या दृष्टीने विजय दृष्टीपथात आणण्यासाठी स्थानिक नेत्यांच्या विनंती वरुन भाजपासह महायुतीमधील सहभागी सर्व मित्रपक्षांत समन्वय राखण्याची जबाबदारी देखील पालकमंत्र्यांकडून पार पाडली जात आहे. तसेच प्रचारा दरम्यान भाजपा किंवा मित्रपक्षातील एखादा पदाधिकारी, महत्वाचा कार्यकर्ता इतरत्र भरकटत गेल्यास त्याला आपल्या पध्दतीने वैयक्तीक मार्गदर्शन (पालकमंत्र्यांकडून समुउपदेश ) करुन पुन्हा निवडणूक प्रचार प्रक्रियेत त्याला सहभागी करुन घेण्यासाठीची देखील चोख व्यवस्था पालकमंत्र्यांकडून केली जात असल्याची माहिती भाजपाच्या गोटातून दिली जात आहे.

## महत्त्वाचे



### अक्कलकोटमध्ये राष्ट्रवादीची प्रचारफेरी इकरार शेख नगराध्यक्षपदाचे उमेदवार

**अककलकोट, दि.२६ नोव्हेंबर-**


राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार इकरार शेख यांची शहरातील प्रमुख मार्गावरून प्रचार रॅली काढण्यात आली . राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार इकरार शेख यांच्या प्रचार फेरीचा प्रारंभ खंडोबा मंदिर बसस्थानक रस्ता येथुन करण्यात आले . ही प्रचार रॅली खंडोबा मंदिर मल्लीकार्जन मंदिर समाधी मठ कारंजा चौक, मेन रोड होटकर गल्ली, राजे फत्तेसिंह चौक मार्गे कमलाराजे चौक येथे समाप्त करण्यात आली याप्रसंगी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रभाग पाच चे उमेदवार सौरभ लांडगे राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष बंदेनवाज कोरबु, तालुका उपाध्यक्ष बसवराज देशमुख, आप्पाशा लच्च्याण, बसवराज बगले, स्वामीनाथ पोतदार, श्रीनिवास सिंदगीकर, मडोळप्पा पुजारी, फर्जाना मुल्ला, नागुबाई पांचाळ, हलीमा शेख, श्रीकांत मळकुंदी, मोहसीन बागवान, गणेश कांबळे, सिद्धाराम पोतदार, रसन भैरे, सुरेखा पाटील, आदि राष्ट्रवादीचे पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते



### कुसमोड येथील जिल्हा परिषद शाळेत संविधान दिन उत्साहात

**पिलीव, दि.२६ नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्ह्या परिषद प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला.यावेळेस कुसमोडचे सरपंच शहाजी लेंगरे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ग्रामसेवक आतार, आरपीआय युवकचे तालुकाध्यक्ष अमोल वाघमारे, मुख्याध्यापक शकील तांबोळी, उमेश बोडरे, देवानंद चव्हाण, अंगणवाडी सेविका गुरव, धोत्रे, सुनील गुरव, सहशिक्षक गणेश देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर यावेळेस उपस्थित होते. यावेळेस मुख्याध्यापक शकील तांबोळी यांनी संविधान दिनाचे महत्व सांगीतले. अमोल वाघमारे यांच्यावतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार गणेश देशमुख यांनी मानले.



### सदर बझार पोलिस ठाण्यात वीर जवानांना श्रद्धांजली; पोलिस आयुक्तांची उपस्थिती


**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत सोलापूर सदर बजार पोलिस स्टेशन येथे २६/११ च्या भ्याड हल्यात शहीद झालेल्या वीर जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानिमित्त सकाळी ९ वाजता सोलापूर रक्तदान शिबिरास सुरवात करण्यात आली. या वेळी पोलिस आयुक्त एम राजकुमार, पोलिस उपआयुक्त विजय कबाडे, पोलिस उपायुक्त गुन्हे अश्विनी पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर, पोलिस निरीक्षक क्राइम भालचंद्र ढवळे, सहायक पोलिस निरीक्षक सागर काटे, सहायक पोलिस निरीक्षक स्टेशन चौक गजानन पाटील, पोलिस उपनिरीक्षक नवनाथ साखरे यांच्यासह सदर बजार पोलिस स्टेशनचे बहुसंख्य पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

## रासायनिक खतांच्या किंमतीत पुन्हा वाढ; शेतकरी हतबल

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२६ नोव्हेंबर -**

सोलापूर जिल्ह्यासह माळशिरस तालुक्यात यंदा अतिवृष्टीचा फटका बसला यामुळे खरीप हंगामातील अनेक पिके वाया गेली तर यंदा पावसाने आपला मुक्काम लांबविला यामुळे तर रब्बी हंगामाला उशीर झाला.खरेतर यंदा खरीप तसेच रब्बी अशा दोन्ही हंगामातील शेतकऱ्यांचे गणीत बिघडले आहे. त्यातच अचानक रासायनिक खतांच्या किंमतीत सुमारे २०० ते २५० प्रती बॅग एवढी दरवाढ झाल्यामुळे अडचणीत असणाऱ्या शेतकऱ्यांना खतांच्या दरवाढीचा मोठा झटका बसला आहे. यामुळे आर्थिक बजेट बिघडले आहे. खरीप हंगाम पावसामुळे वाया गेला तर रब्बी हंगामाला उशीर झाला. अजुनही वापसा नसल्यामुळे शेतकऱ्यांना पेरणी करता आला नाही. यामुळे एकतर शेतकरी अडचणीत आहे.




शेतकऱ्यांना दरवर्षीच कोणत्या ना कोणत्या तरी नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावे लागत आहे. त्यातच शेती करण्यासाठी खर्च अधिक व उत्पन्न कमी तसेच पिकांना योग्य हमीभाव नाही. यामुळेच शेतकरी वरचेवर कर्जबाजारी होत चाललाय. अगोदरच खते, बियाणे, कीटकनाशके यांच्या किमती भरमसाठ वाढल्या आहेत त्यातच पुन्हा रासायनिक खतांच्या किमतीत गोणीमागे २०० ते २५० रुपये एवढी मोठी दरवाढ झाली आहे. दरवर्षीच खरीप व रब्बी हंगामात खतांची प्रचंड मागणी असते कंपन्यांनी हे ओळखूनच रासायनिक खतांच्या दरात प्रचंड मोठी वाढ केली आहे. यामध्ये १०:२६:२६ १८०० वरुन २०००, १५:१५:१५ १४७० वरुन १६५०,२०:२०:० १८०० वरुन १९००,१४:३५:१४ १८०० वरुन २१००,१२:३२:२६ १८०० वरुन २०५०,९:२४:२४ १९०० वरुन २१००, पोटॅश १८०० वरुन २०००. एक नोव्हेंबरपासून ही दरवाढ करण्यात आली आहे. सध्या महाराष्ट्रात निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे यामुळे लोकप्रतिनिधींना या दरवाढीकडे लक्ष देण्यास वेळ नाही. एकीकडे खते,बियाणे, औषधे यांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. दुसरीकडे शेतमालाला हमीभाव मिळत नाही. शासनाने हमीभाव जाहीर करून सुद्धा बाजारात मात्र शेतकऱ्यांना हमीभाव मिळतच नाही ही खरी शोकांतिकाच आहे. शासनाने हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

> केंद्र सरकारने शेतीविषयक अवजारे व इतर बाबींसाठी असणारा जीएसटी अठरा टक्केवरुन पाच टक्के करुन दिलासा दिला आहे. तसेच खतांच्या किंमती कमी करुन दिलासा द्यावा. हमीभाव कायदा करावा.
>
> **- नबाजी मदने, शेतकरी, कुसमोड.**

## बसस्थानकात महिलेला लुबाडले, सोन्याचे दागिने व रोकड गायब

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२६ नोव्हेंबर**

बार्शी बसस्थानकावर एका महिलेला लक्ष करुन अज्ञात चोरट्याने पर्समधील तीन तोळे सोन्याचे दागिने व रोकड असा ऐवज लंपास केल्याची घटना मंगळवारी (दि.२५) दुपारी घडली.

आश्विनी कपील हिंगमिरे (रा.लक्ष्मीनगर, बार्शी) यांनी याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादी आश्विनी हिंगमिरे या कॅन्सर हॉस्पिटल येथे नोकरी करतात तर त्यांचे पती ब्लड बँकेत कार्यरत आहेत. मंगळवारी दुपारी ४ च्या सुमारास त्या आपल्या आईसह मामाच्या गावी कळंब येथे जाण्यासाठी बस पकडण्यासाठी बसस्थानकात आल्या होत्या. बसमध्ये बसल्यानंतर त्यांनी आईची पर्स पाहिली असता ती उघडी असून आत ठेवलेली दोन लहान पर्स गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्या दोन्ही छोट्या पर्समध्ये तीन तोळ्यांचे सोन्याचे गंठन एक ग्रॅम सोन्याची ठुशी आणि रोकड १५०० रुपये ठेवले होते. बस थांबवून पुन्हा तपासणी केल्यानंतरही दागिने व रोकड मिळून न आल्याने चोरी झाल्याची खात्री पटली. दरम्यान बसमध्ये गर्दी असताना पर्समधील मौल्यवान वस्तूंवर चोरट्याने नजर ठेवून संधी साधत हा प्रकार घडविल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. बार्शी बसस्थानक परिसरात वाढत्या चोऱ्यांबद्दल नागरिकांत नाराजी वाढत असताना यामुळे सुरक्षेच्या प्रश्नांवर चर्चा सुरु झाली आहे. चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.




## आरपीआयचा राष्ट्रवादी (अप) गटाला पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२६ नोव्हेंबर-**

भाजपचे माळशिरस तालुक्यातील माजी आमदार राम सातपुते यांचा फाजील आत्म विश्वास आणि हेकेखोरीला कंटाळून आम्ही महायुतीला सोडून राष्ट्रवादी अजित पवार गटाला पाठिंबा देत असल्याचे अकलूज आरपीआय आठवले गटाने जाहीर केले.

शहर रिपब्लिकन पक्ष आठवले गटाने व लहुजी शक्ती सेना यांनी आज पत्रकार परिषद घेऊन आपला अकलूज नगर परिषद निवडणुकीसाठी डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या पॅनल ला अर्थात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाला बिनशर्त जाहीर पाठिंबा दिला. यावेळी राष्ट्रवादीच्या उमेदवार उर्वशीराजे धवलसिंह मोहिते-पाटील, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार देवयानी रास्ते व सर्व उमेदवार उपस्थित होते. रिपब्लिकन पक्षाचे राज्य उपाध्यक्ष नंदू केंगार, युवक आघाडीचे किरण धाईंजे, अकलूज अध्यक्ष नितीन मोरे, अजित मोरे, प्रवीण साळवे, मुस्लिम आघाडीचे आसिफ शेख आदी उपस्थित होते. यावेळी नंदू केंगार म्हणाले, आम्ही भाजपचे मंत्री जयकुमार गोरे व माजी आमदार राम सातपुते यांना भेटलो. आरपीआयसाठी काही जागा द्या आमचे दहा हजार मतदान आहे अशी विनंती केली. मात्र त्यांनी दाद न दिल्याने आम्ही अकलूज शहर हा निर्णय घेत आहोत.

तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्ष प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव विद्यापीठास देण्याचा पहिला ठराव केला होता, त्याचा आम्हाला अभिमान आहे. सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या कार्याचाही त्यांनी गौरव केला यावेळी उर्वशीराजे मोहिते पाटील यांनी आभार मानले.

## रत्नाईमध्ये कृषी विभागाची कार्ये आणि त्याचा विस्तार विषयावर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, ता.२६ -**

अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित रत्नाई कृषी महाविद्यालयात कृषी विभाग कार्ये आणि त्याचा विस्तार या विषयावर व्याख्यान झाले.

या कार्यक्रमाप्रसंगी अकलूज विभागाचे मंडल कृषी अधिकारी सतीश कचरे यांनी कृषी विभागाचा महाविस्तार या संदर्भात सखोल मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांना घरबसल्या कोणताही खर्च न करता माहिती सहज उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. सहाय्यक कृषी अधिकारी नितीन ढगे यांनी कृषी विभागाच्या विविध योजना यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कृषी पदवी कालावधीमध्ये अभ्यास कसा करावा, शेतकऱ्यांना अर्थातच पालकांना शेती संशोधन आणि त्याची अंमलबजावणी कशी करावी, कृषी उद्योग कसे उभारावेत, या मुद्द्यावर सहाय्यक कृषी अधिकारी सारिका एकतपुरे यांनी प्रकाश टाकला. कृषी विस्तार शिक्षण विभागाचे प्रा. सचिन एकतपुरे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.



प्राचार्य रविराज नलावडे, प्रा. सचिन भोसले, डॉ. बंडोपंत शिंदे, प्रा.आबासाहेब तमनर, प्रा. संदीप कांबळे, प्रा. नवनाथ गाढवे, प्रा. आर. वी. कणसे व दिलीप भोसले यांनी परिश्रम घेतले. शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील यांचे मार्गदर्शन लाभल्याचे प्रा.नलावडे यांनी सांगितले.

## आंतरराष्ट्रीय सहकार स्पर्धेत 'सहकारमहर्षी'चे चव्हाण ठरले अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२६ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्यादित, मुंबई यांचे वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त सहकारी साखर कारखान्याचे कामगारांकरिता राज्यस्तरीय विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेकरिता सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे शेतकी अधिकारी समाधान उर्फ रविराज शिवाजी चव्हाण यांनी सहकारातून समृद्धी पोस्टर सादर केले होते. सदर पोस्टर्रला या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळाला असून यामुळे शेतकी अधिकारी यांनी सहकार महर्षी कारखान्याची शान वाढविली आहे.



सदर स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी सीएसीपीचे अध्यक्ष मा.विजय पॉल शर्मा, राष्ट्रीय सहकारी संघाचे अध्यक्षल हर्षवर्धन पाटील, साखर संघाचे अध्यक्ष पी.आर. पाटील यांचे हस्ते पुणे येथे संपन्न झाला. यावेळी को-जन असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, लेखक व अर्थतज्ञ अच्युत गोडबोले, व्हिएसआयचे डायरेक्टर जनरल संभाजी कडू-पाटील, महेश तिटकारे, साखर संघ उपाध्यक्ष प्रताप ओहोळ व साखर संघ कार्यकारी संचालक संजय खताळ आदी मान्यवर उपस्थित होते. या अनुषंगाने शेतकी रविराज चव्हाण यांचे कारखान्याचे मार्गदर्शक संचालक, महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, व्हाईस चेअरमन- शंकरराव माने-देशमुख, संचालिका मा.कु.स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील तसेच संचालक व खाते प्रमुख यांनी अभिनंदन केले. या विविध स्पर्धेमध्ये सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे इतर १० कर्मचारी सहभागी झाले होते त्यांनाही निवड श्रेणीमध्ये मान मिळाला आहे. शेतकी अधिकारी श्री. समाधान उर्फ रविराज चव्हाण यांना वैयक्तिक मिळालेल्या बक्षिसामुळे कारखाना कामगार, ऊस उत्पादक सभासद व तोडणी वाहतूकदार तसेच हितचिंतक यांचेमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.